१८६५

# निबंध

म.ग्रं.सं., संग्रह शाखा, ठाणे.
विषय : निबंध
सं. क्र. : १०६६



REFBK-0014381

स्वामी विवेकानंद

श्रीरामकृष्ण आश्रम, नाग

निबंध . १८६६

# विविध

## स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 14.3(?)
REFBK-0014381

**श्रीरामकृष्ण आश्रम**
**नागपूर**

प्रकाशक—
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम
धंतोली, नागपूर-१

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ६७ वें

(श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्व अधिकार सुरक्षित)

मूल्य रु. २.००

मु
श्री. दि. गो.
मॅजेस्टिक प्रिंटि
टिळक पुतळा, महाल, नाग

# दोन शब्द

स्वामी विवेकानंदकृत 'विविध' हें आमचें नवीन प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. स्वामी विवेकानंदांनी विभिन्न ठिकाणीं घेतलेल्या वर्गांतील भाषणांच्या टिपणांचा तसेंच त्यांच्या कांही व्याख्यानांच्या टिपणांचा आणि अहवालांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. स्वामी विवेकानंदांच्या दिव्य प्रतिभेचा विलास या भाषणांमधून आणि व्याख्यानांमधून पाहावयास सापडतो. त्यांनी केवळ धर्म, संस्कृति वा तत्त्वज्ञान या विषयांवरच व्याख्यानें दिलीं नाहीत, तर भाषा, कला, संगीत, अन्न, पौर्वात्य स्त्रिया, भारत, भारतांतील लोक इत्यादींसारख्या विविध विषयांवरहि ते बोलले. अमेरिका व इंग्लंड या देशांमधील लोकांना त्यांनी आपल्या वर्गांतून व व्याख्यानांतून वेदान्ताची, भारतीय संस्कृतीची आणि हिंदुधर्मांत सांगितलेल्या विभिन्न साधनाप्रणालींची ओळख करून दिली. त्यामुळे हिंदुधर्माविषयी आणि भारतीयांविषयी पाश्चिमात्यांचे जे अनेक गैरसमज होते ते दूर झाले आणि त्यांना भारतीय धर्माविषयी आणि भारतीय संस्कृतीविषयी आकर्षण वाटूं लागलें. वैयक्तिक व सामूहिक जीवन योग्य रीतीनें घडविण्यासाठी प्रस्तुत पुस्तकापासून उचित मार्गदर्शन लाभेल असा आम्हांला विश्वास वाटतो.

प्रस्तुत पुस्तकांत अंतर्भूत केलेलें सर्व साहित्य, आमच्या आश्रमाने प्रसिद्ध केलेल्या 'स्वामी विवेकानंद ग्रंथावलीं'तून संकलित केलेलें आहे.

१८-१२-६५. —प्रकाशक

# अनुक्रमणिका


१. वर्गांत दिलेल्या भाषणांचीं टिपणें — १
२. मनुष्य हाच स्वतःच्या भवितव्याचा निर्माता आहे — १४
३. सगुण व निर्गुण ईश्वर — २१
४. अवतार — २४
५. प्राणायाम — २७
६. पौर्वात्य स्त्रिया — ३५
७. धर्मैक्य-परिषद — ३६
८. विभिन्न धर्मांतील ईश्वरविषयक कल्पनांचें तुलनात्मक विवेचन — ३७
९. भारत — ४३
१०. हिंदु आणि ख्रिस्ती लोक — ५०
११. भारतांतील ख्रिस्ती धर्म — ५८
१२. प्रेमयोग — ६७
१३. बिल्वमंगल — ७४
१४. ज्ञान आणि कर्म — ७९
१५. आधुनिक जगाकडून वेदान्ताच्या अपेक्षा — ८७
१६. जन्ममृत्यूचे नियम — ९३
१७. सत्य आणि आभास — ९६
१८. मुक्तीचा मार्ग — ९९
१९. भारतांतील लोक — १०२
२०. भारतांतील कलेसंबंधी कांही विचार — १०५
२१. मानवाचें खरें स्वरूप — १०७
२२. अद्वैत — ११५
२३. धर्माचें सार — ११८



स्वामी विवेकानंद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १४३६९

# वि वि ध

## वर्गांत दिलेल्या भाषणांचीं टिपणें

### भाषा

साधेपणा हेंच भाषेचें खरें रहस्य होय. अतिशय प्रचारांतील, परंतु अर्थ प्रकट करण्यास अत्यंत समर्थ अशी जी माझ्या गुरु-देवांची भाषा, तोच माझा भाषेसंबंधीचा आदर्श होय. जो विचार इतरांना सांगावयाचा असेल तो व्यक्त करण्यास भाषा समर्थ असली पाहिजे.

अगदी अल्पावधींत बंगाली भाषेला परिपूर्ण रूप प्राप्त व्हावें ह्यासाठी होणाऱ्या प्रयत्नांमुळे ती भाषा रुक्ष होऊन जाईल, निष्प्राण होऊन जाईल. खरें सांगायचें म्हणजे बंगाली भाषेंत क्रियापदेंच नाहीत. मायकेल मधुसूदन दत्त ह्यांनी आपल्या काव्यांत हा दोष सुधारण्याचा प्रयत्न केला. कविकंकण हा बंगालमधील सर्वश्रेष्ठ कवि होय. पतंजलींचें महाभाष्य हा संस्कृतांतील गद्याचा सर्वोत्कृष्ट नमुना होय. भाषेचा सारा जोरकसपणा तेथे तुम्हांला आढळतो. 'हितोपदेशा'ची भाषा वाईट नाही, परंतु 'कादंबरी'ची भाषा म्हणजे अधोगतीचें एक उत्तम उदाहरण होय.

बंगालीची पुनर्रचना करतांना संस्कृताचा आदर्श डोळ्यांपुढे न

ठेवतां पाली भाषेचा आदर्श ठेवावा. पाली व बंगाली ह्या भाषांत बरेंच साम्य आहे. बंगाली भाषेंत पारिभाषिक शब्द नव्याने बनवितांना अथवा अनुवादितांना मात्र संस्कृत शब्दच वापरावेत व नवीन शब्द बनविण्याचा प्रयत्न करावा. आणि ह्यांसाठी एखाद्या संस्कृत शब्दकोशाच्या आधारें सर्व पारिभाषिक संज्ञांचा एखादा संग्रह केल्यास तो बंगाली भाषेच्या निर्मितीस पुष्कळच उपयोगी पडेल.

## कला

मुख्य विषयावर लक्ष केंद्रित करणें ही कलेमधील अत्यंत आवश्यक अशी गोष्ट आहे. नाट्यकला ही सर्व कलांतील कठीण कला आहे. या कलेंत कान आणि डोळे या दोहोंचें समाधान करावें लागतें. एखाद्या देखाव्याचें चित्र काढावयाचें असलें आणि त्यांत एकच गोष्ट दाखवायची असली तर तें सोपें असतें. पण अनेक गोष्टी चित्रित करूनहि त्या सगळ्यांच्या द्वारें एकाच मध्यवर्ती गोष्टीकडे लक्ष आकर्षिणें हें फार कठीण कार्य आहे. रंगभूमीची व्यवस्थादेखील तशीच कठीण आहे. मध्यवर्ती कल्पनेला कोणताहि धक्का न लावतां तेथे विभिन्न गोष्टी एकत्र आणाव-याच्या असतात.

## संगीत

ध्रुपद आणि ख्याल इत्यादींत शास्त्र आहे, पण 'माथुर', 'विरह' आदि तत्सम रचनांचा अंतर्भाव ज्यांत होतो अशा 'संकीर्तन' या प्रकारामधे खरें संगीत आहे, कारण तें भावपूर्ण असतें. भाव हाच सगळ्या गोष्टींचा आत्मा आणि रहस्य होय. सामान्यजन जीं गाणीं गातात त्या लोकगीतांत अधिक संगीत असतें, आणि हीं लोकगीतें गोळा केलीं पाहिजेत. ध्रुपद आदींचें

शास्त्र जर संकीर्तनांतील संगीतांत उपयोजितां आलें तर त्यायोगें पूर्ण स्वरूपाचें संगीत निर्माण होईल.

## मंत्र आणि मंत्रचैतन्य

कांही शब्द गुरुशिष्यपरंपरेने चालत आलेले असतात आणि त्यांचा केवळ उच्चार केला असतां कोणत्या ना कोणत्या प्रकारचा साक्षात्कार घडतो असा मंत्रशास्त्र्यांचा (मंत्रसिद्धान्ताच्या पुरस्कर्त्यांचा) विश्वास आहे. मंत्रचैतन्य या शब्दाचे दोन निरनिराळे अर्थ आहेत. कांही लोकांचें असें मत आहे की एखाद्या मंत्राचा जप केला असतां, त्या मंत्राची जी इष्टदेवता असेल तिचें दर्शन घडतें. इतर कांही लोक त्याचा अर्थ निराळा लावतात. ते म्हणतात, एखाद्या अनधिकारी गुरुकडून जर तुम्हांला मंत्र मिळाला तर विशिष्ट विधि करून त्या मंत्राला चेतन करावें लागतें, आणि त्यानंतरच त्याच्या जपाने इष्टप्राप्ति होते. अशा प्रकारच्या चेतन मंत्रांचीं निरनिराळीं लक्षणें असतात. पण सर्वसामान्य लक्षण असें आहे की कोणताहि त्रास न होतां, त्या मंत्राचा जप पुष्कळ वेळ करतां येईल आणि जप करणाऱ्याचें मन लवकरच एकाग्र होईल. हें तांत्रिक मंत्रांना लागू आहे.

वैदिक कालापासून मंत्रांविषयी दोन भिन्न मतें आढळतात. यास्क आणि इतर कांहीजण वेदांना अ[illegible]असल्याचें सांगतात, परंतु प्राचीन मंत्रशास्त्री वेदांना अर्थ नाही असें प्रतिपादन करतात. त्यांचें म्हणणें असें की, विशिष्ट यज्ञांत वेदांतील विशिष्ट मंत्रांचा उच्चार करणें हाच वेदांचा उपयोग होय. असें केल्याने निरनिराळ्या प्रकारचे भोग निश्चितपणें प्राप्त होतील किंवा आध्यात्मिक ज्ञानाचा लाभ होईल. आध्यात्मिक ज्ञान हें औपनिषदिक मंत्रपठनाने प्राप्त होईल.

## ईश्वरविषयक कल्पना

जो मुक्त आहे, म्हणजे जो प्रकृतीच्या नियमांच्या पलीकडे आहे असा कोणीतरी शोधून काढण्याची तळमळ मनुष्याच्या हृदयांत असते. वेदान्ती हे अशा नित्य ईश्वरावर विश्वास ठेवतात, तर बौद्ध आणि सांख्य हे फक्त 'जन्येश्वरा'वर विश्वास ठेवतात. जन्येश्वर म्हणजे निर्मिलेला ईश्वर; जो पूर्वी मनुष्य होता, पण आध्यात्मिक साधनेच्या द्वारें जो ईश्वर झाला तो जन्येश्वर होय. अवतारवादाच्या द्वारें पुराणांनी या दोन्ही मतांचा समन्वय घडवून आणला आहे. त्यांचें म्हणणें असें आहे की जन्येश्वर म्हणजे दुसरा कोणी नसून नित्य ईश्वरच मायेने जन्येश्वराचें रूप धारण करतो. नित्य ईश्वराच्या सिद्धान्ताच्या विरुद्ध सांख्य म्हणतात की 'मुक्त झालेला आत्मा जगाची निर्मिति कशी करील?' पण त्यांचें हें म्हणणें खोटया आधारावर आधारलेलें आहे, कारण, मुक्त आत्म्याला 'तुम्ही अमुक अमुक करा' असें आपण सांगू शकत नाहीं. तो स्वतंत्र आहे, स्वाधीन आहे, म्हणजेच त्याला जें आवडेल तें तो करील. वेदान्ताच्या मतें जन्येश्वर हा विश्वाची निर्मिति, त्याचें रक्षण किंवा त्याचा नाश करूं शकत नाही—त्याच्या ठिकाणीं सृष्टिस्थिति-लयाचें सामर्थ्य नसतें.

## अन्न

'मनुष्य बना' असें तुम्ही लोकांना शिकवितां, पण तुम्ही त्यांना चांगलें अन्न मात्र देऊं शकत नाही. गेलीं चार वर्षें या प्रश्नावर मी विचार करीत आहें. गव्हाच्या दाण्यापासून पोह्यासारखें कांहीतरी बनवितां येईल किंवा काय, असा प्रयोग करून पाहण्याची माझी इच्छा आहे. हें जर जमलें तर रोज आपल्याला निरनिराळ्या प्रकारचें अन्न मिळूं शकेल. पिण्याच्या पाण्यासाठी-

देखील आपल्या देशाला उपयोगी पडेल असें एक फिल्टर (पाणी गाळून शुद्ध करण्याचें यंत्र) शोधण्याचा मीं प्रयत्न केला. चिनी मातीचें पसरट भांड्याच्या आकाराचें एक फिल्टर मला आढळलें. त्याच्यांतून पाणी झिरपविलें की सगळे जंतु त्या भांड्यांतच अडकून राहत. पण अशाने हळूहळू तें फिल्टरच जंतूंचें माहेरघर होऊन बसतें. सगळ्या फिल्टरांमधे हाच धोका असतो. पुष्कळ दिवस शोध केल्यानंतर पाणी शुद्ध करण्याची पद्धति मला सापडली. या पद्धतीनुसार पाण्याची वाफ करून पुनः त्या वाफेचें पाणी बनवितात व त्यांत प्राणवायु मिसळतात. या पद्धतीने अतिशय शुद्ध पाणी प्राप्त होतें. तें इतकें शुद्ध असतें की तें उपयोग करणाऱ्याच्या शरीरप्रकृतींत सुधारणा ही झालीच पाहिजे.

## संन्यासी आणि गृहस्थ

संन्यासी आणि गृहस्थाश्रमी यांच्या कर्तव्याबद्दल बोलतांना स्वामीजी म्हणाले:—

संन्यासी जोंपर्यंत परमहंस या उच्च पदाला पोहोचत नाही तोंपर्यंत कांही नियम त्याने अगदी कडकपणें पाळले पाहिजेत. अन्न, शय्या अथवा तत्सम इतर ज्या ज्या वस्तूंना गृहस्थाश्रमी माणसाचा स्पर्श झाला असेल किंवा त्याने त्या वापरल्या असतील त्या संन्याशाने टाळल्या पाहिजेत. हें कांही त्याने गृहस्थांविषयीच्या तिरस्काराच्या बुद्धीने करावयाचें नाही, तर आत्मरक्षणासाठी करावयाचें. गृहस्थाश्रमी माणसाने "नमो नारायणाय" असें म्हणून संन्याशास नमस्कार करावा. आणि संन्याशाने गृहस्थाश्रमी माणसाला आशीर्वाद द्यावा.

मेरुसर्षपयोर्यद्वत् सूर्यखद्योतयोरिव ।
सरित्सागरयोर्यद्वत् तथा भिक्षुगृहस्थयोः ॥

--"मेरू पर्वत आणि मोहरी, सूर्य आणि काजवा, समुद्र आणि ओहोळ यांत जितकें अंतर असतें तितकेंच संन्यासी आणि गृहस्थाश्रमी यांच्यांत असतें."

स्वामी विवेकानंदांनी हा श्लोक प्रत्येकाकडून म्हणवून घेतला. नंतर वेदान्तांतील कांही श्लोकांचें उच्चारण करून ते म्हणाले, "या श्लोकांची तुम्ही आपल्या मनांत नेहमी आवृत्ति करावी. 'श्रवण' याचा अर्थ केवळ गुरूकडून ऐकणें एवढाच नाही, तर स्वतः त्याची पुनरावृत्ति करणें असाहि त्याचा अर्थ होतो. 'आवृत्तिरसकृदुपदेशात्'--'शास्त्रप्रणीत सत्यांची सर्वदा आवृत्ति करावी, कारण शास्त्रांनी पुनः पुनः हेंच सांगितलें आहे'--या वेदान्तसूत्रांत व्यासांनी आवृत्तीवर भर दिला आहे."

## गुरूचा अधिकार

एकदा संभाषणाच्या ओघांत स्वामीजी आवेशाने म्हणाले-- सोडा तुमच्या त्या व्यापारी वृत्तीच्या हिशेबी कल्पना ! एखाद्या गोष्टीच्या आसक्तीपासून जरी तुम्ही मुक्त झालांत तरी तुम्ही मोक्षाच्या मार्गाला लागलांत म्हणून समजा वेश्या, साधु आणि पापी यांच्याकडे भेददृष्टीने पाहूं नका. ती दुर्वर्तनी स्त्रीसुद्धा जगन्माताच आहे. ती माता आहे असें संन्यासी एकदोनदा म्हणतो, पण मग तो पुनः भ्रमांत पडतो आणि म्हणतो, 'दूर हो ! हे अधम दुश्चरित्र स्त्रिये !"

एका क्षणांत तुमचें सगळें अज्ञान नाहीसें होऊं शकतें. अज्ञान हळूहळू नाहीसें होतें असें म्हणणें म्हणजे केवळ मूर्खपणाची बडबड आहे. अशाहि शिष्यांचीं उदाहरणें आढळतात की गुरु आपल्या आदर्शापासून ढळले तरीहि शिष्य त्यांच्याशीं एकनिष्ठ राहिले. राजपुतान्यांत मला असला एक शिष्य आढळला. त्याचे गुरु

ख्रिस्ती झाले असूनहि तो त्यांना जें द्यावयाचें तें नियमितपणें देत असे. तुमच्या पाश्चिमात्य कल्पना सोडून द्या. एकदा ज्या एका विशिष्ट गुरूंच्या ठिकाणीं तुम्हीं आपली श्रद्धा अर्पण केली, त्यांनाच आपल्या सर्व शक्तीनिशीं चिकटून राहा. वेदान्तामधे नीतिमत्ता नाही असें म्हणणारे लोक केवळ शिशुवत् आहेत. पण एका अर्थाने त्यांचें म्हणणें बरोबरहि आहे. वेदान्त हा नीतिमत्तेहून अतीत आहे. तुम्ही संन्यासी झालां आहांत तेव्हा उच्च गोष्टींविषयीच बोलत जा.

जोर करून, खूप प्रयत्न करून निदान एका वस्तूला तरी ब्रह्मस्वरूप माना. अर्थातच रामकृष्णांना ईश्वर मानणें सोपें आहे. पण यांत इतरांबद्दल ईश्वरबुद्धि बाळगणें अशक्य होण्याचा धोका आहे. ईश्वर नित्य, निराकार, ...आणि सर्वव्यापी आहे. त्या ईश्वराने एखादा आकार धारण केला आहे असें म्हणणें म्हणजे ईश्वरनिंदाच होय. मूर्तिपूजेचें खरें रहस्य यांतच आहे की तिच्याद्वारें निदान एका गोष्टीबद्दल तरी ईश्वरबुद्धि विकसित करण्याचा तुम्ही प्रयत्न करतां.

## श्रीरामकृष्ण आणि त्यांचीं मतें

अवतार शब्दाचा जो अगदी स्थूल अर्थ आहे त्याच दृष्टीने श्रीरामकृष्ण स्वत:ला ईश्वरावतार समजत असत. मला तें समजत नसे. वेदान्तदृष्टचा ते ब्रह्म आहेत असें मी म्हणें; पण त्यांच्या महासमाधीच्या थोडयाच पूर्वी एक घटना घडली. ते अत्यवस्थ होते, श्वासोच्छ्वासाचा तो विशिष्ट त्रास होऊं लागला होता. तें दृश्य पाहून मी मनांत विचार करूं लागलों––"या वेदनामय स्थितींतहि 'मी अवतार आहें' असें हे म्हणूं शकतील काय ?" तत्क्षणींच ते मला म्हणाले, "जो राम आणि कृष्ण होता तोच

आता प्रत्यक्षपणें रामकृष्ण झाला आहे—पण तुझ्या त्या वेदान्ताच्या अर्थानें नव्हे बरें ! " त्यांचें माझ्यावर अत्युत्कट प्रेम होतें. त्यामुळे कित्येकजण माझा मत्सर करूं लागले होते. एका दृष्टिक्षेपांतच ते कोणाचेंहि चारित्र्य ओळखून घेत असत, आणि त्यांना आपलें मत कधीहि बदलावें लागत नसे. ते जणु अतींद्रिय गोष्टी प्रत्यक्ष पाहूं शकत असत. तुम्हीआम्ही एखाद्याचें चारित्र्य तर्कबुद्धीने जाणतों. परिणामत: आपले निर्णय बहुधा खोटे ठरतात. कांही निवडक व्यक्तींना ते आपल्या अंतरंगींचे भक्त म्हणत असत आणि स्वत:च्या स्वरूपाविषयीचीं अनेक गुह्यें व योगांतील रहस्यें ते त्यांना शिकवीत असत. आज ज्यांना आपण 'श्रीरामकृष्णांचीं वचनें' म्हणून ओळखतों, त्या दृष्टान्तकथा ते बहिरंगांतील लोकांना सांगत असत. तरुण मंडळींना (अंतरंगींच्या भक्तांना) ते आपल्या कार्यासाठी तयार करीत असत. या तरुण मंडळींबद्दल पुष्कळ लोक त्यांच्याकडे तक्रारी करीत, पण ते कधीहि तिकडे लक्ष देत नसत. केवळ वागणूक लक्षांत घेतां त्यांच्या अंतरंगांतल्या एखाद्या भक्तापेक्षा बहिरंगांतील एखाद्या विशिष्ट व्यक्तीविषयी माझें मत कदाचित् अधिक चांगलें असेल, पण त्यांच्या अंतरंग-भक्तांविषयी माझ्या हृदयांत अतिरिक्त आदर आहे, मग त्याला तुम्ही हवा तर अंध आदर म्हणा. 'माझ्यावर प्रेम असेल, तर माझ्या कुत्र्यावरहि प्रेम करा' अशा अर्थाची एक इंग्रजी म्हण आहे. त्या ब्राह्मण पुजाऱ्यावर (भगवान श्रीरामकृष्णांवर) माझें फार उत्कट प्रेम आहे. आणि म्हणूनच ज्या ज्या गोष्टींवर ते प्रेम करीत असत आणि ज्या ज्या गोष्टींविषयी त्यांना आदर वाटत असे त्या सर्व गोष्टींवर माझेंहि प्रेम आहे. मला जर मोकळें सोडलें तर मी एखादा पंथ निर्माण करीन अशी त्यांना माझ्या-

बद्दल भीति वाटत होती.

कांहीजणांना ते म्हणत असत की या जन्मीं तुम्हांला धर्मलाभ होऊं शकणार नाही. त्यांना सगळ्या गोष्टी प्रत्यक्ष दिसत असत; आणि म्हणूनच कांही व्यक्तींच्या बाबतींत त्यांची वागणूक सकृद्दर्शनीं पक्षपातीपणाची दिसत असे. भिन्न भिन्न स्वभावांच्या लोकांशीं भिन्नभिन्नपणें वागावयास हवें हें तत्त्व त्यांना एखाद्या विज्ञानवेत्त्याप्रमाणे स्पष्टपणें उमजलें होतें. अंतरंगांतल्या भक्तांखेरीज इतर कोणासहि ते आपल्या खोलींत झोपूं देत नसत.

ज्यांनी श्रीरामकृष्णांना पाहिलें नाही त्यांना मुक्ति मिळणार नाही हें म्हणणें कांही खरें नाही. तद्वतच, ज्यांनी त्यांना तीनदा पाहिलें त्यांना निश्चित मुक्ति मिळणार हेंहि खरें नाही.

अधिक उच्च प्रतीचा साधनोपदेश ग्रहण करण्यास जे असमर्थ होते अशा सर्वसाधारण लोकांना नारदांनी सांगितलेल्या भक्तिमार्गाचा ते उपदेश करीत असत.

ते बहुधा द्वैताचा उपदेश देत असत. अद्वैताची शिकवण साधारणपणें ते देत नसत. पण मला मात्र त्यांनी अद्वैत शिकविलें. आधी मी द्वैती होतों.

## राष्ट्राचा आदर्श : श्रीरामकृष्ण

देशाला जर आपली उन्नति करून घ्यावयाची असेल तर त्यानें आपल्यासमोर उच्च आदर्श ठेवलाच पाहिजे. अमूर्त ब्रह्म हाच अर्थात् तो आदर्श होय. पण एखादा अमूर्त आदर्श सर्वांनाच कांही स्फूर्ति देऊं शकत नाही. म्हणून सर्वसाधारणांसाठी एखादा मूर्त आदर्श, एखाद्या व्यक्तीचा आदर्श असणें अत्यावश्यक आहे. श्रीरामकृष्णांच्या स्वरूपांत तो आदर्श आपल्याला लाभला आहे. अन्य महापुरुष आपले आदर्श होऊं शकत नाहीत, कारण त्यांचे

दिवस आता गेले. आणि प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांत वेदान्त उतरावा अशी जर आपली इच्छा असेल तर चालू पिढीबद्दल ज्याला सहानुभूती होती असाच पुरुष आपल्याला निवडावा लागेल. ही गोष्ट आपल्याला श्रीरामकृष्णांमधे आढळते. म्हणून सगळ्यांसमोर तुम्ही श्रीरामकृष्णांना आदर्श म्हणून ठेवा. कोणी त्यांना साधु समजो की अवतार मानो, त्यांत मोठेंसें कांही नाही.

'मी पुन्हा एकदा देह धारण करून तुमच्यांत येईन' असें ते म्हणाले होते. तुम्हांला जर काम करायचें असेल तर तुमची अशी एक इष्टदेवता––किंवा ज्याला ख्रिस्ती राष्ट्रें 'संरक्षक देवदूत' ('गार्डियन एंजल') म्हणतात––असली पाहिजे. विभिन्न राष्ट्रांच्या विभिन्न इष्टदेवता आहेत आणि त्यांच्यापैकी प्रत्येकजण वरचढ होण्यासाठी प्रयत्न करीत आहे अशी कल्पना कधीकधी माझ्या मनांत येते. आणि त्याबरोबरच मला असेंहि कधी कधी वाटतें की एखाद्या विशिष्ट देशाचें भलें करण्याची त्याच्या इष्टदेवतेची शक्ति संपुष्टांतहि येत असते.

## येशू ख्रिस्त पुन्हा केव्हा येतील ?

मी अशा गोष्टींची फारशी दखल घेत नाही. माझा संबंध तत्त्वांशीं आहे. मला फक्त हें सांगावयाचें आहे की ईश्वर पुनः-पुन्हा येतो; तो भारतांत कृष्ण, राम, बुद्ध यांच्या रूपाने आला, आणि तो पुन्हा येईल. असें प्रायः दाखवून देतां येतें की दर पांचशे वर्षांनी जग अधोगतीला जातें आणि मग एक प्रचंड आध्यात्मिक लाट येते आणि त्या लाटेच्या शिखरावर एखादा ख्रिस्त असतो.

सध्या सर्व जगभर एक मोठें परिवर्तन घडून येत आहे. आणि हें एक चक्रच आहे. लोकांना असें वाटूं लागलें आहे की आपली

जीवनावरची पकड ढिली होत चालली आहे. कोणत्या दिशेला ते वळतील, वर की खाली ? अर्थात् वरच. ते खाली कसे वळूं शकतील ? खाईंत उडी घ्या, आपल्या शरीरांनी, जीवनांनी ती भरून काढा. आपण जिवंत असतांना जगाला अधोगतीकडे कसें जाऊं द्यावें ?

## मानव आणि ख्रिस्त यांतील भेद

व्यक्त रूप घेतलेल्या जीवांमधे पुष्कळच भेद असतो. व्यक्त जीव या रूपांत तुम्ही केव्हाच ख्रिस्त होणार नाही. मातीचा हत्ती बनवा, त्याच मातीचा उंदीर बनवा. त्यांना पाण्यांत भिजवा. ते एकरूप होतील. माती म्हणून ते सदैव एकच आहेत. आकाराला आलेल्या वस्तूंच्या रूपांत ते नेहमीच भिन्न आहेत. पूर्ण ब्रह्मच ईश्वर व मानव या दोघांचीहि मूल सत्ता आहे. सर्वव्यापी ब्रह्म या दृष्टीने आपण सर्व एकच आहोंत; आणि सगुण व्यक्ति या दृष्टीने ईश्वर हा सनातन स्वामी व आपण सदाचे सेवक आहोंत.

तुमच्यांत तीन पदार्थ आहेत--(१) शरीर (२) मन आणि (३) आत्मा. आत्मा हा इंद्रियातीत आहे; मन व शरीर यांना जन्म आणि मृत्यु आहेत. तुम्ही तें आत्मतत्त्वच आहांत. पण तुम्हांला नेहमी असें वाटतें की आपण म्हणजे शरीर. जेव्हा एखादा मनुष्य 'मी इथे आहें' असें म्हणतो तेव्हा तो शरीराचाच विचार करीत असतो. असे कांही क्षण येतात की जेव्हा तुम्ही सर्वोच्च भूमिकेवर असतां; त्या वेळीं 'मी इथे आहें' असें तुम्ही म्हणत नाही. जेव्हा कोणीं तुमची निंदा अगर निर्भत्सना केल्यानेहि तुम्हांला क्रोध येत नाही तेव्हा तुम्ही आत्मा असतां असें म्हणतां येईल. "जेव्हा मी म्हणजे मन असा मी विचार करतों तेव्हा अनंत अग्निस्वरूप असा जो तूं त्या तुझा मी केवळ एक स्फुलिंग

असतों, आणि जेव्हा मी म्हणजे आत्मा असा माझा अनुभव असतो तेव्हा तूं आणि मी एकच असतों" असें एका भक्ताने ईश्वराला म्हटलें आहे. मन हें आत्म्याहून वरचढ आहे काय ?

ईश्वर कधी तर्क करीत नाही. जेव्हा तुम्हांला ज्ञान असतें तेव्हा तर्काची काय आवश्यकता ? आपल्याला कीटकांप्रमाणे सरपटत, चाचपडत कांही घटना गोळा कराव्या लागतात, व त्यांच्यावर सामान्य सिद्धान्त उभारावे लागतात आणि पुन्हा तो सर्व डोलारा कोसळून पडतो. हें सर्व आपल्या दुर्बलतेचेंच चिन्ह आहे. आत्मा हा मनांत व इतर सर्व गोष्टींत प्रतिबिंबित झालेला असतो. आत्म्याचा प्रकाशच मनाला संवेदनाक्षम करतो. प्रत्येक गोष्ट आत्म्याचीच अभिव्यक्ति आहे. एक एक मन म्हणजे जणु एक एक आरसाच आहे. प्रेम, भय तिरस्कार, सद्गुण, दुर्गुण सर्वकांही आत्म्याचींच प्रतिबिंबें आहेत. आरसा जेव्हा हिणकस असतो तेव्हा प्रतिबिंब वाईट उमटतें, इतकेंच.

## पापापासून मुक्ति

अज्ञानापासून सुटका झाल्यानेच आपली पापापासून सुटका होऊं शकते. अज्ञान हें कारण असून पाप हें त्याचेंच कार्य आहे.

## जगन्मातेकडे परतणें

एखाद्या मुलाला दाई बगिच्यांत घेऊन जाते व ती त्याच्याशीं खेळते. आई त्याला घरांत येण्याविषयी निरोप पाठविते. मूल खेळांत रमलेलें असतें. तें म्हणतें, "मी नाही येत, मला जेवायचें नाही." कांही वेळाने तें मूल खेळाला कंटाळतें आणि म्हणतें, "मी आईकडे जाणार." दाई म्हणते, "अरे, ही पाहा नवी बाहुली." पण मूल म्हणतें, "मला नको आता बाहुली, मी आईकडे जाणार." आणि मग तें रडायला लागतें--आईकडे

जाईपर्यंत. आपण सर्व मुलें आहोंत. ईश्वर आई आहे. आपण धनसंपत्तीसारख्या गोष्टींच्या मागे लागलों आहोंत आणि त्यांच्यांत रमलों आहोंत. पण एक वेळ अशी येईल की जेव्हा आपण भानावर येऊं. तेव्हा ही प्रकृति आपल्याला नवीं खेळणीं देण्याचा प्रयत्न करील आणि आपण म्हणूं, "नको. पुष्कळ झालीं. मी जगन्मातेकडे जाईन."

## ईश्वराहून वेगळें व्यक्तित्व नाही

आपण जर ईश्वराहून वेगळे नाही, त्याच्याशीं जर आपण सदैव एकरूपच आहोंत, तर मग आपल्याला व्यक्तित्व आहे की नाही ? होय, आहे; तें व्यक्तित्व म्हणजेच ईश्वर होय. ईश्वरच आपलें व्यक्तित्व आहे. तुमचें सध्या जें व्यक्तित्व आहे तें खरें व्यक्तित्व नव्हे. खऱ्या व्यक्तित्वाकडे तुम्ही चालला आहांत. ज्याचें विभाजन होऊं शकत नाही तेंच खरें व्यक्तित्व. ज्या अवस्थेंत आपण सध्या आहोंत तिला तुम्ही व्यक्तित्व कसें म्हणूं शकाल ? घटकेंत तुम्ही या प्रकारें विचार करतां, घटकेंत त्या प्रकारें, आणि आणखी एका घटकेनंतर तिसऱ्याच प्रकारें. जें बदलत नाही तेंच व्यक्तित्व. सध्याची आपली अवस्थाच निरंतर राहावी हें किती भयावह आहे ! मग तर चोर हा सदैव चोरच राहील आणि नीच मनुष्य हा सदैव नीचच राहील. एखादें मूल मरण पावलें तर त्याला मूलच राहावें लागेल. खरें व्यक्तित्व तेंच की जें कधी बदलत नाही व बदलणार नाही, आणि तें म्हणजेच आपल्यांतील ईश्वर होय.

# व्याख्यानाचीं टिपणें आणि अहवाल

## मनुष्य हाच स्वतःच्या भवितव्याचा निर्माता आहे

दक्षिण भारतांत एक अत्यंत सामर्थ्यशाली राजघराणें होतें. त्या घराण्यांतील राजांनी प्रमुख व्यक्तींच्या कुंडल्या त्यांच्या त्यांच्या जन्मवेळांवरून तयार करण्याविषयी नियम केला. त्यावरून केलेली प्रमुख घटनांचीं भाकितें त्यांनी लिहून ठेवलीं आणि नंतर पुढे त्या घटना जशा घडल्या तशा त्या पाहून त्या भाकितांचा पडताळा घेतला गेला. हा क्रम सुमारें हजार वर्षें चालला. त्या अवधींत त्यांचे कांही ताळे जमले, त्यांच्यावरून सामान्य सिद्धान्त बसविण्यांत येऊन ते लिहून काढण्यांत आले व अशा रीतीने एक प्रचंड ग्रंथ तयार झाला. तें राजघराणें नष्ट झालें. पण ज्योतिषांचें घराणें राहिलें व त्यांनी तो ग्रंथ ताब्यांत घेतला. अशा प्रकारें फलज्योतिषशास्त्र अस्तित्वांत आलें असावें असें वाटतें. फलज्योतिषशास्त्राच्या बारीकसारीक गोष्टींकडे अतिरिक्त लक्ष देणें हा एक भ्रमच आहे, आणि त्याने हिंदूंचें पुष्कळ नुकसान केलें आहे.

मला असें वाटतें की ग्रीकांनी प्रथम फलज्योतिषशास्त्र भारतांत आणलें, आणि हिंदूंपासून ग्रहज्योतिषशास्त्र घेऊन तें त्यांनी आपल्याबरोबर युरोपांत नेलें. याचें कारण असें की भारतांत प्राचीन वेदी भूमितीच्या विशिष्ट आकृत्यांना अनुसरून तयार केलेल्या दिसतात, आणि विशिष्ट ग्रह विशिष्ट स्थानीं असतांना

कांही गोष्टी करावयाच्या असत. म्हणून मला असें वाटतें की ग्रीकांनी हिंदूंना फलज्योतिषशास्त्र दिलें आणि हिंदूंनी त्यांना ग्रहज्योतिषशास्त्र दिलें.

मीं असे कांही ज्योतिषी पाहिले आहेत की जे आश्चर्यकारक भाकितें करीत, पण तें भविष्य नुसत्या ग्रहांवरून किंवा तशाच कशावरून तरी ते वर्तवीत यावर मी विश्वास ठेवूं शकत नाहीं. कित्येक बाबतींत तें केवळ मनांतील विचार ओळखणेंच असतें. कांही वेळां आश्चर्यकारक भविष्य वर्तविलें जातें, पण पुष्कळ वेळां वर्तविलेलें भविष्य कवडीमोलाचें असतें.

लंडनमधे एक तरुण माझ्याकडे येत असे आणि मला विचारीत असे, "पुढच्या वर्षी माझें काय होणार आहे?" "तूं असें कां विचारतोस?" असें मीं त्याला विचारलें. तो म्हणाला, "माझी सर्व संपत्ति नष्ट झाली आहे, आणि मी फार गरीब झालों आहें." पैसा हेंच पुष्कळांचें दैवत असतें. कमकुवत माणसें जेव्हा सर्वस्व गमावतात व स्वतःला अत्यंत दुर्बल समजतात तेव्हा ते पैसा मिळविण्याच्या सर्व प्रकारच्या गूढ मार्गांचा अवलंब करून पाहतात आणि ज्योतिष वगैरेकडे वळतात. "भ्याड व मूर्ख मनुष्यच 'हें दैव आहे' असें म्हणतो" असें एक संस्कृत सुभाषित आहे. पण जो मनुष्य बलवान असतो तो उठून उभा राहतो आणि म्हणतो, "मी माझें दैव घडवीन." म्हातारीं होऊं लागलेलीं माणसेंच दैवाविषयी बोलतात. तरुण माणसें सामान्यतः ज्योतिष-शास्त्राकडे वळत नाहीत. आपण ग्रहांच्या प्रभावाखाली असूं, पण त्याची आपण फारशी पर्वा करूं नये. बुद्ध म्हणतात, "जे लोक ग्रहांचीं गणितें करून किंवा अशाच एखाद्या फसव्या क्लृप्तीचा अवलंब करून उपजीविका चालवितात त्यांच्यापासून

दूर राहिलें पाहिजे." बुद्धांचें म्हणणें बरोबर असलें पाहिजे, कारण ते सर्वश्रेष्ठ हिंदु होते. ग्रह आपलें कार्य करोत, त्यांत काय बिघडतें? एखादा ग्रह माझ्या जीवनांत व्यत्यय आणीत असेल तर असलें जीवन कवडीमोलाचें आहे. तुमच्या हें ध्यानांत येईल की फलज्योतिष आणि तत्सदृश सर्व गूढ गोष्टी या सामान्यतः दुर्बल मनाचीं लक्षणें होत. म्हणून आपल्या मनांत त्यांनी ठाण दिलें आहे असें लक्षांत येतांच एखाद्या वैद्याकडे जा, चांगलें अन्न घ्या आणि विश्रांति घ्या.

एखाद्या घटनेचें स्पष्टीकरण जर तिच्या आंतूनच मिळूं शकत असेल तर तिच्या बाहेर स्पष्टीकरण शोधणें मूर्खपणाचें आहे. जग जर स्वतःच स्वतःचें स्पष्टीकरण करीत असेल तर त्यासाठी जगाच्या बाहेर शोध घेणें मूर्खपणाचें आहे. मनुष्याच्या जीवनांतील अशी एकतरी घटना तुम्हांला आढळते काय की जी मनुष्याच्याच सामर्थ्याच्या द्वारें स्पष्ट करतां येत नाही? मग ग्रहांकडे किंवा जगांतील इतर कोणत्याहि वस्तूकडे धाव घेण्यांत काय अर्थ आहे? माझ्या सद्यःस्थितीचें स्पष्टीकरण करण्याला माझें स्वतःचें कर्मच पुरेसें आहे. हीच गोष्ट येशू ख्रिस्तांच्या बाबतींतहि म्हणतां येईल. त्यांचे वडील केवळ एक सुतार होते हें आपल्याला माहीत आहे. त्यांच्या सामर्थ्याचें स्पष्टीकरण करण्यासाठी आपल्याला दुसऱ्या कोणाकडे पाहण्याची गरज नाही. ते स्वतःच्या भूतकालाचा परिपाक होते, त्यांतूनच येशू ख्रिस्त पुढे तयार झाले. बुद्धांनी आपला पूर्वजन्मवृत्तान्त सांगतांना तो पशूंच्या जन्मापर्यंत मागे नेला आणि क्रमाने विकास पावत पावत शेवटीं बुद्धावस्था कशी प्राप्त झाली हें त्यांनी सांगितलें. तेव्हा या गोष्टीच्या स्पष्टीकरणासाठी ग्रहांकडे धाव घेण्यांत काय अर्थ

आहे ? त्यांचा थोडाबहुत प्रभाव असेल, पण आपण त्यांच्याकडे लक्ष देऊन हताश होण्यापेक्षा त्यांच्याकडे दुर्लक्षच करायला हवें. माझ्या एकूण शिकवणींतील प्रथमावश्यक गोष्ट म्हणून मी तुम्हांला सांगतों की ज्यामुळे आध्यात्मिक, मानसिक किंवा शारीरिक दुर्बलता येईल अशा गोष्टींना स्पर्श देखील करूं नका. धर्म म्हणजे मनुष्यांत स्वभावतःच असलेल्या सामर्थ्याचा आविष्कार आहे. आपल्या या लहानशा शरीरांत अनंत शक्तीची एक स्प्रिंग गुंडाळून ठेवलेली आहे. ती स्वतःच पसरत जाते. आणि जसजशी ती पसरते तसतसें एकेक शरीर तिला अपुरें पडत जातें, ती त्यांना टाकून देते आणि उच्चतर शरीरें धारण करते. असा हा मानवाचा इतिहास आहे; हाच धर्माचा, सभ्यतेचा किंवा प्रगतीचा इतिहास आहे. जो 'प्रचंडशक्तिमान' आत्मा बंदिस्त असतो तो अशाप्रकारें स्वतःला बंधमुक्त करीत असतो. हा सर्व प्रकार नेहमीच सामर्थ्याच्या आविष्काराचा असतो, आणि म्हणून ज्योतिषासारख्या गोष्टींमधे जरी सत्याचा लहानसा कण असला तरी त्या टाळल्या पाहिजेत.

एका ज्योतिष्याची एक जुनी गोष्ट आहे. तो एका राजाकडे गेला आणि म्हणाला, "तूं सहा महिन्याच्या आंत मरणार आहेस." राजा कमालीचा घाबरला आणि भयाने तेथल्या तेथेच मरायला टेकला. पण त्याचा प्रधान चतुर होता. त्याने राजाला सांगितलें की हे ज्योतिषी मूर्ख असतात. राजाचा त्याच्यावर विश्वास बसेना. म्हणून प्रधानाला नाइलाजाने त्या ज्योतिषाला पुनः राजवाड्यांत बोलावणें भाग पडलें. प्रधानाने ज्योतिष्याला विचारलें, "तुझें गणित बरोबर आहे काय ?" ज्योतिषी म्हणाला, "त्यांत चूक राहूंच शकत नाही." तथापि प्रधानाच्या समाधानाकरिता त्याने

सर्व गणित पुन्हा केलें आणि सांगितलें की तें पूर्णपणें बरोबर आहे. राजाचा चेहरा पांढरा फटफटीत झाला. प्रधानाने ज्योतिष्याला म्हटलें, "तुझा मृत्यु केव्हा आहे असें तुला वाटतें?" "बारा वर्षांनी"—ज्योतिषी म्हणाला. प्रधानाने त्वरेने आपलें खडग् उपसलें व त्या ज्योतिष्याचें शिर धडावेगळें केलें, आणि तो राजाला म्हणाला, "पाहिलेंत. हा कसा खोटा आहे? हा याच क्षणीं मरण पावला."

तुम्हांला आपलें राष्ट्र जिवंत ठेवायचें असेल तर अशा सर्व गोष्टींपासून दूर राहा. आपल्याला सामर्थ्यशाली बनविणाऱ्या ज्या गोष्टी असतील त्या चांगल्या. चांगलेपणाची हीच कसोटी आहे. जें चांगलें असतें तें जीवनदायी असतें आणि जें वाईट असतें तें मृत्यूकडे घेऊन जातें. ह्या भ्रामक कल्पना तुमच्या देशांत फार मोठ्या प्रमाणांत वाढत आहेत आणि तर्कदृष्टीच्या अभावीं स्त्रिया त्यांच्यावर चटकन् विश्वास ठेवतात. असें होण्याचें कारण हेंच की स्त्रिया अद्याप स्वातंत्र्य मिळविण्याच्या प्रयत्नांतच आहेत आणि स्वतंत्र बुद्धीने विचार करण्याचें सामर्थ्य त्यांना अजून प्राप्त झालेलें नाही. एखादी स्त्री एखाद्या कादंबरीच्या आरंभीं छापलेल्या काव्याच्या ओळी पाठ करते आणि म्हणते "मला ब्राउनिंगच्या सर्व कविता माहीत आहेत." दुसरी एखादी स्त्री तीनचार भाषणें ऐकते आणि समजते की आपल्याला जगांतील प्रत्येक गोष्टीचें ज्ञान झालें आहे. अडचण अशी आहे की स्त्रीसुलभ भ्रामक समजुती सोडण्याला त्या असमर्थ आहेत. त्यांच्याजवळ पुष्कळसा पैसा आहे, थोडेंबहुत बौद्धिक शिक्षण त्यांना मिळालें आहे, पण या संक्रमणावस्थेंतून जेव्हा त्या पार होतील आणि जेव्हा त्यांचें मन दृढ आणि स्थिर होईल तेव्हा त्यांचें सर्वकांही

ठीक होईल. पण ढोंगी लोक यांना फसवीत आहेत. वाईट वाटूं देऊं नका; कोणालाहि दुखवण्याचा माझा हेतु नाही; पण मला सत्य सांगितलेंच पाहिजे. या सर्व गोष्टींचा तुमच्यावर किती प्रभाव पडतो हें तुम्हांला दिसत नाही काय? स्त्रिया किती निष्कपट आहेत हें तुम्ही पाहत नाही काय? सर्वांच्या ठायीं सुप्त असलेलें ईश्वरत्व कधीच नष्ट होत नाही. त्या ईश्वरत्वाला कसें आवाहन करावें हेंच जाणून घेतलें पाहिजे.

जसजसें माझें वय वाढत आहे तसतशी दर दिवसाला माझी खात्री पटत चालली आहे की प्रत्येक मानव हा स्वरूपतः ईश्वर आहे. कोणतीहि स्त्री किंवा कोणताहि पुरुष कितीहि अधम का असेना, त्यांच्यामधील ईश्वरत्व कधीहि नष्ट होत नाही. फक्त या ईश्वरत्वाप्रत कसें पोहोचावें हें त्या स्त्रीला किंवा पुरुषाला माहीत नसतें, इतकेंच. हे लोक सत्याची प्रतीक्षा करीत असतात आणि दुष्ट लोक नाना प्रकारच्या मूर्खतापूर्ण गोष्टींनी त्यांना फसविण्याचा प्रयत्न करीत असतात. एखादा मनुष्य दुसऱ्याला पैशासाठी फसवितो तेव्हा त्याला तुम्ही मूर्ख व बदमाष म्हणतां, पण जो दुसऱ्याला आध्यात्मिक क्षेत्रांत फसवूं पाहतो त्याचें पाप केवढें मोठें म्हणावें लागेल! हें फार वाईट आहे. सत्य हें तुम्हांला बलशाली करणारें असलें पाहिजे, त्याने तुम्हांला भ्रामक समजुतींतून वर काढलें पाहिजे. सत्याची हीच एकमेव कसोटी आहे. तत्त्वज्ञाचें हें कर्तव्य आहे की त्याने तुम्हांला भ्रामक समजुतींतून वर काढलें पाहिजे. हें जग, हें शरीर, हें मन देखील भ्रमच आहे. तुम्ही अनंत आत्मा आहांत! आणि या लुकलुकणाऱ्या ताऱ्यांनी तुम्ही फसविलें जातां! ही लज्जास्पद गोष्ट आहे. तुम्ही ईश्वर आहांत. या लुकलुकणाऱ्या ताऱ्यांचें अस्तित्व तुमच्यामुळेच आहे.

एकदा मीं हिमालयांतून प्रवास करीत होतों. लांबच लांब मार्ग आमच्यापुढे पसरला होता. आम्ही गरीब संन्यासी ! आम्हांला उचलून कोण नेणार ? म्हणून आम्हांला सर्व मार्ग पायींच आक्रमिणें भाग होतें. आमच्याबरोबर एक वृद्ध संन्यासी होता. शेकडो मैलपर्यंत रस्ता चढउताराचा होता. जेव्हा त्या वृद्ध संन्याशाने हें पाहिलें तेव्हा तो म्हणाला, "महाराज ! हा रस्ता कसा पार करायचा ? माझ्याने आता चालवणार नाही. माझी छाती फुटून जाईल." मी त्याला म्हणालों, "तुम्ही खाली आपल्या पायाकडे पाहा." त्याने तसें केलें. मग मी म्हणालों : "तुमच्या पायाखाली जो रस्ता आहे तो तुम्हीं आक्रमिलेला आहे. आणि तोच रस्ता तुमच्यासमोर तुम्ही पाहत आहांत. तोहि लवकरच तुमच्या पायाखाली येईल." उच्चतम वस्तुहि तुमच्या पायाखाली आहेत, कारण तुम्ही दिव्य तारका आहांत--ईश्वर आहांत. सर्व वस्तु तुमच्या पायाखाली आहेत. वाटल्यास तुम्ही तारे मुठींत घेऊन गिळूंहि शकतां. असें आहे तुमचें खरें स्वरूप. बलवान व्हा. सर्व प्रकारच्या भ्रमांच्या पलीकडे जा आणि मुक्त व्हा.

# सगुण व निर्गुण ईश्वर

ज्याला तुम्ही सगुण ईश्वर म्हणतां तोच निर्गुण ब्रह्महि आहे असें माझें मत आहे. तो ईश्वर एकाच वेळीं सगुण व निर्गुण आहे. आपण सगुण रूप धारण केलेलें निर्गुण ब्रह्म आहोंत. निरपेक्ष दृष्टीने पाहिल्यास आपण निर्गुण आहोंत, सापेक्ष दृष्टीने विचार केल्यास आपण सगुण आहोंत. आपल्यापैकी प्रत्येकजण सर्वव्यापी आहे, विश्वरूप आहे. सकृद्दर्शनी हें म्हणणें धक्का देणारें वाटेल, पण मी तुमच्यासमोर उभा आहें याची मला जेवढी खात्री वाटते तेवढ्याच खात्रीने मी उपर्युक्त सत्य जाणतों.

आत्मा सर्वव्यापी नसणें कसें शक्य आहे ? आत्म्याला लांबी, रुंदी, जाडी किंवा अन्य कोणताहि जडत्वदर्शक गुण नाही; आणि आपण सर्व जर आत्मे असूं तर आपण स्थलाने मर्यादित असूं शकत नाहीं. स्थल हें स्थलालाच मर्यादित करतें, जड हें जडालाच सीमित करतें. आपण या शरीरापुरतेच मर्यादित असतों तर आपण एखादा जड पदार्थ ठरलों असतों. तसें झालें असतें तर शरीर, आत्मा सर्वकांही जड ठरलें असतें, आणि 'शरीरांत राहणारा', 'आत्मा शरीर धारण करतो' इत्यादि शब्दांना सोयीसाठी वापरलेल्या शब्दांपलीकडे कांही अर्थ राहिला नसता. तुमच्यापैकी पुष्कळांना आत्म्याची मीं केलेली व्याख्या आठवत असेल. प्रत्येक आत्मा एक वर्तुळ असून त्याचा मध्यबिंदु एकाच ठिकाणीं आहे व परिघ कोठेच नाही. शरीर जिथे आहे तिथेच हा मध्यबिंदु आहे आणि तिथेच क्रिया प्रकट होते. तुम्ही सर्व-

व्यापी आहांत. एकाच मध्यबिंदूंत तुम्ही केंद्रित आहांत अशी तुमची जाणीव असते, एवढेंच. हा मध्यबिंदु जडकण गोळा करून, स्वतःच्या प्रकटीकरणासाठी एक साधन तयार करतो. ज्याच्या द्वारें तो स्वतःला प्रकट करतो त्या साधनाला 'शरीर' म्हणतात. म्हणून तुम्ही सर्वत्र आहांत. एक शरीर अथवा साधन जेव्हा निकामी होतें तेव्हा मध्यबिंदु म्हणजेच तुम्ही पुढे सरकतां आणि दुसरे स्थूल किंवा सूक्ष्म असे जडकण गोळा करून त्यांच्या द्वारें कार्य करतां. मनुष्य हा असा आहे. आणि ईश्वर कसा आहे ? ईश्वर हें असें वर्तुळ आहे की ज्याचा परिघ कोठेच नाही आणि मध्यबिंदु मात्र सर्वत्र आहे. त्या वर्तुळांतील प्रत्येक बिंदु चेतन, कार्यक्षम आणि सारखाच कार्यरत आहे. आम्हां समर्याद जीवात्म्यांच्या बाबतींत फक्त एकच बिंदु चेतन असून तोच मागे-पुढे सरकत असतो. ज्याप्रमाणे विश्वाच्या तुलनेने शरीराचें अस्तित्व अत्यल्प आहे त्याचप्रमाणे ईश्वराच्या तुलनेने विश्व हें नगण्य आहे. जेव्हा आपण 'ईश्वर बोलतो' असें म्हणतों तेव्हा आपण म्हणतों की तो आपल्या विश्वाच्या माध्यमांतून बोलतो, आणि जेव्हा 'तो दिक्कालातीत आहे' असें आपण म्हणतों तेव्हा आपण म्हणतों की तो एक निर्गुण सत्ता आहे. पण तरी तो एकच आहे.

एक उदाहरण देतां येईल. आपण इथे उभे राहून सूर्य पाहतों. समजा तुम्हांला सूर्याकडे जायचें आहे. कांही सहस्र मैल सूर्याजवळ गेल्यानंतर तुम्हांला एक निराळाच सूर्य दिसेल व तो बराच मोठा असेल. समजा तुम्ही आणखी जवळ गेलांत तर तुम्हांला आणखी मोठा सूर्य दिसेल. शेवटीं तुम्ही जेव्हा खरा सूर्य पाहाल तेव्हा तो कोटयवधि मैल पसरलेला तुम्हांला दिसेल.

समजा तुम्ही या प्रवासाचे कांही टप्पे पाडले आणि प्रत्येक टप्प्यावरून दिसणाऱ्या सूर्याचा फोटो घेतला. खऱ्या सूर्याचा फोटो घेऊन परत आल्यावर ते सर्व फोटो एकमेकांशीं ताडून पाहिलें तर काय दिसेल? प्रत्येक फोटो वेगळा दिसेल, कारण सूर्य प्रथम एका लाल चेंडूसारखा दिसला होता, आणि खरा सूर्य त्याहून कितीतरी विशाल होता. तरीपण त्या सर्व फोटोंतील सूर्य एकच आहे. ईश्वराच्या बाबतींतहि असेंच आहे, तें अनंत ब्रह्म आपण निरनिराळ्या दृष्टिकोनांतून व निरनिराळ्या मनोभूमिकांवरून पाहतों. अगदी खालच्या भूमिकेवरील माणूस त्याला एक पूर्वज म्हणून पाहतो. त्याची दृष्टि थोडी उंचावली की तो त्याला एका ग्रहाचा स्वामी म्हणून पाहतो. दृष्टि आणखी थोडी उंचावली की तो त्याला संपूर्ण विश्वाचा स्वामी म्हणून पाहतो, आणि सर्वोच्च भूमिकेवरील मनुष्य त्याला आत्मरूप पाहतो. ईश्वर तोच; त्याचीं भिन्न दर्शनें म्हणजे केवळ दृष्टीच्या सामर्थ्यातील तारतम्यामुळे झालेले भेद होत.

# अवतार

येशू ख्रिस्त हे ईश्वर होते. मनुष्यरूप धारण केलेले ते सगुण ईश्वर होते. ईश्वर अनेक वेळां अनेक रूपांनी व्यक्त झाला आहे. त्या व्यक्त रूपांचीच तुम्ही उपासना करूं शकतां. ईश्वराच्या निर्गुण, निरपेक्ष स्वरूपाची उपासना करायची नसते. अशा ईश्वराच्या उपासनेला कांही अर्थ नसतो. येशू ख्रिस्तांची, त्या मानवी रूपाची ईश्वर म्हणून आपण उपासना करावी. ईश्वराच्या व्यक्त रूपाहून अधिक उच्च अशा कशाचीहि आपण उपासना करूं शकत नाहीं. जितक्या लवकर तुम्ही ख्रिस्तांहून वेगळ्या अशा ईश्वराची उपासना करण्याचें सोडून द्याल ततकें तुमच्या हिताचें आहे. तुम्हीं मनाने कल्पिलेल्या जिहोवाचा आणि आदर्शरूप येशू ख्रिस्तांचा विचार करून पाहा. जेव्हा तुम्ही ख्रिस्तांहून भिन्न व त्यांच्या पलीकडचा ईश्वर कल्पनेने घडविण्याचा प्रयत्न करतां तेव्हा तुम्ही सर्वकांही नष्ट करून टाकतां. ईश्वरच फक्त ईश्वराची उपासना करूं शकतो. हें मनुष्याच्या अधिकारांतलें नाही. आणि त्याच्या सामान्य मानवी व्यक्त रूपाच्या पलीकडे जाऊन त्याची उपासना करण्याचा प्रयत्न हा मानवजातीला धोक्याचा आहे, तुम्हांला मुक्ति हवी असेल तर ख्रिस्तांना चिटकून राहा. तुमच्या कल्पनेंतील कोणत्याहि ईश्वरापेक्षा ते श्रेष्ठ आहेत. तुम्ही ख्रिस्तांना मनुष्य समजत असाल तर त्यांची उपासना करूं नका. पण ते ईश्वर आहेत अशी तुम्हांला जाणीव होतांच तुम्ही त्यांची उपासना करा. जे लोक येशू ख्रिस्त

हे मनुष्य होते असें म्हणतात अणि त्यांची उपासना करतात ते ईश्वराचा अवमान करतात. असा अर्धवटपणा उपयोगाचा नाही. येशू ख्रिस्तांच्या यथार्थ उपासनेचा संपूर्ण अर्थ स्वीकारला पाहिजे. "ज्याने पुत्राचें दर्शन घेतलें त्याने पित्याचेंहि दर्शन घेतलें." आणि पुत्राच्या (येशू ख्रिस्तांच्या) दर्शनाशिवाय तुम्हांला पित्याचें (ईश्वराचें) दर्शन घडणें शक्य नाही. "आम्हांला तसें दर्शन घडलें आहे" असें म्हणणें म्हणजे लंब्या बाता मारणें, पोकळ तत्त्वज्ञान, स्वप्नरंजन किंवा निव्वळ तर्क होय. तुम्हांला खरोखरीच आध्यात्मिक जीवनावर प्रभुत्व मिळवायचें असेल तर येशू ख्रिस्तांच्या रूपाने प्रकट झालेल्या ईश्वराला चिटकून राहा.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने बोलायचें तर ख्रिस्त किंवा बुद्ध या नांवाचे कोणी मानव अस्तित्वांत नव्हते. त्यांच्या रूपाने आपण ईश्वरच पाहिला. कुराणांत महंमदांनी वारंवार म्हटलें आहे की, ख्रिस्तांना कधीच क्रुसावर चढविलें गेलें नाही, तो केवळ भास होता. कोणीहि ख्रिस्तांना क्रुसावर चढवू शकत नव्हता.

तत्त्वज्ञानात्मक धर्माची सर्वांत खालची पायरी म्हणजे द्वैतवाद ही होय. जीव, जगत् व ईश्वर यांचें ऐक्य ही सर्वोच्च अवस्था आहे. जीव व जगत् यांच्यांत ईश्वर हा ओतप्रोत भरला आहे. हेंच आपल्याला जीव, जगत् व ईश्वर या त्रयीच्या रूपांत दिसतें. तरीपण हीं तिन्हीं एकाचींच तीन रूपें आहेत याची ओझरती जाणीव आपल्याला होते. ज्याप्रमाणे शरीर हें या जीवात्म्याचें आवरण आहे त्याचप्रमाणे हा जीवात्मा जणुकांही ईश्वराचें शरीर आहे. ज्याप्रमाणे मी या प्रकृतीचा आत्मा आहें त्याचप्रमाणे ईश्वर हा माझ्या आत्म्याचा आत्मा आहे. ज्या प्रकृतींत तुम्ही आहांत तिच्याकडे पाहण्याचें केंद्र तुम्हीच आहांत. ही प्रकृति, जीव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७८७६० दि. १।१०।२५

व ईश्वर हीं तिन्हीं मिळून एकच वस्तु आहे. हेंच विश्व होय. म्हणून हीं तिन्हीं एकच आहेत, आणि तरी तीं वेगवेगळीं आहेत. दुसऱ्या प्रकारचीहि एक त्रयी आहे, ती कांहीशी ख्रिस्ती धर्मांतील त्रयीसारखी आहे. ईश्वर हा निर्गुण, निरपेक्ष आहे. त्याचें हें निर्गुण, निरपेक्ष स्वरूप आपण पाहूं शकत नाहीं, त्याचें वर्णन आपण फक्त 'नेति नेति' (हें नाही, हें नाही) असेंच करूं शकतों. तरी कांही गुण ईश्वराच्या स्वरूपाच्या अगदी जवळचे आहेत. सत्, चित् आणि आनंद हेच ते गुण होत. तुमच्यांतील पिता, पुत्र व पवित्र आत्मा या त्रयीसारखेंच हें आहे. पिता म्हणजे सत्. त्यांतून सर्वकांही निर्माण होतें. पुत्र म्हणजे चित्. ख्रिस्तांच्या रूपांत ईश्वर व्यक्त वा ज्ञात होतो. ख्रिस्तांच्याहि पूर्वी तो सर्वत्र होता, सर्वांच्या ठायीं होता. परंतु ख्रिस्तांच्या रूपांत, 'हा ईश्वर आहे' अशी आपल्याला जाणीव झाली. तिसरा गुण म्हणजे आनंद. हा तुमच्या पवित्र आत्म्यासारखा (Holy Spirit सारखा) आहे. हें ज्ञान होतांच आनंद प्राप्त होतो. स्वत:तील ख्रिस्तांची प्रतीति तुम्हांला यायला लागली की तुम्हांला आनंदाचा अनुभव येईल, आणि मग ही त्रयी एकरूप होईल.

---

# प्राणायाम

प्रथमतः प्राणायामाचा थोडासा अर्थ समजून घेण्याचा आपण प्रयत्न करूं या. अध्यात्मशास्त्रांत 'प्राण' हें विश्वांतील शक्तीच्या समष्टीचें नांव आहे. तत्त्वज्ञांच्या सिद्धान्तानुसार या विश्वाची गति लाटेसारखी आहे. त्याची उभारणी होते आणि तें पुनः लय पावतें, जणुकांही विरून जातें. पुन्हा सर्व विविध पसाऱ्यासह त्याची उभारणी होते आणि पुन्हा त्याचा लय होतो. आणि हें पुनःपुन्हा लाटेप्रमाणे चालूं असतें. हें संपूर्ण विश्व जडद्रव्य व शक्ति यांनी बनलें आहे आणि भारतीय तत्त्वज्ञांच्या मतानुसार, ज्याला आपण घन किंवा द्रव अवस्थेंतील जडद्रव्य म्हणतों तें सर्व एका मूळ द्रव्यांतून उत्पन्न झालें आहे. त्याला ते 'आकाश' असें म्हणतात. आणि विश्वांत दृग्गोचर होणारी विविध प्रकारची शक्ति ज्या मूल शक्तीचा आविष्कार आहे तिला ते 'प्राण' म्हणतात. हा प्राणच आकाशावर कार्य करून हें विश्व निर्माण करतो. आणि एका विशिष्ट कालखंडानंतर--कल्पानंतर--विश्रांतीचा काळ येतो. कार्यशीलतेच्या प्रत्येक कालखंडानंतर विश्रांतीचा काळ येतो. प्रत्येक पदार्थाचा हा स्वभाव आहे. जेव्हा हा कल्पान्ताचा-विश्रांतीचा-काळ येतो. तेव्हा पृथ्वीवरील सर्व वस्तु--चंद्र, सूर्य, तारे इत्यादि सर्व व्यक्त रूपें सूक्ष्म होत होत आकाशाचें रूप धारण करतात. त्या सर्व वस्तु मग आकाशांत लय पावतात. तसेंच सर्व प्रकारच्या शक्ति--मग त्या शरीराच्या असोत किंवा मनाच्या असोत, अथवा गुरुत्वाकर्षण, आकर्षण, गति, विचार या

रूपांतील असोत--सूक्ष्म होत होत मूळ प्राणशक्तींत विलीन होतात. यावरून प्राणायामाचें महत्त्व आपल्या ध्यानांत येईल. ज्याप्रमाणे हें आकाशतत्त्व आपल्याला सर्वत्र व्यापून आहे व आपल्यांतहि तें ओतप्रोत भरलेलें आहे त्याचप्रमाणे आपण जें कांही पाहतों तें सर्व या आकाशतत्त्वाचेंच बनलेलें आहे, आणि आपण या आकाशतत्त्वांत, बर्फाचे तुकडे ज्याप्रमाणे सरोवरांत तरंगतात त्याप्रमाणे तरंगत आहोंत. हे बर्फाचे तुकडे पाण्याचेच बनलेले असतात आणि ते पाण्यांतच तरंगत असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक वस्तु या आकाशतत्त्वाचीच बनलेली आहे व त्याच्याच सागरांत तरंगत आहे. तसेंच, या प्राणशक्तीच्याहि विशाल सागराने आपण वेढलेले आहोंत. प्राणामुळेच आपण श्वासोच्छ्वास करतों, प्राणामुळेच आपलें रक्ताभिसरण होतें. आपल्या नसांतील शक्ति व स्नायूंतील बळ प्राणच आहे, मेंदूंतील विचारशक्तिहि प्राणच आहे. ज्याप्रमाणे जडद्रव्य हें आकाशाचेंच व्यक्त रूप आहे त्याचप्रमाणे सर्व शक्ति म्हणजे त्याच प्राणशक्तीचीं विभिन्न रूपें आहेत. स्थूलाचीं कारणें नेहमी सूक्ष्मांत आढळतात. रसायनशास्त्रज्ञ अशोधित धातूचें एखादें ढेकूळ घेतो आणि त्याचें विश्लेषण करतो. त्या स्थूल धातूचीं सूक्ष्म घटकद्रव्यें तो शोधीत असतो. आपल्या विचारांच्या व ज्ञानाच्याहि बाबतींत असेंच आहे. स्थूलाचें स्पष्टीकरण सूक्ष्मांत असतें. कार्य हें स्थूल असून त्याचें कारण सूक्ष्म असतें. दृष्टीला दिसणारें, स्पर्शाला जाणवणारें व इंद्रियांच्या अनुभवास येणारें हें जें स्थूल विश्व आहे त्याचें कारण व स्पष्टीकरण त्यांच्या पाठीमागे असलेल्यां विचारांत सापडेल. त्या विचारांचेंहि कारण व स्पष्टीकरण त्याच्या पाठीमागे असलेल्या तत्त्वांत सापडेल. त्याचप्रमाणे आपल्या मानवी शरीरांतहि प्रथम स्थूल

क्रिया--हातापायाच्या व ओठांच्या हालचाली--दिसतील, पण त्यांचीं कारणें शोधूं जातां तीं सूक्ष्म अशा मज्जातंतूंमधे आढळतील. त्यांच्या हालचाली आपण पाहूं शकत नाहीं. त्या इतक्या सूक्ष्म असतात की त्यांना आपण पाहूं शकत नाहीं, स्पर्श करूं शकत नाहीं किंवा इंद्रियांच्या द्वारें त्यांचा अनुभव घेऊं शकत नाहीं. पण तरीहि त्याच या बाह्य व स्थूल क्रियांचीं कारणें आहेत हें आपण जाणतों. तसेंच, या मज्जातंतूंच्या हालचाली देखील त्यांच्यापेक्षा सूक्ष्म अशा हालचालीमुळे--विचारामुळे--उत्पन्न झालेल्या असतात. आणि या विचारांचेंहि मूळ त्यांच्यापलीकडे असणाऱ्या सूक्ष्म तत्त्वांत आहे. हें तत्त्व म्हणजेच आत्मा होय. स्वत:ला जाणून घ्यायचें असेल तर प्रथम आपली दृष्टि सूक्ष्म झाली पाहिजे. आजपर्यंत निर्माण झालेलें कोणतेंहि सूक्ष्मदर्शक यंत्र किंवा दुसरें कोणतेंहि यंत्र आपल्या आंत चालूं असलेल्या या सूक्ष्म हालचाली पाहण्यास आपल्याला समर्थ करूं शकणार नाही. अशा कोणत्याहि साधनाने आपण त्या केव्हाहि पाहूं शकणार नाहीं. म्हणून योग्यांचें असें एक शास्त्र आहे की जें स्वत:च्या मनाचा अभ्यास करण्यासाठी एक साधन तयार करतें, आणि तें साधन मनांतच असतें. जी सूक्ष्मदर्शनाची शक्ति इतर कोणतेंहि यंत्र केव्हाहि प्राप्त करूं शकणार नाही ती शक्ति मनच प्राप्त करतें.

ही अत्यंत सूक्ष्म दृष्टि प्राप्त करून घेण्यासाठी स्थूलापासूनच आपल्याला आरंभ करावा लागतो. जसजशी ही शक्ति अधिकाधिक सूक्ष्म होत जाते तसतसे आपण आपल्या अंतरंगांत अधिकाधिक खोल प्रवेश करूं शकतों. प्रथम सर्व स्थूल क्रियांचें प्रत्यक्ष ज्ञान होईल, नंतर विचाराच्या सूक्ष्म हालचाली ध्यानांत येतील; विचाराचा उदय होण्यापूर्वीच तो आपल्याला कळून येईल; तसेंच

तो कुठे जातो व त्याचा शेवट कुठे होतो हेंहि आपल्याला जाणून घेतां येईल. उदाहरणार्थ सामान्य माणसाच्या मनांत एखादा विचार उत्पन्न होतो. त्या मनाला तो विचार कसा सुरू झाला किंवा कोठून आला हें माहीत नसतें. मन हें महासागरासारखें असतें. मनाच्या या महासागरांत एखादी लाट उठते. मनुष्य तिला पाहूं शकत असला तरी ती लाट तेथे कशी आली, कशापासून उद्भवली आणि पुन्हा ती कुठे विलीन होणार आहे हें त्याला माहीत नसतें. ती कुठे जाणार आहे हें त्याला कळूं शकत नाही. पण जेव्हा दृष्टि सूक्ष्म होते तेव्हा ती लाट पृष्ठभागावर येण्याच्या कितीतरी आधी आपण तिला जाणूं शकतों. तसेंच, ती अदृश्य झाल्यावरहि दूरपर्यंत आपण तिचा माग काढूं शकतों.

ही शक्ति प्राप्त झाली म्हणजे आपण खरेंखुरें मानसशास्त्र जाणूं शकूं. आजकाल कांही लोक एखाद्या विषयाचा विचार करतात आणि त्यावर ग्रंथचे ग्रंथ लिहितात. पण ते पूर्णपणें भ्रामक असतात, कारण ह्या लोकांना स्वतःच्याच मनाचें विश्लेषण करतां येत नाही. आणि ज्या गोष्टींचा त्यांना अनुभव आलेला नसतो अशा गोष्टींविषयी केवळ कल्पना व तर्क यांच्या आधारावरच ते बोलत असतात. कोणतेंहि शास्त्र प्रत्यक्ष घटनांवर आधारलेलें असावें लागतें आणि या घटनांचें निरीक्षण करूनच सामान्य सिद्धान्त बसवावे लागतात. कांही घटना आधाराला असल्याशिवाय तुम्ही सामान्य सिद्धान्त कसे बसवूं शकतां? म्हणून ज्यांवर सिद्धान्त बसवायचे त्या घटनांच्या ज्ञानावरच सामान्य सिद्धान्त बसविण्याचे हे सर्व प्रयत्न आधारलेले असतात. एखादा मनुष्य एखादी काल्पनिक उपपत्ति पुढे मांडतो. तिला तो तसल्याच अनेक उपपत्तींची जोड देतो. परिणामतः त्याचा संपूर्ण ग्रंथ म्हणजे

निरर्थक काल्पनिक उपपत्तींची एक गोधडीच ठरतो.

राजयोगशास्त्र म्हणतें की प्रथम स्वत:च्या मनासंबंधीच्या घटना गोळा करा. मनाची सूक्ष्म अवलोकनशक्ति विकसित करून, स्वत:च्याच मनांत काय चाललें आहे हें पाहिल्याने व मनाचें विश्लेषण केल्यानेच या घटना गोळा होऊं शकतात. जेव्हा या घटना तुम्ही गोळा कराल तेव्हा मग त्यांवर सामान्य सिद्धान्त उभारा. तेव्हाच तुम्हांला खरें मानसशास्त्र प्राप्त होईल. मीं पूर्वीच म्हटल्याप्रमाणे ही सूक्ष्म निरीक्षणशक्ति प्राप्त होण्यासाठी आपल्याला तिच्या स्थूल टोकापासूनच प्रारंभ करायला हवा. बाह्यत: आविष्कृत अशा स्थूल क्रियाशक्तीच्या प्रवाहाला अनुसरूनच जर आपण पुढे गेलों तर उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सूक्ष्मतर होत गेल्याचें व शेवटीं सूक्ष्मतम झाल्याचें आपल्याला दिसेल. हें शरीर आणि या शरीरांत जे कांही आहे तें सर्व म्हणजे वेगवेगळे, स्वतंत्र अस्तित्व असलेले पदार्थ नसून सूक्ष्मापासून स्थूल होत गेलेल्या एकाच साखळीच्या भिन्न भिन्न दुव्यांप्रमाणे तें आहे.

तुम्ही एक पूर्ण वस्तु आहांत. हें शरीर म्हणजे आंत असलेल्या वस्तूचा बाह्य आविष्कार आहे, बाह्य आवरण आहे. बाह्य शरीर हें स्थूल आहे व त्याच्या आंतील वस्तु सूक्ष्म आहेत. या सूक्ष्म वस्तूंच्याहि आंत असलेल्या वस्तु अधिकाधिक सूक्ष्म आहेत आणि सर्वांत शेवटचें सूक्ष्मतम तत्त्व म्हणजे आत्मा होय. जेव्हा आपण आत्म्यापर्यंत येऊन पोहोचतों तेव्हा आपल्याला हें कळून येतें की हा सर्व त्या आत्म्याचाच आविष्कार होता, आत्माच मन झाला होता आणि तोच शरीरहि झाला होता. आपल्याला हेंहि कळून येतें की आत्म्याशिवाय दुसरें कांहीच अस्तित्वांत नसून इतर सर्व पदार्थ हे त्याचेच उत्तरोत्तर स्थूल होत जाणारे भिन्न भिन्न आविष्कार

होत. या संपूर्ण विश्वाच्या बाबतींतहि आपल्याला असेंच दिसून येतें. या विश्वांत बाह्य असा स्थूल आविष्कार आहे आणि त्याच्या मागे सूक्ष्म क्रियाशक्ति आहे. तिला आपण 'ईश्वराची इच्छा' असें म्हणूं शकतों. तिच्याहि मागे विश्वात्मा आहे असें आपल्याला कळून येईल. मग आपल्याला हेंहि कळेल की तो विश्वात्माच ईश्वराच्या व विश्वाच्याहि रूपाने प्रकट होतो. विश्व निराळें, ईश्वर निराळा, परमात्मा वा विश्वात्मा त्याहून वेगळा असें नसून ते त्या एकमेव सत्तेचेच भिन्न अवस्थांतील आविष्कार होत, हेंहि मग आपल्याला कळून येईल.

हें सर्व प्राणायामाने साध्य होतें. आपल्या शरीरांत होत असलेल्या सूक्ष्म हालचाली आपल्या श्वसनाशीं संबद्ध आहेत. या श्वसनावर जर आपण ताबा मिळवूं शकलों, त्याला वळण लावूं शकलों, त्याच्यावर नियंत्रण ठेवूं शकलों तर हळूहळू आपण आंतील सूक्ष्म सूक्ष्मतर हालचालींपर्यंत पोहोचूं शकूं आणि अशा रीतीने मनाच्या प्रदेशांत आपला प्रवेश होईल. मागच्या वेळीं प्राणायामाचा जो पाठ मीं तुम्हांला दिला तो केवळ सुरवातीच्या अभ्यासापुरताच होता. प्राणायामाचे कांही पाठ अत्यंत कठीण आहेत. शक्यतों कठीण पाठ टाळण्याचा मी प्रयत्न करीन, कारण त्यांतील अधिक कठीण पाठांसाठी खाण्यापिण्यावर व इतरहि कांही गोष्टींवर बरेंच नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे, आणि तुमच्यापैकी बहुतेकांना तें जमणार नाही. म्हणून आपण हळूहळू प्रगति करून देणारे सुलभ व साधे पाठ घेऊं.

प्राणायामाचे तीन भाग आहेत. पहिला पूरक--श्वास आंत घेणें; दुसरा कुंभक--फुफ्फुसांत वायु भरून घेणें व त्याचा निरोध करणें; तिसरा रेचक--श्वास बाहेर सोडणें. पहिला पाठ जो मी

आज तुम्हांला देणार आहें तो अगदी साधा आहे. वायु आंत घेणें, तो रोधून धरणें व तो पुन्हा सावकाश बाहेर सोडणें असा हा पाठ आहे. प्राणायामाची पुढचीहि एक पायरी आहे, पण ती आज मी तुम्हांला सांगणार नाहीं, कारण त्यांत बरीच गुंतागुंत असल्यामुळे सर्व गोष्टी तुमच्या लक्षांत राहणार नाहीत. हे तिन्ही भाग मिळून प्राणायाम होतो. या श्वसनाचें योग्य रीतीने नियमन केलें पाहिजे, नाहीतर त्यापासून तुम्हांला धोका आहे. हें नियमन कांही अंकांच्या साहाय्याने केलें जातें. प्रथम मी अगदी खालचे अंक देतों. चार सेकंदांत श्वास आंत घ्या, आठ सेकंद तो रोधून ठेवा व पुन्हा चार सेकंदांत तो हळूहळू बाहेर सोडा. असा अभ्यास सकाळीं चार वेळां व सायंकाळीं चार वेळां करीत जा. आणखी एक गोष्ट. एक, दोन, तीन असे निरर्थक अंक न मोजतां, तुम्हांला पवित्र वाटणारा एखादा शब्द उच्चारीत जा. भारतांत आम्ही असे कांही प्रतीकात्मक शब्द वापरतों, उदाहरणार्थ ॐ. ॐ म्हणजे ईश्वर. एक, दोन, तीन इत्यादि अंकांच्या ऐवजी असा एखादा शब्द उच्चारण्याने तुमचा हेतु चांगल्या रीतीने सफळ होईल. आणखीहि एक गोष्ट. प्रथम श्वास डाव्या नाकपुडींतून आंत घेतला पाहिजे आणि उजव्या नाकपुडींतून तो बाहेर सोडला पाहिजे. दुसऱ्या वेळीं उजव्या नाकपुडींतून तो आंत घेऊन डाव्या नाकपुडींतून तो बाहेर सोडला पाहिजे. आळीपाळीने असें करीत चला. केवळ इच्छाशक्तीच्या साहाय्याने तुम्हांला वाटेल तेव्हा कोणत्याहि एका नाकपुडींतून श्वास आंत घेतां व बाहेर सोडतां आला पाहिजे. कांही काळानंतर हें तुम्हांला जमेल. आज कदाचित् तें तुम्हांला जमणार नाही, म्हणून एका नाकपुडींतून श्वास घेतांना दुसरी बोटाने बंद करा, आणि श्वास आंत कोंडून ठेवतांना अर्थातच

दोन्ही नाकपुड्या बोटाने बंद करा.

पहिले दोन पाठ विसरूं नका. पहिली गोष्ट ही की तुम्हीं आपलें शरीर ताठ ठेवलें पाहिजे. दुसरी गोष्ट ही की आपलें शरीर सुदृढ आहे, निरोगी आहे, निर्दोष आहे अशी कल्पना करा. मग प्रेमाचा प्रवाह भोवताली पसरून द्या. सर्व विश्व आनंदमय आहे अशी कल्पना करा. त्यानंतर, तुमचा जर ईश्वरावर विश्वास असेल तर त्याची प्रार्थना करा, आणि मग प्राणायाम सुरू करा.

तुमच्यापैकी अनेकांत कांही शारीरिक बदल घडून येतील. सर्व शरीर कंप पावेल व तुम्हांला घाबरल्यासारखें होईल. कांही-जणांना रडावेसें वाटेल. एखादे वेळीं शरीरांत जोरदार हालचाल उत्पन्न होईल. पण भिऊं नका. अभ्यास करतांना अशा गोष्टी घडणारच. संपूर्ण शरीराची रचनाच जणु बदलावी लागेल. मेंदूंत विचाराचे नवे मार्ग तयार होतील. जे मज्जातंतु तुमच्या आयुष्यांत आतापर्यंत कधी कार्य करीत नव्हते ते कार्य करायला लागतील आणि संपूर्ण शरीरांत अनेक नवीन नवीन बदल घडून येतील.

# पौर्वात्य स्त्रिया

('शिकागो डेली इंटर-ओशन' या वृत्तपत्राच्या २३ सप्टेंबर १८९३ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला अहवाल)

स्वामी विवेकानंदांनी एका खास सभेंत पौर्वात्य स्त्रियांच्या सद्य:स्थितीविषयी व भावी स्थितीविषयी चर्चा केली. ते म्हणाले, "एखाद्या देशांत स्त्रियांना ज्या रीतीने वागविलें जातें त्यावरून त्या देशाच्या प्रगतीचें उत्तम मोजमाप करतां येतें. प्राचीन काळीं ग्रीस देशांत स्त्री व पुरुष यांच्या स्थितींत मुळीच फरक नव्हता. पूर्ण समानतेची कल्पना अस्तित्वांत होती. विवाहित झाल्याशिवाय कोणाहि हिंदूला पुरोहित होतां येत नाही. स्त्रीशिवाय पुरुष अर्धा, अपूर्ण आहे हीच कल्पना याच्या मुळाशीं आहे. पूर्ण स्वातंत्र्य हीच परिपूर्ण स्त्रीत्वाची कल्पना आहे. आधुनिक हिंदु स्त्रीच्या जीवनांतील मुख्य तत्त्व म्हणजे तिचें पातिव्रत्य हें होय. पत्नी म्हणजे एका वर्तुळाचा मध्यबिंदु असून त्याचें स्थैर्य तिच्या पातिव्रत्यावर अवलंबून आहे. ही कल्पना आत्यंतिक टोकाला नेल्यामुळेच सतीची प्रथा निर्माण झाली. हिंदु स्त्रिया अत्यंत अध्यात्मप्रवण व धार्मिक आहेत. या बाबतींत त्या कदाचित् जगांतील इतर सर्व स्त्रियांहून श्रेष्ठ ठरतील. या सुंदर वैशिष्टयांचें जतन करून त्याबरोबरच आमच्या स्त्रीवर्गाच्या बौद्धिक गुणांचाहि विकास जर आम्ही करूं शकलों तर भावी हिंदु स्त्री जगांतील आदर्श स्त्री होईल.

---

# धर्मैक्य-परिषद

('शिकागो संडे हेरल्ड'च्या २४ सप्टेंबर १८९३ च्या अंकांत प्रसिद्ध झालेला अहवाल)

स्वामी विवेकानंद म्हणाले, "या परिषदेंत जीं भाषणें झालीं त्या सर्वांचा निष्कर्ष हा निघतो की मानवामानवामधील बंधुत्व हें एक अत्यंत वांच्छनीय असें ध्येय आहे. आपण सर्वजण एकाच ईश्वराचीं लेकरें आहोंत, म्हणून बंधुत्व हें स्वाभाविकच आहे असें त्यासंबंधी पुष्कळ सांगण्यांत आलें. परंतु जगांत कांही असेहि पंथ आहेत की जे ईश्वराचें--सगुण ईश्वराचें--अस्तित्व मानीत नाहीत. अशा पंथांना बंधुत्वाच्या कक्षेबाहेर ठेवण्याची आपली इच्छा नसेल तर आपण आपली भूमिका सर्व मानवांना सामावून घेऊं शकेल इतकी व्यापक केली पाहिजे. जर आपण या पंथांना बंधुत्वांत सामावून घेतलें नाही तर आपलें बंधुत्व विश्वव्यापी होणार नाही. प्रत्येक वाईट व नीच कृतीची कर्त्यावर प्रतिक्रिया होते म्हणून आपण आपल्या मानव बांधवांचें भलें केलें पाहिजे, असें येथे सांगण्यांत आलें. यांत मला दुकानदारी वृत्तीचा वास येतो. आधी आपलें हित आणि मग बांधवांचें, अशी यांत वृत्ति दिसते. 'ईश्वर सर्व विश्वाचा पिता आहे' यावर आपला विश्वास असो की नसो, आपण आपल्या बांधवांवर प्रेम केलें पाहिजे असें मला वाटतें, कारण प्रत्येक धर्म व प्रत्येक पंथ मनुष्याचें दिव्यत्व मानतो. त्या दिव्यत्वाला धक्का लागूं नये म्हणून आपण मानवाला दुखवूं नये.

---

# विभिन्न धर्मांतील ईश्वरविषयक कल्पनांचें तुलनात्मक विवेचन

(२१ जानेवारी १८९४ रोजीं मेंफिस येथे दिलेल्या व्याख्यानाचा 'अपील अव्हेलांच'मधे प्रसिद्ध झालेला वृत्तान्त)

काल रात्रीं 'यंग मेन्स हिब्रू असोसिएशन हॉल'मधे 'विभिन्न धर्मांतील ईश्वरविषयक कल्पनांचें तुलनात्मक विवेचन' या विषयावर स्वामी विवे कानंदांचें* व्याख्यान झालें. त्यांच्या संपूर्ण व्याख्यानमालेंत हें व्याख्यान विशेष सुंदर असें झालें. ह्या शहरांतील सर्व लोकांना ह्या विद्वान् पुरुषाबद्दल जो आदर वाटत होता त्यांत या व्याख्यानामुळे निःसंशय मोठी भर पडली आहे.
आतापर्यंत विवे कानंदांनी दान देण्यास योग्य अशा कोणत्या ना कोणत्या कार्याच्या साहाय्यासाठी व्याख्यानें दिलीं. त्या त्या कार्याला त्यांच्या व्याख्यानामुळे चांगलीच मदत झाली असें खात्रीने म्हणतां येईल. पण काल रात्रीचें त्यांचें व्याख्यान मात्र त्यांच्या स्वतःच्या कार्याच्या लाभासाठी झालें. या व्याख्यानाची योजना, विवे कानंदांचे अत्यंत निकटचे स्नेही आणि सच्चे चाहते श्री. ह्यु. एल्. ब्रिकले यांनी केली होती. व्याख्यानाची एकंदर जबाबदारीहि त्यांनीच उचलली होती. त्या थोर पौर्वात्याचें ह्या शहरांतील हें शेवटचें व्याख्यान होतें. सभागृहांत सुमारें दोनशे

---

* त्या दिवसांत अमेरिकेंतील वृत्तपत्रांमधे स्वामी विवेकानंदांचें नांव चुकीचें लिहिलें जाई आणि मुख्यतः विषयाच्या नाविन्यामुळे, प्रसिद्ध होणारे अहवालही तंतोतंत बरोबर नसत.

श्रोते उपस्थित होते.

आपला विषय मांडतांना वक्त्याने सर्वप्रथम, "धर्माच्या निरनिराळ्या मतांवरून त्यांच्यांत भेद असल्याचें जसें भासतें तसा तो खरोखरच असणें शक्य आहे काय ?" असा प्रश्न उपस्थित केला.

सर्व धर्मांच्या प्रगतीचा अद्ययावत् इतिहास सांगून भिन्न भिन्न धर्मांमधे आता तशा प्रकारचा भेद उरला नसल्याचें त्यांनी प्रतिपादन केलें. मानवजातीच्या प्रारंभकाळीं, निरनिराळ्या ईश्वरविषयक कल्पना असणें कसें अनिवार्य होतें, पण पुढे पायरीपायरीने नैतिक आणि बौद्धिक क्षेत्रांत जगाची प्रगति होऊन हळूहळू ते भेद कसे कमी झाले व शेवटीं अगदी नष्ट कसे झाले तें सर्व सांगून ते म्हणाले की, आता सर्वमान्य असें एकच मत उरलें आहे आणि तें म्हणजे सर्वातीत निरपेक्ष सत्तेविषयीचें मत होय.

ते पुढे म्हणाले :--"अगदी रानटी मनुष्यसुद्धा कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या देवावर विश्वास ठेवतोच.

"आधुनिक विज्ञान या विश्वासाला ईश्वरी साक्षात्कार मानतें की नाही यासंबंधी तें आपल्याला कांहीच सांगत नाही. रानटी लोकांमधे प्रेमाला विशेष स्थान नसतें. त्यांचें सगळें जीवन भयव्याप्त असतें. त्यांची भाबडी कल्पनाशक्ति असें एखादें क्रूर दैवत चित्रित करते की केवळ त्याच्या विचाराने ते भीतिग्रस्त होऊन चळचळा कांपूं लागतात. जें त्या रानटी माणसाला स्वत:ला आवडतें तेंच त्या दुष्ट दैवताला आवडेल असें तो समजतो. ज्या गोष्टींनी त्याला स्वत:ला समाधान वाटतें त्या गोष्टी त्या दैवताचा क्रोध शमवितील असें तो समजतो. यासाठी तो आपल्या बांधवांचें अनिष्ट करण्यासहि मागेपुढे पाहत नाही."

यानंतर त्यांनी ऐतिहासिक दाखल्यांच्या आधारें आराध्य-दैवतांचा विकासक्रम सांगितला. रानटी माणसाने प्रथम आपल्या पूर्वजांची पूजा केली. नंतर हत्तीसारख्या प्राण्यांची पूजा केली. आणि त्यानंतर मेघगर्जनेचें दैवत, वादळाचें दैवत—अशीं दैवतें निर्माण झालीं. त्या वेळीं अनेकेश्वरवाद हाच सर्व जगाचा धर्म होता. विवेकानंद म्हणाले :—

"सूर्योदयाचें सौंदर्य, सूर्यास्ताची भव्यता, तारकाखचित आकाशाचें स्तिमित करून टाकणारें गूढ दृश्य, मेघगर्जनेचें आणि विद्युल्लतेचें उग्र व भयानक रूप या सगळ्यांचा त्याच्या मनावर झालेला जोरदार आघात त्या आदिमानवाला अनाकलनीय वाटला; त्यामुळेच त्याला ही कल्पना सुचली की कोणीतरी श्रेष्ठ आणि अतिशक्तिमान असा पुरुष त्याच्या दृष्टीस पडणाऱ्या अनंत गोष्टींचें नियंत्रण करीत आहे."

त्यानंतर दुसरा काळ आला. हा एकेश्वरवादाचा काळ होता. विभिन्न देवदेवता अदृश्य होऊन त्यांतून सगळ्या विश्वाचा नियंता असा एक देवाधिदेव निर्माण झाला. त्यानंतर वक्त्यांनी ज्या काळीं आर्य लोक "आम्ही ईश्वरांतच जगतों, ईश्वरांतच हालचाल करतों, ईश्वर हा गतिस्वरूप आहे" असें म्हणत होते त्या काळा-पर्यंतचा त्यांचा इतिहास सांगितला.

पुढे अध्यात्मशास्त्रांत, ज्याला 'जगत्-ईश्वरवादा'चा (Pantheism चा) काळ म्हटलें आहे तो सुरू झाला. मग आर्यांनी अनेकेश्वरवादाचा, एकेश्वरवादाचा, 'ईश्वरच जगत् बनला आहे' या मताचा त्याग केला; आणि ते म्हणूं लागले की, "माझ्या आत्म्याचा जो आत्मा आहे त्यालाच या जगांत खरें अस्तित्व आहे. मी सत्स्वरूप आहें आणि शेवटीं ह्या स्वरूपांत मी विलीन होईन."

यानंतर विवेकानंद बौद्ध धर्माकडे वळले. "बौद्ध लोक ईश्वराचें अस्तित्व प्रतिपादीत नाहीत व तें अमान्यहि करीत नाहीत" असें त्यांनी सांगितलें. बुद्धांचा उपदेश घेण्यासाठी कुणी त्यांच्याकडे गेल्यास ते त्याला फक्त एवढेंच म्हणत, "तुम्ही या जगांत सर्वत्र दुःखच पाहतां; तें दुःख कमी होईल असा प्रयत्न करा." बौद्ध-धर्मीयांच्या मतें दुःख हें सदाच अस्तित्वांत असतें. विवेकानंद म्हणाले की, "मुसलमान लोक यहुद्यांच्या 'जुन्या संहिते'वर (Old Testament वर) आणि ख्रिस्त्यांच्या 'नवसंहिते'वर (New Testament वर) विश्वास ठेवतात. मुसलमानांना ख्रिस्ती लोक आवडत नाहीत, कारण ते पाखंडी असून मनुष्याच्या उपासनेची शिकवण देतात असा मुसलमानांचा त्यांच्यावर आक्षेप असतो. महंमदाने आपल्या अनुयायांना आपलें स्वतःचें चित्र बाळगण्याची पूर्णपणें मनाई केली."

वक्ते पुढे म्हणाले, "आता असा प्रश्न उपस्थित होतो की हे सगळे धर्म खरे आहेत काय ? की यांपैकी कांही खरे व कांही खोटे आहेत ? या जगांत सर्वातीत, निरपेक्ष आणि अनंत असें कांहीतरी आहे या एका निर्णयाप्रत सगळे धर्म पोहोचले आहेत. एकत्व हेंच सगळ्या धर्मांचें उद्दिष्ट आहे. आपल्याला पदोपदीं सृष्टीचीं जीं अनेक रूपें दिसतात तीं त्या 'एका'चींच अनंत रूपें आहेत. धर्माचें विश्लेषण केलें असतां असें आढळतें की मनुष्य हा असत्याकडून सत्याकडे जात नसतो, तर तो खालच्या पातळी-वरील सत्याकडून वरच्या पातळीवरील सत्याकडे जात असतो.

"एक मनुष्य कांही माणसांजवळ एक कोट घेऊन आला. त्यांच्यापैकी कांहीजण म्हणाले, 'अरे, आम्हांला तर हा कोट होत नाही.' तेव्हा त्यांना उत्तर मिळालें, 'तुम्ही चालते व्हा, तुम्हांला

कोटच मिळणार नाही.' एखाद्या ख्रिस्ती धर्मगुरूला विचारा, 'बाबारे, जे संप्रदाय तुझ्या मतांच्या व सिद्धान्तांच्या विरुद्ध आहेत त्यांचें काय होणार ?' तो म्हणेल, 'हं, ते ख्रिस्ती नाहीत.'

"पण आपल्याला यापेक्षा चांगली शिकवण मिळाली आहे. आपला स्वभाव, प्रेम आणि विज्ञान--हे आपल्याला यापेक्षा श्रेष्ठ शिकवण देतात. एखाद्या नदींत अनेक भोवरे असतात. ते नाहीसे झाले तर पाणी एका जागीं साचून सडेल. मतभिन्नता नाहीशी झाली की विचार करणेंच थांबेल. गति ही एक आवश्यक गोष्ट आहे. मनाच्या गतीला विचार असें नांव आहे. विचाराचें थांबणें म्हणजे मृत्यूचा प्रारंभच होय.

"पाण्याने भरलेल्या एखाद्या पेल्याच्या तळाशीं तुम्हीं जर हवेचा लहानसा कण सोडला तर तो तात्काळ वर येण्याची धडपड करतो, अनंत वातावरणांत विलीन होण्यासाठी त्याची खटपट चालूं होते. आत्म्याचेंहि तसेंच आहे. पार्थिव शरीरांतून मुक्तता प्राप्त करण्यासाठी आणि आपल्या शुद्ध स्वरूपाप्रत परत जाण्यासाठी तो यत्नशील असतो. आपलें अनंतस्वरूप आपल्याला पुन्हा प्राप्त व्हावें असें त्याला वाटतें. सर्वत्र हेंच चाललें आहे. ख्रिस्ती, बौद्ध, मुसलमान, कोणीहि असोत, अज्ञेयवादी असोत की धर्माचार्य असोत, सर्वांच्या आत्म्याची हीच धडपड चालूं आहे. एक नदी समुद्राला मिळण्यासाठी जातांना पर्वताला हजार मैलांचा वळसा घालते. तिच्या मुखापाशी उभा असलेला एक मनुष्य तिला सांगतो, 'तूं पुन्हा परत जा आणि पुनः नव्या सरळ मार्गाने ये !' हा मनुष्य मूर्खच म्हणावा लागेल. तुम्ही जेरुसलेमच्या 'झिऑम' नामक पवित्र टेकडीवरून वाहत येणारी नदी आहांत, तर मी म्हणजे जणु हिमालयावरून वाहत येणारी नदी आहें.

'तुम्ही परत जा आणि मी ज्या मार्गाने आलों त्या मार्गाने तुम्हीं या, तुम्ही चुकले आहांत'--असें कांही मी तुम्हांला म्हणत नाहीं. असें म्हणणें मूर्खपणाचें आणि चुकीचें होईल. आपल्याच श्रद्धांना चिकटून राहा. सत्य अमर आहे. पुस्तकें कदाचित् नाश पावतील, राष्ट्रें एका तडाख्यांत उध्वस्त होतील, पण सत्य मात्र अक्षुण्णच राहील. सत्य कोणाला तरी गवसतें आणि तें तो समाजाच्या स्वाधीन करतो. ईश्वराच्या भव्य आणि अविरत आविष्काराचा हा पुरावाच आहे.

---

# भारत

(गुरुवार, दि. १५ फेब्रुवारी १८९४ रोजीं डेट्रॉइट येथे दिलेल्या व्याख्यानाचा 'दि डेट्रॉइट फ्री प्रेस'मधे संपादकीय टीपांसहित प्रसिद्ध झालेला अहवाल)

'युनेटेरियन चर्च'चें सभागृह काल रात्रीं श्रोत्यांनी भरलें होतें. त्यांनी सुप्रसिद्ध संन्यासी स्वामी विवेकानंद यांचें 'भारतांतील रूढि व चालीरीती' या विषयावरील व्याख्यान ऐकलें. त्यांची वक्तृत्वपूर्ण व आकर्षक शैली श्रोत्यांना आवडली व त्यांनी त्यांचें व्याख्यान आरंभापासून शेवटपर्यंत अत्यंत लक्ष देऊन ऐकलें. मधूनमधून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करून ते आपली पसंती दर्शवीत होते. त्यांचें हें व्याख्यान, शिकागो येथील धर्मपरिषदेपुढे त्यांनी दिलेल्या सुप्रसिद्ध व्याख्यानापेक्षा अधिक लौकिक स्वरूपाचें होतें तरी तें अत्यंत मनोरंजक होतें. विशेषत: जेव्हा व्याख्याते बोधपर भाग बाजूला सोडून आपल्या देशांतील लोकांच्या कांही आध्यात्मिक अवस्थांचें वक्तृत्वपूर्ण वर्णन करीत तेव्हा तें फारच मनोवेधक होत असे. धार्मिक व तत्त्वज्ञानात्मक (आणि ओघानेच आध्यात्मिकहि) विषयांच्या बाबतींत आमच्या या पौर्वात्य बांधवाचें प्रतिपादन अत्यंत प्रभावी असतें. थोर नैतिक निसर्गनियमांचा प्रामाणिकपणें विचार केल्यास कोणतीं कर्तव्यें निष्पन्न होतात याचें जेव्हा ते वर्णन करीत तेव्हा त्यांचा तो मृदु स्वर (जें त्यांच्या देशबांधवांचें एक वैशिष्टच आहे) आणि त्यांची ती रोमांचकारी शैली ही एखाद्या प्रेषिताच्या शैलीसारखी वाटे. ते अत्यंत विचार-

पूर्वक बोलतात. पण जेव्हा ते आपल्या श्रोत्यांपुढे एखादें नैतिक सत्य सांगत असतात तेव्हा मात्र त्यांच्या वक्तृत्वाला कमालीचा ओघ येतो.

ख्रिस्ती मिशनरी भारतांत (जिथे व्याख्यात्यांच्या मतें दुसऱ्या कोणत्याहि देशाहून जास्त नीतिमत्ता आहे) करीत असलेल्या कार्याविषयी स्पष्ट नापसंती व्यक्त करणाऱ्या या पौर्वात्य संन्याशाचा परिचय, ख्रिस्ती मिशनच्या परदेशांतील कार्यासाठी जून महिन्यांत चीनला प्रयाण करणार असलेल्या बिशप निंडे यांनी करून द्यावा हें कांहीसें अपूर्वच वाटलें. डिसेंबरपर्यंत बाहेर राहण्याचा बिशप निंडे यांचा विचार आहे पण त्यांना जर जास्त काळ बाहेर राहावें लागलें तर ते भारतांत जातील. विवेकानंदांचा आनंदाने परिचय करून देतांना बिशप महाशयांनी भारतांतील आश्चर्यकारक गोष्टींचा व तेथील सुशिक्षित लोकांच्या बुद्धिमत्तेचा उल्लेख केला. आणि जेव्हा ती सावळी मूर्ति उभी राहिली तेव्हा तो फेटा व तो चकाकणारा झगा, तो सुंदर चेहरा आणि बुद्धीच्या तेजाने चमकणारे ते डोळे यांमुळे ती फार प्रभावी वाटली. बिशप महाशयांनी वापरलेल्या शब्दांबद्दल विवेकानंदांनी त्यांचे आभार मानले. नंतर आपल्या देशांतील जातिव्यवस्था, लोकांच्या चालीरीती व भिन्न भिन्न भाषा यांच्या विवेचनाला त्यांनी प्रारंभ केला. मुख्यत: तेथे चार उत्तरेकडील व चार दक्षिणेकडील भाषा आहेत. पण सगळ्यांचा एकच धर्म आहे. तीस कोटी लोकांपैकी चारपंचमांश लोक हिंदु आहेत. हिंदु माणूस विलक्षण असतो. तो सर्वकांही धार्मिक पद्धतीने करतो. तो खातो धार्मिकपणें, झोपतो धार्मिकपणें आणि सकाळीं उठतोहि धार्मिकपणें; तो चांगल्या गोष्टी धार्मिकपणें करतो आणि वाईट गोष्टीहि धार्मिक-

णेंच करतो. या ठिकाणीं व्याख्यात्यांनी नीतीचें एक महान् मूलतत्त्व सांगितलें. त्यांनी म्हटलें की "आमच्या देशांतील लोकांची अशी धारणा आहे की जें स्वार्थरहित असेल तें सर्व चांगलें आणि जें स्वार्थयुक्त असेल तें वाईट." या मुद्यावर व्याख्यात्यांनी संपूर्ण व्याख्यानांत विशेष भर दिला आणि तो त्यांच्या व्याख्यानाचा सारभूत भाग म्हणतां येईल. घर बांधणें हें स्वार्थीपणाचें आहे असें हिंदु माणूस म्हणतो. म्हणून तो ईश्वराच्या पूजेसाठी व अतिथींच्या सत्कारासाठी घर बांधतो. अन्न शिजविणें हाहि स्वार्थच आहे, म्हणून तो तें गरिबांसाठी शिजवितो. कोणी भुकेला माणूस अन्न मागेल तर तो त्याला आधी अन्न देईल व मग स्वत: जेवील. ही भावना देशाच्या सर्व भागांत आढळते. कोणीहि अन्नाची व निवाऱ्याची याचना करूं शकतो, आणि कोणत्याहि घरीं त्याला आसरा मिळतो.

जातिव्यवस्थेचा धर्माशीं कांही संबंध नाही. तेथे मनुष्याचा धंदा हा वंशपरंपरागत असतो. सुतार हा जन्मत:च सुतार असतो, सोनार हा जन्मत:च सोनार असतो, कामगार हा जन्मत:च कामगार असतो आणि पुरोहित हाहि जन्मत:च पुरोहित असतो. पण हा सामाजिक दोष सापेक्षत: अलीकडचा म्हणजे गेल्या सुमारें एक हजार वर्षांतलाच आहे. हा काळ अमेरिकेंतल्याप्रमाणे वा इतर देशांतल्याप्रमाणे भारताच्या दृष्टीने फार मोठा ठरत नाही.

भारतांत विद्यादान व प्राणदान हीं विशेष प्रशंसिलीं जातात. त्यांतहि विद्यादानाला अग्रस्थान आहे. एखाद्याने दुसऱ्याचा प्राण वांचविला तर ती चांगलीच गोष्ट आहे, पण एकाने दुसऱ्याला ज्ञान दिलें तर ती त्याहूनहि चांगली गोष्ट आहे. पैशासाठी विद्या

शिकविणें वाईट मानलें जातें. विद्येचा अशा रीतीने विक्रय करणें हें निंदास्पद ठरतें. शासनाकडून शिक्षकांना वेळोवेळीं देणग्या मिळतात. याचा नैतिकदृष्टया परिणाम तथाकथित सुधारलेल्या देशांतील पद्धतीच्या परिणामापेक्षा अधिक चांगला होतो.

व्याख्यात्यांनी या देशांत व इतरहि देशांत अनेकांना सभ्यतेची व्याख्या विचारली होती. कांही वेळेला त्यांना असें उत्तर मिळालें की "आम्ही जसें आहोंत तीच सभ्यता आहे." या शब्दाच्या व्याख्येबद्दल आपला मतभेद असल्याचें त्यांनी सांगितलें. एखादें राष्ट्र महाभूतांचें नियंत्रण करील, ऐहिक गोष्टींचा त्याच्या समजुतीप्रमाणे सर्वोच्च विकास घडवून आणील, पण तरीहि स्वत:वर विजय मिळविणाऱ्या व्यक्तींतच सर्वश्रेष्ठ सभ्यता दृग्गोचर होते हें त्याला कळणार नाही. जगांतील इतर कोणत्याहि देशापेक्षा भारतांतील लोकांना सभ्यतेची ही खरी व्याख्या अधिक कळली आहे, कारण तेथे भौतिक गोष्टी गौण आणि आध्यात्मिकतेला साहाय्यक मानल्या जातात आणि तेथील लोक प्रत्येक जीवांत आत्म्याची अभिव्यक्ति पाहण्याचा प्रयत्न करतात. याच उद्देशाने ते सृष्टीचा अभ्यास करतात. म्हणूनच तेथे निर्दय दैवाचे आघात दुर्दम्य तितिक्षेने सहन करण्याची सौम्य वृत्ति आढळते. त्याबरोबरच, भारतांतील लोकांना आध्यात्मिक सामर्थ्य आणि ज्ञान यांची जशी पुरेपूर जाणीव असते तशी जगांतील इतर लोकांमधे आढळत नाही. म्हणूनच असा एक मानववंश व असा एक देश अस्तित्वांत आहे की ज्याच्यापासून ज्ञानाचा प्रवाह सतत वाहतो, आणि हा प्रवाह निकटच्या व दूरच्या चिंतनशील व्यक्तींचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतो, त्यांना आपल्याकडे येण्यास आवाहन करतो आणि त्यांच्या खांद्यावरील ऐहिकतेचें दु:सह ओझें

झुगारून देण्यास त्यांना स्फूर्ति देतो. इसवी सनाच्या २६० वर्षें आधी ज्या राजाने 'यापुढे रक्तपात होऊं नये, युद्धें होऊं नयेत' असा आदेश दिला आणि ज्याने सैनिकांच्या ऐवजी उपदेशकांचें सैन्य पाठविलें तो राजा, जरी देशाचें भौतिक बाबतींत नुकसान झालें तरी, शहाणपणानेच वागला असें म्हणतां येईल. भारतवासी जरी बलाने जिकणाऱ्या पाशवी राष्ट्रांच्या बंधनांत असले तरी त्यांची आध्यात्मिकता चिरकाल टिकणारी आहे आणि ती कशानेहि त्यांच्यापासून हिरावून घेतली जाऊं शकत नाही. क्रुद्ध झालेल्या दैवाने सोडलेल्या बाणांचा व त्याने केलेल्या तीक्ष्ण आघातांचा मारा सहन करण्यांत व तसें करीत असतांनाच उज्ज्वल ध्येयाकडे आत्म्याची प्रगति चालूं ठेवण्यांत भारतांतील लोकांनी जी लीनता दाखविली ती कांहीशी येशू ख्रिस्तांच्या नम्रतेसारखी आहे. अशा देशाला शिकविण्यासाठी ख्रिस्ती धर्मोपदेशकांची मुळीच गरज नाही, कारण त्या देशांतील लोकांचा धर्म मनुष्याला सौम्य, मधुरस्वभावी, विचारी आणि ईश्वरनिर्मित सर्व जीवांविषयी, मग ते मानव असोत की पशु असोत, कनवाळू बनवितो. नैतिकतेच्या दृष्टीने भारत हा अमेरिकेपेक्षा किंवा पृथ्वीच्या पाठीवरील इतर कोणत्याहि देशापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे असें वक्त्यांनी सांगितलें. मिशनऱ्यांनी भारतांत यावें आणि तेथील शुद्ध जलाचें पान करावें म्हणजे त्यांच्या ध्यानांत येईल की असंख्य साधुसंतांनी ह्या थोर समाजावर किती उत्तम प्रभाव पाडलेला आहे.

नंतर व्याख्यात्यांनी विवाहविषयक माहिती दिली, तसेंच प्राचीन काळीं जेव्हा मुलांमुलींचें सहशिक्षण चालूं होतें तेव्हा स्त्रियांना कोणते अधिकार होते हेंहि सांगितलें. भारतांतील साधुसंतांच्या इतिहासांत द्रष्टचा स्त्रियांचेंहि वैशिष्टचपूर्ण स्थान आहे. ख्रिस्ती

पंथांत फक्त द्रष्टे पुरुषच आढळतात. पण भारतीय धर्मग्रंथांत द्रष्टया स्त्रियांनाहि प्रमुख स्थान आहे. गृहस्थाश्रमी व्यक्तीला पांच प्रकारची उपासना करावी लागते. त्यांपैकी अध्ययन व अध्यापन ही एक उपासना आहे. मुक्या प्राण्यांची सेवा ही दुसरी एक उपासना आहे. ही उपासना अमेरिकेंतील लोकांना समजणें कठीण आहे आणि युरोपियन लोकांना तिच्यामागील भाव समजणें कठीण आहे. इतर देशांतील लोक मोठ्या प्रमाणावर प्राणीहत्या करतात आणि एकमेकांचाहि प्राण घेतात. ते जणुकांही रक्ताच्या समुद्रांत राहतात. एका युरोपीय गृहस्थाने म्हटलें की भारतांतील लोक जनावरांना मारीत नाहीत याच्या मुळाशीं त्यांची अशी समजूत आहे की पूर्वजांचे आत्मे जनावरांत राहतात. ज्यांची संस्कृति पशूंहून फार उच्च नाही अशा रानटी देशालाच शोभेसें हें कारण आहे. खरी गोष्ट अशी आहे की हें विधान अहिंसा व आत्म्यांचा पुनर्जन्म या वैदिक कल्पनांकडे दोषैकदृष्टीने पाहणाऱ्या भारतांतील कांही नास्तिकांनी केलेलें आहे. हा धार्मिक सिद्धान्त कधीच नव्हता. तें केवळ जडवादी पंथाचें एक मत होतें. व्याख्यात्यांनी मुक्या प्राण्यांच्या उपासनेचें स्पष्ट चित्र समोर मांडलें. त्यांनी एक गोष्ट सांगून भारतांतील आतिथ्यधर्म विशद करून सांगितला. एक ब्राह्मण, त्याची पत्नी, मुलगा व सून यांना दुष्काळामुळे कित्येक दिवसपर्यंत अन्न मिळालें नव्हतें. ब्राह्मण बाहेर पडला. कांही वेळ शोध केल्यानंतर त्याला थोडेसे जव मिळाले. त्याने ते घरीं आणले. ते दळून त्याच्या पत्नीने त्या पिठाची जेमतेम एक भाकरी केली. ती चौघांनी सारखी वांटून घेतली, ते ती खाणार एवढ्यांत दारावर एक अतिथि आला. त्या अतिथीला चौघांनीहि क्रमशः आपापला भाकरीचा तुकडा दिला. अतिथि संतुष्ट होऊन निघून गेला. तें

व मात्र उपासाने मरण पावलें. आतिथ्यधर्मासाठी किती त्याग रावा लागतो हें विशद करण्यासाठी ही कथा भारतांत सांगितली जाते.

वक्त्यांनी आपलें भाषण परिणामकारक रीतीने संपविलें. त्यांचें सगळें भाषण साधेंच होतें. पण जेव्हा ते कल्पनाविलासांत रमत तेव्हा तो मोठा आल्हाददायक व काव्यमय वाटे. या पौर्वात्य बांधवाने निसर्गसौंदर्याचेंहि सूक्ष्म निरीक्षण केलें आहे असें त्यावरून दिसून येई. वक्त्यांची पराकाष्ठेची अध्यात्मप्रवणता श्रोत्यांना जाणवल्याशिवाय राहिली नाही, कारण ती जड व चेतन पदार्थाविषयीच्या त्यांच्या प्रेमांत दिसून येत होती. तसेंच सुसंवादित्व व दयाळूपणा यांच्या दैवी नियमांचें जें गूढ कार्य आहे त्याच्या सूक्ष्म आकलनांतहि त्यांची अध्यात्मप्रवणता दिसून येत होती.

# हिंदु आणि ख्रिस्ती लोक

(डेट्रॉइट येथे २१ फेब्रुवारी १८९४ रोजीं दिलेल्या व्याख्यानाचा 'डेट्रॉइट फ्री प्रेस'मधे प्रसिद्ध झालेला अहवाल)

भिन्न भिन्न तत्त्वज्ञांपैकी हिंदु तत्त्वज्ञांची प्रवृत्ति कशाचाहि नाश करण्याकडे नसून प्रत्येक गोष्टीचा मेळ बसविण्याकडे आहे. एखादा नवा विचार जेव्हा भारतांत येतो तेव्हा आम्ही त्याला विरोध न करतां त्याला सामावून घेण्याचा, आधीच्या विचारांशीं त्याचा समन्वय करण्याचा प्रयत्न करतों; कारण, ही पद्धत आम्हांला ईश्वरावतार श्रीकृष्णांनी प्रथम शिकविली. भगवान श्रीकृष्णांनी हें प्रथम उपदेशिलें की, "मी ईश्वरावतार आहें, मीच सर्व धर्मग्रंथांचा प्रेरक आहें, मीच सर्व धर्मांचा प्रवर्तक आहें." म्हणून आम्ही कोणाचाहि त्याग करीत नाहीं.

ख्रिस्ती लोकांत आमच्याहून अत्यंत वेगळा असा एक प्रकार आहे. तो आमच्याकडे कधी शिकविण्यांत आला नाही. तो म्हणजे येशू ख्रिस्तांच्या रक्तदानाने मुक्ति किंवा कोणाहि मनुष्याच्या रक्तदानाने शुद्धि. यहुदी लोकांप्रमाणे आमच्यांतहि बलिदानाची पद्धति होती. बलि देण्यामागची आमची कल्पना पुढीलप्रमाणे आहे : हें अन्न मी सेवन करणार आहें, पण त्याचा कांही भाग ईश्वराला अर्पण केल्याशिवाय तें खाणें योग्य नाही. म्हणून मी तें ईश्वराला अर्पण करतों. ही साधी व शुद्ध कल्पना आहे. पण यहुदी लोकांची अशी कल्पना आहे की 'माझें पाप त्या कोकरावर जावो!' कोकराचा बळी देऊन आपली सुटका व्हावी अशी ही

दा. क्र.

कल्पना आहे. ही सुंदर कल्पना भारतांत उत्पन्न झाली नाही ! आणि याचा मला आनंद होतो. अशा सिद्धान्तानुसार माझी सोडवणूक मी करून घेणार नाहीं. कोणी जर माझ्याकडे येईल आणि म्हणेल की "माझ्या रक्ताने तुम्ही आपली सुटका करून घ्या," तर मी त्याला म्हणेन, "हे बंधो ! तूं जा. मी नरकांत जाईन. निष्पाप व्यक्तीच्या रक्ताने स्वर्गाला जाणारा भेकड मी नाहीं. मी नरकांत जायलाहि तयार आहें." म्हणून आमच्याकडे हा सिद्धान्त कधीच उद्भवला नाही. आमच्या ईश्वरी पुरुषाने आम्हांला असें सांगितलें आहे की, "जेव्हा जेव्हा अधर्माचें प्राबल्य होतें तेव्हा तेव्हा मी या पृथ्वीवर येतों आणि माझ्या भक्तांचें रक्षण करतों. निरनिराळ्या स्थानीं अवतार घेऊन मी हें युगानुयुगें करीत आलों आहें. जगांत जेथे जेथे एखादा असामान्य साधुपुरुष मानवांचा उद्धार करतांना दिसेल तिथे तिथे त्या साधुपुरुषांत मी वास करीत आहें असें समजा."

यावरून तुमच्या ध्यानांत येईल की आम्ही कोणत्याहि धर्माचा विरोध कां करीत नाहीं. आमचा मार्ग हा मुक्तीचा एकमेव मार्ग आहे असें आम्ही म्हणत नाहीं. प्रत्येक व्यक्ति पूर्णत्व प्राप्त करून घेऊं शकते. याला प्रमाण काय म्हणाल, तर पूर्णत्व प्राप्त करून घेतलेल्या व्यक्ति सर्व देशांत आढळतात. सज्जन स्त्रीपुरुष सर्वत्र आहेत, मग ते आमच्या धर्मांत जन्मलेले असोत अगर नसोत. म्हणून आमचा मार्ग हा मुक्तीचा एकमेव मार्ग आहे असें म्हणतां येत नाही. "ज्याप्रमाणे निरनिराळ्या पर्वतांतून निघणाऱ्या निरनिराळ्या नद्या समुद्राला येऊन मिळतात व एकरूप होऊन जातात त्याप्रमाणे भिन्न भिन्न धर्महि सत्याविषयीच्या भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून उगम पावून तुझ्याकडेच येतात." भारतांतील मुलें रोज

जी प्रार्थना करतात त्यांतील हा एक भाग आहे. अशा रोजच्या प्रार्थना जेथे होतात तेथे अर्थातच धार्मिक भेदांवरून भांडणाची कल्पना केवळ अशक्य आहे. भारतांतील तत्त्वज्ञांसंबंधी एवढें पुरें आहे. या सर्वांच्याविषयी आम्हांला अत्यंत आदर आहे. विशेषतः भगवान श्रीकृष्णांनी पूर्वीच्या सर्व आध्यात्मिक अनुभूतींचा समन्वय करण्यांत जी व्यापक दृष्टि दाखविली तिच्यामुळे आम्हांला त्यांच्याविषयी फार आदर आहे.

आता थोडेसें मूर्तिपूजकांविषयी सांगतों. बाबिलोनिया किंवा रोम येथील लोकांच्या मूर्तिपूजेविषयी तुम्हीं जें ऐकलें आहे त्याहून ही मूर्तिपूजा निराळी आहे. हें हिंदूंचें एक खास वैशिष्टच आहे. भक्त मूर्तीच्या पुढे उभा राहतो, डोळे झाकून घेतो आणि असा विचार करतो की 'मी ब्रह्म आहें; मला जन्महि नाही आणि मृत्युहि नाहीं; मला ना माता ना पिता; मी दिक्कालातीत आहें; मी सत्-चित्-आनंदस्वरूप आहें; सोऽहम् सोऽहम्; मी ग्रंथांनी, तीर्थयात्रांनी, तीर्थक्षेत्रांनी किंवा कशानेहि बद्ध नाहीं; मी सत्-चित्-आनंद स्वरूप आहें; सोऽहम् सोऽहम्.' हें पुनःपुन्हा मनांत उच्चारल्यानंतर तो म्हणतो, "हे ईश्वरा ! मी तुला माझ्यांत पाहूं शकत नाहीं ; मी एक दुर्बल मानव आहें." धर्म हा बौद्धिक ज्ञानावर अवलंबून नाही. धर्म म्हणजे आत्माच, धर्म म्हणजे ईश्वरच; केवळ पुस्तकी ज्ञानाने किंवा प्रवचनाने त्याची प्राप्ति होऊं शकत नाही. एखादा चांगला पढिक विद्वान् पाहा आणि आत्म्याला आत्मस्वरूपांत पाहण्यास त्याला सांगा. त्याला तें साधणार नाही. तुम्ही आत्म्याची कल्पना करूं शकाल, तोहि करूं शकेल. अभ्यासाशिवाय आत्म्याचें चिंतन अशक्य आहे. तुम्ही धर्मशास्त्राचें कितीहि अध्ययन करा, त्यामुळे तुम्ही फार तर

मोठे तत्त्वज्ञानी व धर्मशास्त्री व्हाल, पण हिंदु माणूस म्हणेल, "याचा धर्माशीं कांहीहि संबंध नाही." तुम्ही आत्म्याचा आत्मा म्हणून विचार करूं शकतां काय ? तसें होईल तरच सर्व संशय दूर होतील आणि हृदयाची सर्व वक्रता नाहीशी होईल. जेव्हा आत्म्याला परमात्म्याचें प्रत्यक्ष दर्शन होईल तेव्हाच सर्व भय नष्ट होईल आणि सर्व शंकांचें कायमचें निरसन होईल.

एखादा मनुष्य पाश्चात्त्य कल्पनेनुसार मोठा पंडित असेल, पण तरीहि त्याला धर्माचा ओनामा येत असेलच असें नाही. मी त्याला हें सत्य सांगेन. मी त्याला विचारीन, "तुला आत्म्याचा आत्मा म्हणून विचार करतां येतो काय ? अध्यात्मशास्त्रांत तुझी प्रगति झाली आहे काय ? जडाच्या पलीकडे जाऊन तूं आपल्या आत्म्याचा आविष्कार केला आहेस काय ?" तसें नसेल तर मी त्याला म्हणेन, "धर्माची तुला प्राप्ति झाली नाही ; ही सर्व पुस्तकी बडबड आहे, अहंकार आहे." पण हा बिचारा हिंदु या मूर्तीपुढे बसतो आणि 'मी ब्रह्म आहें' असें चिंतन करण्याचा प्रयत्न करतो आणि म्हणतो, "हे ईश्वरा ! मी तुला आत्म-स्वरूपांत पाहूं शकत नाहीं, तेव्हा ह्या मूर्तीच्या द्वारें मला तुझी कल्पना करूं दे." मग तो डोळे उघडतो आणि त्या मूर्तीला पाहून तो तिला नमस्कार करतो आणि प्रार्थना करतो. जेव्हा त्याची प्रार्थना संपते तेव्हा तो म्हणतो, "हे ईश्वरा, तुझ्या या अपूर्ण पूजेबद्दल मला क्षमा कर."

तुम्हांला नेहमी सांगण्यांत येतें की हिंदु लोक दगडाधोंड्यांची पूजा करतात. आता तुम्ही या लोकांच्या हृदयांतील उत्कट कळ-कळीविषयी काय म्हणाल ? या पाश्चात्त्य देशांत येणारा मी पहिलाच संन्यासी आहें. जगाच्या इतिहासांत पहिल्यांदाच एक

हिंदु संन्यासी समुद्रपार आला आहे. पण अशा तऱ्हेच्या टीका आणि बोलणें आम्ही ऐकतों. आणि हिंदु लोकांची तुमच्याविषयी सामान्य वृत्ति काय आहे ? ते स्मित करतात आणि म्हणतात, "ते अज्ञ बालक आहेत; ते भौतिक शास्त्रांत मोठे असतील; ते प्रचंड गोष्टी निर्माण करूं शकत असतील, पण धर्माच्या बाबतींत ते केवळ बालक आहेत." माझ्या देशांतील लोकांची तुमच्याविषयी ही भावना आहे.

कठोर टीका करण्याचा माझा हेतु नाही, पण एक गोष्ट तुम्हांला सांगतों. तुम्ही लोकांना कपडालत्ता देतां, पैसा देतां, त्यांना शिकवून तयार करतां, पण कशासाठी ? तर माझ्या देशांत जाऊन त्यांनी माझ्या पूर्वजांना, माझ्या धर्माला व तेथील प्रत्येक गोष्टीला शिव्याशाप द्यावेत, तिची निंदा करावी म्हणून. ते एखाद्या देवळाजवळ जातात आणि म्हणतात, "हे मूर्तिपूजकांनो, तुम्ही नरकांत जाल." पण हेंच ते भारतांतील मुसलमानांच्या बाबतींत करूं धजत नाहीत, कारण या मुसलमानांची तलवार म्यानांतून बाहेर पडेल. पण हिंदु लोक फार सौम्य आहेत. ते हसून पुढे जातील आणि म्हणतील, "या मूर्ख लोकांना बरळूं द्या." अशा प्रकारची त्यांची वृत्ति आहे. आणि लोकांना निंदा करण्याचें शिक्षण देणारे तुम्ही, त्या तुम्हांला मीं अत्यंत सद्हेतूनेंहि केलेली थोडीशीहि टीका सहन होत नाही. टीकेचा स्पर्श होतांच तुम्ही चपापतां आणि ओरडतां, "आम्हांला हात लावूं नका. आम्ही अमेरिकन आहोंत ! आम्ही जगांतील सर्व लोकांची निंदा करूं, त्यांना शिव्याशाप देऊं, काय वाटेल तें म्हणूं, पण आम्हांला तुम्ही स्पर्शहि करूं नका; आम्हांला तें मुळीच सहन होणार नाही; आम्ही नाजुक वनस्पतीसारखे आहोंत." तुम्हांला जें आवडेल तें

ही करूं शकतां. पण मीहि तुम्हांला सांगतों की आम्ही जसे आहोंत तसेंच ठीक आहोंत. त्यांतच आम्हांला समाधान आहे. एका बाबतींत उलट आम्ही फार चांगले आहोंत. आम्ही आमच्या मुलांना असली भयंकर कल्पना मान्य करायला शिकवीत नाही की जगांतील इतर सर्व वस्तु चांगल्या आहेत, पण मनुष्यच तेवढा अधम व दुष्ट आहे. तुमचे धर्मोपदेशक जेव्हा जेव्हा आमच्यावर टीका करतील तेव्हा तेव्हा त्यांनी ही गोष्ट लक्षांत ठेवावी की भारतांतील सर्व लोक जर उठतील आणि हिंदी महासागराच्या तळाशीं असलेला सर्व चिखल गोळा करून तो पाश्चात्त्य देशांतील लोकांवर फेकतील तर तो, तुम्ही जी चिखलफेक आमच्यावर करीत आहांत तिचा अल्पांशहि ठरणार नाही. आणि तुम्ही ही चिखलफेक कशासाठी करतां ? आम्हीं कधीतरी कोणा एकालाहि धर्मान्तरित करण्यासाठी जगांत एखादा तरी 'मिशनरी' पाठविला होता काय ? आम्ही तुम्हांला म्हणतों, "तुमच्या धर्माचें स्वागत असो ! पण मला माझा धर्म अनुसरूं द्या." तुम्ही तुमच्या धर्माला आक्रमक धर्म म्हणतां. तुम्ही आक्रमक आहांत. पण किती लोक तुम्हीं आपल्या धर्मांत ओढले आहेत ? जगांतील दर पांच माणसें सोडून सहावा माणूस हा चीनचा प्रजाजन असून तो बौद्ध आहे. शिवाय जपान, तिबेट, रशिया, सैबेरिया, ब्रह्मदेश व सयाम हे देश आहेतच. हें कदाचित् तुम्हांला रुचणार नाही, पण ही ख्रिस्ती नीति, हें कॅथॉलिक मत, हें सर्व बौद्धांपासून घेतलेलें आहे. आणि हें कसें घडलें ? रक्ताचा एक थेंबहि न सांडतां. तुमच्या सर्व फुशारक्या आणि बढाया जमेला धरल्या तरी तुमचा ख्रिस्ती धर्म तलवारीशिवाय कोठे यशस्वी झाला आहे ? संपूर्ण जगांत मला तसें एक तरी ठिकाण दाखवा. ख्रिस्ती धर्माच्या

सर्व इतिहासांत फक्त एकच तसें उदाहरण दाखवा; एक दाखवा, मी दोन मागत नाहीं. तुमच्या पूर्वजांचें धर्मान्तर कसे झालें हें मला माहीत आहे. त्यांच्या समोर धर्मान्तर किंवा मृत्यु हे दोनच पर्याय होते. तुम्हीं कितीहि फुशारक्या मारल्या तरी इस्लाम धर्मापेक्षा अधिक चांगलें तुम्ही काय करूं शकतां ? "आमचाच धर्म खरा आहे !" कां ?--तर "आम्ही दुसऱ्यांना ठार करूं शकतों." अरबांनी हेंच म्हटलें होतें. हीच फुशारकी त्यांनी मारली होती. आणि आता ते अरब कुठे आहेत ? ते वाळवंटाचे रहिवासी आहेत. रोमन लोक असेंच म्हणत असत, आणि ते तरी आता कोठे आहेत ? शांति प्रस्थापित करणारे धन्य होत. तेच पृथ्वीचा उपभोग घेतील. अशा गोष्टी गडगडतात. त्या वाळूच्या पायावर उभारलेल्या असतात. त्या फार काळ टिकूं शकत नाहीत.

ज्याची उभारणी स्वार्थाच्या पायावर झाली आहे, ज्यांत स्पर्धेलाच महत्त्व आहे व भोग हेंच ज्याचें उद्दिष्ट आहे तें लवकर किंवा उशिरा नष्ट होईलच. अशा गोष्टी नष्ट होणें अपरिहार्यच आहे. बंधूंनो ! मी तुम्हांला सांगूं इच्छितों की तुम्हांला जर जगायचें असेल, तुमचें राष्ट्र जिवंत राहावें असें जर तुम्हांला खरोखर वाटत असेल तर ख्रिस्तांकडे परत जा. तुम्ही ख्रिस्ती नाही. राष्ट्र म्हणून तुम्ही ख्रिस्ती मुळीच नाही. ख्रिस्ताकडे परत जा. ज्याला डोकें ठेवण्यास कोठेहि जागा नव्हती त्याच्याकडे परत जा. "पक्ष्यांना त्यांचीं घरटीं आहेत, पशूंना त्यांच्या गुहा आहेत, परंतु मानवाच्या पुत्राला--ख्रिस्ताला--आपलें डोकें ठेवायला कुठेच जागा नाही." विलासाच्या नांवाने उपदेशिला जाणारा तुमचा धर्म आहे. काय हा दैवदुर्विलास ! यांत बदल करा. तुम्हांला

जगायचें असेल तर हें बदला. या देशांत मीं जें कांही ऐकलें आहे तें सर्व ढोंग आहे ! या देशाला जिवंत राहायचें असेल तर त्याने ख्रिस्तांकडे परत जावें. ईश्वराची आणि संपत्तीची आराधना तुम्ही एकाच वेळीं करूं शकत नाही. हा सर्व ऐहिक उत्कर्ष आणि तो ख्रिस्तांमुळे ! या सर्व पाखंडाचा येशू ख्रिस्तांनी निषेध केला असता. संपत्ति व तिच्यापासून मिळणारें सर्व वैभव चंचल आहे, क्षणिक आहे. खरें चिरंतनत्व ईश्वरांतच आहे. हें अद्‌भुत वैभव आणि ख्रिस्तांचा आदर्श यांची जर तुम्ही सांगड घालूं शकाल तर ठीक आहे. पण तें जर शक्य नसेल तर हें सोडून देऊन ख्रिस्तांकडे परत जाणेंच चांगलें. ख्रिस्तांशिवाय प्रासादांत राहण्यापेक्षा त्यांच्यासह दारिद्र्यांत राहण्याची तयारी असूं द्या.

# भारतांतील ख्रिस्ती धर्म

(११ मार्च १८९४ रोजीं डेट्रॉइट येथे दिलेल्या व्याख्यानाचा 'डेट्रॉइट फ्री प्रेस'मधे प्रसिद्ध झालेला अहवाल)

काल रात्रीं 'डेट्रॉइट ऑपेरा हाउस'मधे विवेकानंद यांचें विशाल श्रोतृसमुदायासमोर व्याख्यान झालें. अत्यंत प्रेमाने त्यांचें स्वागत करण्यांत आलें आणि त्यांनी येथे अत्यंत वक्तृत्वपूर्ण असें भाषण दिलें. ते अडीच तास बोलले.

माननीय टी. डब्ल्यू. पामर यांनी सुप्रसिद्ध पाहुण्यांचा परिचय करून देतांना एक जुनी गोष्ट सांगितली. एका ढालीची एक बाजू तांब्याची होती आणि दुसरी बाजू चांदीची होती. ढालीची फक्त एकेकच बाजू पाहिल्यामुळे भांडण उपस्थित झालें होतें. कोणत्याहि प्रश्नाच्या दोन्ही बाजू जर आपण पाहिल्या तर भांडणें कमी होतील. मग सर्वांचें एकमत होऊं शकेल. परदेशांत मिशनरी पाठविण्याचा विषय धार्मिक व्यक्तींना जिव्हाळ्याचा वाटतो. विवेकानंद हे ख्रिस्ती लोकांच्या दृष्टीने पाखंडी आहेत असें श्री. पामर म्हणाले. ढालीच्या तांब्याच्या बाजूविषयी बोलणाऱ्या व्यक्तीचें व्याख्यान ऐकणें सगळ्यांना आवडेल.

टाळ्यांच्या गजराने विवेकानंदांचें स्वागत करण्यांत आलें. . . . त्यांनी पुढीलप्रमाणे व्याख्यान दिलें:—

जपान व चीन या देशांतील मिशनऱ्यांविषयी मला विशेष माहिती नाही, परंतु भारतांतील परिस्थिति मी चांगली जाणून आहें. या देशांतील लोक भारताकडे 'पुष्कळशीं अरण्यें व कांही

भ्य इंग्रज लोक असलेला विरळ लोकवस्तीचा प्रचंड देश' या दृष्टीने पाहतात. भारताचा विस्तार संयुक्त संस्थानांच्या विस्ताराच्या अर्धा असून त्यांत तीस कोटी लोक राहतात. भारताविषयी येथे पुष्कळशा चुकीच्या गोष्टी सांगितल्या जातात. त्या खोटया आहेत हें सांगून सांगून मी थकलों. ख्रिस्ती लोक जेव्हा एखाद्या नव्या प्रदेशांत गेले तेव्हा त्यांनी येथील मूळ रहिवाशांना नष्ट करण्याचा जसा प्रयत्न केला तसा भारतांत प्रथम बाहेरून आलेल्या आर्यांनी केला नाही. उलट पाशवी स्वभावाच्या लोकांना उन्नत करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. स्पेनचे लोक ख्रिस्ती धर्म बरोबर घेऊन सिलोनमधे आले. स्पेन-मधील लोकांची कल्पना अशी की त्यांच्या ईश्वराने अधर्मी लोकांना ठार मारण्याचा व त्यांचीं देवळें उध्वस्त करण्याचा त्यांना आदेश दिला आहे. तेथील बौद्ध लोकांजवळ त्यांच्या प्रेषिताचा एक फूट लांब असा एक दांत होता. स्पेनमधील लोकांनी तो समुद्रांत फेकून दिला. कांही हजार लोकांची त्यांनी कत्तल केली आणि कांही थोडया लोकांचें धर्मान्तर केलें. पोर्तुगीज लोक पश्चिम भारतांत आले. हिंदूंची त्रिमूर्तीवर श्रद्धा आहे आणि त्यांनी त्या श्रद्धेनुसार एक देवालय बांधलें होतें. आक्रमकांनी त्या देवळाकडे पाहिलें व म्हटलें की हें सैतानाचें कार्य आहे. म्हणून त्यांनी आपला तोफखाना आणून त्या आश्चर्यकारक वास्तूवर त्याचा मारा केला व त्याचा कांही भाग उध्वस्त केला. पण खवळलेल्या लोकांनी आक्रमकांना देशाबाहेर घालवून दिलें. आरंभींच्या मिशनऱ्यांनी देशाचा ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला आणि बलप्रयोगाने पाय रोवण्याच्या प्रयत्नांत त्यांनी पुष्कळ लोकांना ठार केलें व कांही थोडयांचें धर्मान्तर केलें. कांही थोडे

लोक जीव वांचविण्यासाठी ख्रिस्ती झाले. पोर्तुगीजांच्या तलवारी ज्यांनी धर्मान्तर केलें त्यांपैकी शेकडा ९९ लोकांनी जबरदस्ती-मुळे तसें केलें. ते म्हणत, "आमचा ख्रिस्ती धर्मावर विश्वास नाही. पण स्वत:ला ख्रिस्ती म्हणविणें आम्हांला भाग पडत आहे." पण ख्रिस्ती धर्माच्या कॅथॉलिक संप्रदायाचें नवें आक्रमण लवकरच सुरू झालें.

ईस्ट इंडिया कंपनीने अनुकूल संधीचा लाभ घेऊन भारताच्या कांही भागावर ताबा मिळविला. त्यांनी मिशनऱ्यांना दूर ठेवलें. व्यापारांत मग्न असलेल्या इंग्रजांनी नव्हे, तर हिंदूंनी प्रथम मिशनऱ्यांचें स्वागत केलें. ह्या काळांतील पहिल्या कांही मिश-नऱ्यांविषयी मला विशेष आदर वाटतो. ते येशू ख्रिस्तांचे खरे सेवक होते. त्यांनी लोकांची बदनामी केली नाही, किंवा त्यांच्या-विषयी खोटया कंडया पिकविल्या नाहीत. ते सौम्य व सहृदय लोक होते. जेव्हा इंग्रज भारताचे स्वामी झाले तेव्हा मिशनऱ्यांच्या कार्याची वाढ थांबली. भारतांतील मिशनऱ्यांच्या कार्याची आजची स्थिति अशीच आहे. आरंभीचे एक मिशनरी डॉ. लाँग यांनी लोकांची बाजू घेतली. निळीच्या मळयांच्या इंग्रज मालकांनी भारतांत केलेलीं दुष्कृत्यें चित्रित करणाऱ्या एका हिंदु नाटकाचें त्यांनी भाषांतर केलें. त्याचा परिणाम असा झाला की इंग्रजांनी त्यांना तुरुंगांत टाकलें. असे मिशनरी देशाच्या उपयोगी पडत होते. पण ते आता राहिले नाहीत. सुएझ कालव्याने कितीतरी वाईट गोष्टींना मार्ग मोकळा करून दिला आहे.

आता विवाहित मिशनरी तिकडे जातात. लग्न केल्यामुळे त्यांच्या मार्गांत अडथळे उत्पन्न होतात. त्यांना येथील लोकांविषयी कांही माहिती नसते, त्यांना त्यांची भाषा येत नाही. म्हणून ते

मी गोऱ्या लोकांच्या लहानशा वस्तींत जाऊन राहतात. त्यांनी लग्न केलें असल्यामुळे त्यांना असें करणें भागच असतें. त्यांनी लग्न केलें नसतें तर ते लोकांत जाऊन मिसळूं शकले असते, त्यांच्याबरोबर जमिनीवर झोपले असते. सारांश, ते हिंदुस्थानांत आपल्या बायकामुलांसाठी शेजारी-सोबती शोधतात. इंग्रजी बोलणाऱ्या लोकांतच ते राहतात. आज मिशनऱ्यांचें कार्य भारताच्या हृदयापर्यंत मुळीच पोहोचत नाही. अधिकांश मिशनरी कार्य करण्यास लायक नसतात. मला असा एकहि मिशनरी भेटला नाही की ज्याला संस्कृत समजतें. जो मनुष्य लोकांविषयी व त्यांच्या परंपरांविषयी पूर्णपणें अज्ञ आहे त्याच्याविषयी लोकांना आपुलकी कशी वाटेल ? तुम्हांला दुखविण्याचा माझा हेतु नाही, परंतु ख्रिस्ती लोक असे मिशनरी पाठवितात की जे मोठ्या योग्यतेचे नसतात. समाधानकारक परिणाम घडून येत नसतांना धर्मान्तर घडवून आणण्यासाठी इतका पैसा खर्च होतांना पाहून वाईट वाटतें.

ज्यांनी धर्मान्तर केलें आहे असे थोडेच लोक आहेत, आणि ते मिशनऱ्यांच्या भोवतीच राहून कशीतरी आपली उपजीविका चालवितात. ख्रिस्ती झालेल्या ज्या लोकांना भारतांत नोकरी दिली जात नाही ते ख्रिस्ती राहत नाहीत. थोडक्यांत असें हें चित्र आहे. धर्मान्तर करण्याच्या मार्गाबद्दल म्हणाल तर तो अत्यंत हास्यास्पद आहे. मिशनरी जो पैसा आणतात तो लोक स्वीकारतात. मिशनऱ्यांनी जीं महाविद्यालयें स्थापन केलीं आहेत तीं, शिक्षणा-पुरतें पाहिल्यास, चांगलीं आहेत. पण धर्माच्या बाबतींत प्रकार निराळा आहे. हिंदु लोक मोठे चतुर आहेत; ते आमिष घेतात पण गळ चुकवितात ! ते लोक विलक्षण सहिष्णु आहेत ! एका

मिशनऱ्याने एकदा म्हटलें, "या सर्व व्यवहारांत तीच सव वाईट गोष्ट आहे. जे लोक स्वसंतुष्ट आहेत त्यांचें धर्मान्तर कधीहि केलें जाऊं शकत नाही."

मिशनरी स्त्रियांच्या संबंधी सांगायचें तर महिना चार शिलिंग त्यांना मिळतात. त्या कांही घरांना भेटी देतात, तेथील स्त्रियांना बायबलमधील कांही थोडें शिकवितात व विणकाम कसें करावें हें दाखवितात. भारतांतील मुली कधीहि धर्मान्तर करणार नाहीत. स्वतःच्या देशांतील नास्तिकता व संदेहवाद यांमुळेच मिशनऱ्यांना दुसऱ्या देशांत जावें लागत आहे. मी जेव्हा या देशांत आलों तेव्हा अनेक उदारमतवादी स्त्रीपुरुष येथे आहेत हें पाहून मला आश्चर्य वाटलें. पण धर्मपरिषदेनंतर प्रेसबिटेरियन पंथाच्या एका वृत्तपत्राने पुढे होऊन एक कडक टीकात्मक लेख प्रसिद्ध केला. संपादकाने याला 'उत्साह' म्हटलें आहे. मिशनरी लोक राष्ट्रीयत्व झुगारून देत नाहीत आणि देऊं शकत नाहीत. तितके ते उदार मताचे नाहीत म्हणून धर्मान्तराच्या दृष्टीने त्यांना फारसें यश येत नाही. फार तर त्यांचा वेळ आपसांत मोठा मजेंत जात असेल. भारताला येशू ख्रिस्तांची मदत हवी आहे, पण ख्रिस्त-विरोधकांची नव्हे. हे लोक ख्रिस्तांसारखे नाहीत. ते ख्रिस्तांसारखे वागत नाहीत. ते विवाहित असतात; आमच्या देशांत जातात, आरामांत राहतात आणि उत्तम प्रकारें उपजीविका चालवितात. अनेक हिंदु संतांप्रमाणेच येशू ख्रिस्त आणि त्यांचे शिष्य भारतांत पुष्कळच चांगलें कार्य करूं शकतात. पण हे मिशनरी लोक त्या पवित्र वृत्तीचे नाहीत. हिंदु लोक ख्रिस्ती लोकांच्या येशू ख्रिस्तांचें आनंदाने स्वागत करतील, कारण त्यांचें जीवन पवित्र व सुंदर होतें. परंतु अज्ञानी, ढोंगी आणि आत्मवंचक लोकांचे संकुचित

स्वरूपाचे उद्गार ते ऐकून घेणार नाहीत.

मानवामानवांत भेद आहे. तसें नसतें तर जगाचा मानसिक दृष्टीने अधःपात झाला असता. जगांत भिन्न भिन्न धर्म नसते तर कोणताच धर्म टिकून राहिला नसता. ख्रिस्ती लोकांना त्यांच्या स्वतःच्या धर्माची गरज आहे, हिंदूनाहि स्वतःच्या धर्माची आवश्यकता आहे. सर्व धर्मांचा पुष्कळ वर्षे एकमेकांशीं संघर्ष झालेला आहे. ज्या धर्मांची उभारणी एखाद्या ग्रंथावर झाली होती ते आजहि टिकून आहेत. ख्रिस्ती लोक यहुद्यांचें धर्मपरिवर्तन कां करूं शकले नाहीत ? पारशी लोकांना ते कां ख्रिस्ती बनवूं शकले नाहीत ? मुसलमानांचें धर्मान्तर ते कां करूं शकले नाहीत ? चीनवर व जपानवर त्यांना कोणताहि प्रभाव कां पाडतां आला नाही ? बौद्धधर्म हा पहिला प्रचारक धर्म आहे. त्याचे अनुयायी, इतर धर्मांत धर्मान्तराच्या मार्गाने आलेल्यांच्या दुप्पट आहेत, आणि तरी बौद्धांनी तलवारीचा उपयोग केला नाही. मुसलमानांनी जास्तींत जास्त बलाचा उपयोग केला. तीन प्रमुख प्रचारक धर्मांमधे त्यांची संख्या सर्वांत कमी आहे. मुसलमानांचे दिवस मागे पडले. ख्रिस्ती राष्ट्रें रक्तपाताने भूप्रदेश व्यापीत असल्याचें रोज वाचण्यांत येतें. याच्या विरुद्ध मिशनरी लोक कोणता उपदेश करतात ? अत्यंत रक्तपिपासु राष्ट्रांनी तथाकथित धर्माची स्तुति कां करावी ? तो कांही येशू ख्रिस्तांचा धर्म नाही. यहुदी आणि अरब हे ख्रिस्ती धर्माचे जनक होते. पण ख्रिस्ती लोकांकडून त्यांचा कसा छळ झाला ! भारतांत ख्रिस्ती लोकांचें तोलमाप करण्यांत आलें आणि ते उणे भरले. मला कठोर टीका करावयाची नाही, पण मला ख्रिस्ती लोकांना दाखवून द्यावयाचें आहे की इतरांच्या दृष्टीला ते कसे दिसतात. जे मिशनरी

नरकाग्नीची शिकवण देतात त्यांच्याविषयी इतरांना भयमिश्रित घृणा वाटते. मुसलमानांच्या लाटांवर लाटा तलवार परजीत भारतावर आदळल्या, पण आज ते कुठे आहेत ?

एका आत्मतत्त्वाच्या पलीकडे कोणताहि धर्म जाऊं शकत नाही; म्हणून कोणताहि धर्म त्याच्या पलीकडे कांही शिकवूं शकत नाही. प्रत्येक धर्मांत कांही सारभूत सत्य असतें, आणि तें सत्यरूपी रत्न ठेवण्यासाठी कांही गौण गोष्टींची एक मंजूषा असते. यहुद्यांच्या किंवा हिंदूंच्या धर्मग्रंथांवर श्रद्धा असणें ही गौण गोष्ट आहे. परिस्थिति बदलते; मंजूषा बदलते; पण आंतील सत्य तेंच राहतें. सारभूत तत्त्वें तींच राहत असल्यामुळे प्रत्येक समाजांतील सुशिक्षित लोक तीं सुरक्षित ठेवतात. तुम्ही जर ‘तुझ्या सारभूत गोष्टी कोणत्या आहेत ?’ असें एखाद्या ख्रिस्ती माणसाला विचारलें तर त्याने उत्तर दिलें पाहिजे--“येशू ख्रिस्तांची शिकवण.” बाकी जें कांही उरतें त्याचा अधिकांश भाग निरर्थक आहे. पण गौण भागदेखील उपयोगी असतो, कारण तो मंजुषेसारखा असतो. शिंपला कांही आकर्षक नसतो, पण त्याच्या आंत मोत्यें असतें. हिंदु मनुष्य येशू ख्रिस्तांच्या जीवनावर कधी टीका करणार नाही. ‘पर्वतावरील उपदेशा’बद्दलहि (‘Sermon on the Mount’-बद्दलहि) तो आदर बाळगतो. परंतु किती ख्रिस्ती लोकांना हिंदु संतांच्या शिकवणीची ऐकून तरी माहिती आहे ? ते अज्ञानांतच आनंद मानतात. जगांतील लोकसंख्येचा लहानसा भाग धर्मान्तरित होण्यापूर्वी ख्रिस्ती धर्म अनेक पंथांत विभागला गेला. हा निसर्गाचा नियमच आहे जगांतील विविध धर्मांच्या वाद्यवृंदांतून एकच वाद्य कां बरें घ्यावें ? वाद्यांचा तो सुंदर मेळ कायम राहूं द्या. पवित्र व्हा. भ्रामक कल्पना सोडा आणि निसर्गातील आश्चर्यकारक

ंवाद पाहा. भ्रामक कल्पनाच खऱ्या धर्मावर मात करतात. सर्वच धर्म चांगले आहेत, कारण त्यांतील सारभूत तत्त्वें सारखींच आहेत. प्रत्येक मनुष्याला आपल्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा पूर्ण विकास करतां आला पाहिजे. परंतु सर्वांचीं व्यक्तित्वें मिळून एक पूर्ण वस्तु बनते. अशी उत्कृष्ट अवस्था आधीपासूनच अस्तित्वांत आहे. प्रत्येक पंथाजवळ कांही ना कांही तरी जगाला देण्यासारखें असतें.

ज्या हिंदूंना येशू ख्रिस्तांच्या चारित्र्यांतील सौंदर्य प्रतीत होत नाही त्यांची मला कीव येते. हिंदूमधील 'ख्रिस्तां'बद्दल--हिंदु महापुरुषांबद्दल--ज्या ख्रिस्ती लोकांना आदर वाटत नाही त्यांचीहि मी कीव करतों. मनुष्य जितका स्वत:कडे जास्त पाहतो तितकाच तो इतरांच्याकडे कमी लक्ष देतो. जे लोकांचें धर्मान्तर करीत फिरतात, जे दुसऱ्यांच्या आत्म्यांना वांचविण्यांत मग्न असतात ते पुष्कळ वेळां स्वत:च्या आत्म्यांना विसरतात. मला एका स्त्रीने विचारलें की भारतांतील स्त्रियांची उन्नति अधिक कां झाली नाही ? मुख्यत: निरनिराळ्या काळांत झालेल्या रानटी लोकांच्या आक्रमणामुळे असें झालें आहे, आणि अंशत: भारतवासीदेखील याला कारणीभूत आहेत. परंतु आमच्या देशांतील स्त्रिया कोणत्याहि काळीं या देशांतील, कादंबऱ्या व नृत्यगृहें यांना वाहून घेतलेल्या स्त्रियांपेक्षा अधिक चांगल्या आहेत. आपल्या सभ्यतेविषयी इतकी प्रौढी मिरविणाऱ्या या देशांत कोणालाहि अपेक्षित अशी आध्यात्मिकता कोठे आहे ? मला ती आढळली नाही. 'इहलोक' आणि 'परलोक' हे शब्द अज्ञ लोकांना भिवविण्यासाठी आहेत. जें कांही आहे तें इथेच आहे. इथेच आणि याच जन्मांत ईश्वरामधे वास केला पाहिजे. सर्व स्वार्थ गेला

पाहिजे; सर्व भ्रामक कल्पना दूर झाल्या पाहिजेत. असे लं भारतांत आहेत. या देशांत असे लोक कुठे आहेत ? तुमचे उप देशक 'स्वप्नाळू' लोकांच्या विरुद्ध बोलतात. या देशांत असे स्वप्नाळू जर अधिक असते तर हा देश अधिक चांगला झाला असता. या देशांतील एखादा मनुष्य जर येशू ख्रिस्तांची शिकवण तंतोतंत पाळील तर त्याला 'धर्मवेडा' म्हटलें जाईल. स्वप्नाळूपणा आणि एकोणिसाव्या शतकांतील बढाईखोर-पणा यांत फार अंतर आहे. मधमाशा फुलाकडेच आकृष्ट होतात. आपलें जीवनरूपी कमल विकसित होऊं द्या. संपूर्ण जग हें ईश्वराने भरलेलें आहे, पापाने नव्हे. आपण एकमेकांना साहाय्य करूं या. आपण एकमेकांवर प्रेम करूं या. बौद्धांची एक सुंदर प्रार्थना आहे —"मी सर्व संतांना प्रणाम करतों; मी सर्व प्रेषितांना प्रणाम करतों; मी जगांतील सर्व संत स्त्रीपुरुषांना प्रणाम करतों."

---

# प्रेमयोग

(१६ नोव्हेंबर १८९५ रोजीं लंडन येथे दिलेल्या एका व्याख्यानाची टिपणें)

आत्मानुभव प्राप्त करून घेण्यासाठी मनुष्याला प्रथम प्रतीकांचें व विधि-अनुष्ठानांचें साहाय्य घ्यावें लागतें. म्हणून भारतांतील लोक म्हणतात, "एखाद्या संप्रदायांत जन्माला येणें हें चांगलें असलें तरी त्यांतच मृत्यु पावणें हें वाईट आहे." एखाद्या रोपट्याला संरक्षणासाठी कुंपणाची गरज असते, पण त्याचा वृक्ष झाल्यावर तें कुंपण त्याच्या वाढीला अडथळा करतें. म्हणून जुन्या विधि-अनुष्ठानांना नांवें ठेवण्याची किंवा त्यांचा निषेध करण्याची गरज नाही. आपण हें विसरतों की धर्माच्या क्षेत्रांत विकास ही आवश्यक गोष्ट आहे.

प्रथम आपण सगुण ईश्वराची कल्पना करतों, आणि त्याला सृष्टिकर्ता, सर्वशक्तिमान्, सर्वव्यापी इत्यादि म्हणतों, पण जेव्हा प्रेमाचा उदय होतो तेव्हा ईश्वर प्रेमस्वरूप होऊन जातो. भक्त हा ईश्वर काय व कसा आहे याला महत्त्व देत नाही, कारण त्याला ईश्वराकडून कशाचीच अपेक्षा नसते. एक भारतीय संत म्हणतो-- "मी याचक नाहीं." भक्ताला ईश्वराचें भयहि वाटत नाही. एखाद्या मानवावर प्रेम करावें त्याप्रमाणे तो ईश्वरावर प्रेम करतो.

प्रेमावर आधारलेले कांही उपासनामार्ग पुढीलप्रमाणे आहेत : (१) शांत भक्ति--सामान्य शांत प्रेम. यांत ईश्वर पिता आहे व साहाय्यकर्ता आहे यांसारखे विचार अंतर्भूत असतात. (२) दास्य भक्ति--सेवेचा आदर्श; यांत ईश्वर हा स्वामी किंवा

सेनापति किंवा सम्राट असून तो शिक्षा करणारा अथवा पुरस्कार देणारा आहे अशी कल्पना केलेली असते. (३) वात्सल्य भक्ति-- यांत ईश्वराला माता किंवा मूल समजण्यांत येतें. भारतांत माता ही मुलाला कधी शिक्षा करीत नाही. या प्रत्येक अवस्थेंत उपासक ईश्वराचें एक ध्येय रूप कल्पितो आणि त्याची आराधना करतो. त्यानंतर (४) सख्य भक्तीचा प्रारंभ होतो. या भक्तींत भयाला मुळीच स्थान नसतें. तिच्यांत ईश्वराविषयी समानतेची व आपुलकीची भावना असते. कांही हिंदु लोक ईश्वराला सखा किंवा खेळगडी म्हणून भजणारे आहेत. यानंतरची अवस्था म्हणजे (५) मधुर भक्ति--पति व पत्नी यांचें प्रेम. सेंट टेरेसा आणि इतर प्रेमोन्मत्त संत हे याचीं उदाहरणें होत. इराणांतील लोक ईश्वराला पत्नी मानून त्याची उपासना करतात, तर हिंदु लोक त्याला पति मानून त्याची आराधना करतात. या ठिकाणीं आपल्याला मीराबाईचें स्मरण होईल. ईश्वर हाच पति आहे व तोच सर्वस्व आहे अशी तिची शिकवण होती. या मार्गात कित्येक लोक इतक्या टोकाला जातात की ईश्वराला 'शक्तिमान' किंवा 'पिता' असें संबोधणेंहि त्यांना ईश्वराची निंदा वाटते. या उपासनेंतील भाषाहि शृंगारिक असते. कांही तर निषिद्ध प्रेमाची भाषाहि वापरतात. कृष्ण व गोपी यांची कथा याच प्रकारची आहे. हा सर्व प्रकार उपासकाला अध:पाताकडे नेणारा आहे असें कदाचित् तुम्हांला वाटेल. तसा तो कांहीसा आहेहि. तथापि याच मार्गाने अनेक थोर संतांचा विकास झाला आहे. तसेंच, कोणत्याहि मानवी पद्धतीचा दुरुपयोग केला जाऊं शकतो. भिकारी आहेत म्हणून तुम्ही स्वयंपाकच करणार नाही काय? चोर आहेत म्हणून तुम्ही कशाचाच संग्रह करणार नाही काय? "हे प्रियकरा, तुझ्या

अधराच्या एका चुंबनाने मला वेड लावलें आहे."

या मधुर भक्तीचा परिणाम हा आहे की उपासक मग कोणत्याहि पंथांत किंवा विधिअनुष्ठानांत अडकून राहूं शकत नाही. भारतांत धर्माचें पर्यवसान मुक्तींत होतें. पण भक्त तिचाहि त्याग करून प्रेमासाठीच प्रेम करूं लागतो.

सर्वांत शेवटीं भेदातीत असें प्रेम निर्माण होतें. हें प्रेम आत्मस्वरूप असतें. फारशी भाषेंतील एक कविता आहे. तींत वर्णिलें आहे की एक प्रेमिक आपल्या प्रेयसीच्या घरीं गेला व त्याने दारावर थाप दिली. तिने विचारलें, "तूं कोण आहेस ?" त्याने उत्तर दिलें, "मी अमुक आहें. मी तुझा प्रियकर आहें." तिने फक्त एवढेंच म्हटलें, "जा. मला असा कोणी माहीत नाही." जेव्हा चौथ्यांदा तिने तोच प्रश्न विचारला तेव्हा तो म्हणाला, "मी तूंच आहें. म्हणून हे प्रिये, तूं माझ्यासाठी दार उघड." आणि तिने दार उघडलें.

एका संताने प्रेमाचें वर्णन करतांना एका मुलीच्या भाषेंत म्हटलें आहे, "चार नेत्रांचें मीलन झालें, दोन आत्म्यांत परिवर्तन झालें. आता मला हें सांगतां येत नाही की तो पुरुष असून मी स्त्री आहें की तो स्त्री असून मी पुरुष आहें. एवढें मात्र मला स्मरतें की दोन आत्मे होते. प्रेमाचा उदय झाला आणि दोहोंचा एक आत्मा झाला."

उच्चतम प्रेमांत फक्त आत्म्यांचें मीलन असतें. इतर कोणत्याहि प्रकारचें प्रेम हें क्षणिक आहे. फक्त आत्म्याचें प्रेमच चिरंतन आहे आणि तें वाढतच जातें.

प्रेम आपला आदर्श पाहतें. प्रेमाच्या त्रिकोणाचा हा तिसरा कोन आहे. ईश्वर हा कारण, निर्माता, पिता मानला गेला आहे.

प्रेम हा कळस आहे. आपलें मूल कुबडें असल्याचें पाहून आईला दुःख होतें. पण कांही दिवस त्याचें पालनपोषण केल्यावर ती त्याच्यावर प्रेम करते आणि तें तिला फार सुंदर वाटावयास लागतें. प्रेमिकाला एथियोपियाच्या चेहऱ्यावरहि हेलेनचें सौंदर्य दिसतें. यांत काय होतें हें सामान्यतः आपल्याला कळत नाही. एथियोपियाचा चेहरा हें केवळ निमित्त असतें आणि मनुष्याला तिथे हेलेनचाच चेहरा दिसतो. शिंपल्यांतला किडा ज्याप्रमाणे वाळूच्या कणाचें मोत्यें बनवितो त्याप्रमाणे प्रेमिक निमित्तावर आपला आदर्श प्रक्षेपित करून तें निमित्त झाकून टाकतो. ईश्वर हा असा आदर्श आहे. त्यामधून मनुष्य सर्व जग पाहूं शकतो.

अशा रीतीने आपण प्रेमावरच प्रेम करायला लागतों. हें प्रेम अनिर्वचनीय आहे. शब्दांनी तें व्यक्त होऊं शकत नाही. आपण त्याच्या बाबतींत मुके बनतों.

प्रेमामधे इंद्रियांची शक्ति तीव्र होते. मानवी प्रेम हें अनेक गुणांनी शबलित झालेलें असतें हें आपण लक्षांत घेतलें पाहिजे. तें दुसऱ्याच्या वृत्तीवरहि अवलंबून असतें. प्रेमाचें हें परस्परावलंबित्व भारतीय भाषेंत पुढीलप्रमाणे व्यक्त केलें आहे. सगळयांत खालच्या पातळीवरील प्रेम हें स्वार्थी असतें. स्वतःवर प्रेम केलें जाण्याच्या आनंदावर त्याची उभारणी असते. आम्ही भारतांत असें म्हणतों की, "एकजण गाल पुढे करतो व दुसरा चुंबन घेतो." परस्पर प्रेम हें याहून उच्च असें प्रेम आहे. पण हें परस्परामुळे संपुष्टांतहि येतें. खरें प्रेम संपूर्ण अर्पणांत आहे. त्यांत एकाला दुसऱ्याच्या दर्शनाचीहि अपेक्षा नसते, किंवा कोणत्याहि प्रकारें प्रेम व्यक्त करण्याची गरजहि नसते. प्रेम अर्पण करणें हेंच पुरेसें असतें. एखाद्या मानवावर अशा प्रकारचें प्रेम करणें हें जवळजवळ अशक्य आहे,

पण ईश्वराच्या बाबतींत असें प्रेम शक्य आहे.

गल्लींत भांडतांना मुलांनी ईश्वराच्या नांवाचा उपयोग केला तर त्यांत ईश्वराची निंदा होते हा विचार भारतांत नाही. आमचें असें म्हणणें आहे की, जाणून अगर अजाणतांहि अग्नीला स्पर्श केला तर तुमचा हात पोळेलच. त्याप्रमाणे ईश्वराचें नांव कशाहि रीतीने उच्चारलें तरी त्यापासून कल्याणच होईल.

'ईश्वरनिंदा' ही कल्पना यहुद्यांपासून आली आहे. त्यांच्यावर इराणमधील लोकांच्या राजनिष्ठेचा प्रभाव पडला होता. ईश्वर हा न्यायाधीश आहे व तो शिक्षा देणारा आहे या कल्पना, कल्पना म्हणून वाईट नाहीत; पण त्या खालच्या पातळीवरच्या आहेत; गांवढळ आहेत. प्रेमाच्या त्रिकोणाचे तीन कोन पुढीलप्रमाणे आहेत: प्रेम कांही मागत नाही; प्रेमाला भय नाही; प्रेम हें नेहमी आदर्शावर केलें जातें.

"प्रेमस्वरूप ईश्वराने हें विश्व जर भरून टाकलें नसतें तर एक क्षणभरहि कोणाला जगणें शक्य होतें? एक क्षणहि कोणाला श्वास घेतां आला असतां?"

आपल्यापैकी पुष्कळांच्या हें ध्यानांत येईल की आपला जन्म हा सेवेसाठी आहे. फळ आपण ईश्वरावर सोपविलें पाहिजे. केवळ ईश्वराच्या प्रेमासाठी आपण कर्म केलें, अपयश आलें तरी दुःखाचें कारण नाही; केवळ ईश्वराच्या प्रेमाकरताच आपण कर्म केलें होतें.

स्त्रियांमधे मातृभावनेचा विकास पुष्कळ झालेला असतो. त्या ईश्वराची उपासना त्याला मूल मानून करतात. त्या त्याच्याकडून कशाचीहि अपेक्षा करीत नाहीत आणि त्याच्यासाठी त्या सर्वकांही करतात.

कॅथॉलिक संप्रदाय यांपैकी पुष्कळ उच्च गोष्टी शिकवितो. आणि

जरी तो संकुचित असला तरी त्यांत सर्वोच्च अर्थाने धार्मिकता आहे. आधुनिक समाजांतील प्रॉटेस्टंट पंथ उदारमतवादी असला तरी उथळ आहे. सत्याचें मूल्यमापन, त्याच्यापासून काय भलें होतें यावरून करणें हें, एखाद्या शास्त्रीय शोधाचें महत्त्व लहान मुलाला विचारण्याइतकेंच अयोग्य आहे.

आपण समाजाच्या पलीकडे गेलें पाहिजे. आपण नियम नष्ट करून नियमांच्या पलीकडे गेलें पाहिजे. आपण प्रकृति स्वीकारतों तें तिच्यावर विजय मिळविण्याकरिता. कोणीहि ईश्वर व संपत्ति या दोघांचीहि उपासना करूं शकत नाही हा त्यागाचा अर्थ आहे.

आपली विचारशक्ति व प्रेमशक्ति अधिक सखोल करा. स्वत:चें जीवनकमल विकसित करा; भ्रमर आपण होऊन येतील. प्रथम स्वत:वर विश्वास ठेवा, मग ईश्वरावर विश्वास ठेवा. मूठभर बलवान माणसें जगाला हलवूं शकतील. संवेदनाशील हृदय, विचारशील मेंदू आणि कर्म करण्यासाठी सामर्थ्यसंपन्न बाहु यांची आपल्याला आवश्यकता आहे. बुद्धदेव पशूंसाठी स्वत:चे प्राण अर्पण करण्यास तयार झाले. स्वत:ला कर्म करण्यास योग्य असें साधन बनवा. पण हें लक्षांत ठेवा की कार्य ईश्वर करतो, तुम्ही नाही. एका मनुष्यांत सर्व विश्व सामावलें आहे. जडद्रव्याच्या एका अणूच्या पाठीशीं विश्वाची सर्व शक्ति आहे. हृदय आणि मेंदू यांच्यांत विरोध उत्पन्न झाल्यास हृदयाचें अनुसरण करा.

कालपर्यंत स्पर्धा हा नियम होता, आज सहकार्य हा नियम आहे, उद्या कोणताच नियम राहणार नाही. शहाणे लोक तुमची प्रशंसा करोत अथवा जग तुमची निंदा करो. स्वत: लक्ष्मी तुम्हांला प्राप्त होवो, किंवा दैन्य व दारिद्रय तुमच्याकडे डोळे वटारून पाहोत. आज कंदमुळावर निर्वाह करा, तर उद्या पंचपक्वान्नांच्या

मेजवानींत सहभागी व्हा. उजवीकडे किंवा डावीकडे न पाहतां तुम्ही सरळ पुढे चला !

व्याख्यानानंतर स्वामीजींना प्रश्न विचारण्यांत आले. प्रश्नांचीं उत्तरें देतांना स्वामीजींनी प्रथम पवहारी बाबांची गोष्ट सांगितली. पवहारी बाबांनी आपलीं भांडीं गोळा केलीं आणि चोराच्या मागे धाव घेतली. त्याच्या चरणावर त्यांनी लोळण घेतली व ते त्याला म्हणाले, "हे प्रभो, तूं आला आहेस हें मला माहीत नव्हतें. हीं भांडीं घे, तीं तुझींच आहेत. मला--या तुझ्या लेकराला क्षमा कर ! "

स्वामीजींनी पुढे याच संतांची एक गोष्ट सांगितली की त्यांना एकदा सर्पाने दंश केला आणि सायंकाळीं जेव्हा ते शुद्धीवर आले तेव्हा ते म्हणाले, "प्रियकराकडून एक दूत माझ्याकडे आला होता."

# बिल्वमंगल

भारतांतील 'भक्तमाल' नामक पुस्तकांतील ही कथा आहे. जन्माने ब्राह्मण असलेला एक तरुण मनुष्य एका खेड्यांत राहत होता. हा मनुष्य दुसऱ्या एका खेड्यांतील एका वाईट चालीच्या स्त्रीच्या प्रेमांत पडला. दोन्ही खेड्यांच्या मधून एक मोठी नदी वाहत होती आणि हा मनुष्य दररोज नावेंत बसून त्या स्त्रीकडे जात असे. आता एके दिवशीं त्याला आपल्या वडिलांचें श्राद्ध करावयाचें होतें आणि त्यामुळे, त्याला तिच्याकडे जाण्याची जरी अतिशय उत्सुकता होती तरी त्याला तिच्याकडे जाणें शक्य झालें नाही. श्राद्धविधि करावयाचा होता, त्याच्याशीं संबद्ध असलेल्या सर्व गोष्टी पार पाडावयाच्या होत्या. हिंदु समाजांत हें अगदी आवश्यक असें एक कर्तव्य आहे. तो अगदी अस्वस्थ व बेचैन होऊन गेला होता. परंतु त्याचा कांहीच इलाज चालत नव्हता. अखेरीस श्राद्धविधि एकदाचा पार पडला आणि रात्र झाली. रात्र होतांच घोंघावणारें प्रचंड तुफान सुरू झालें. पाऊस धो धो पडत होता आणि नदींत प्रचंड लाटा उसळत होत्या. नदी पार करून जाणें अतिशय धोक्याचें होतें; तरीपण तो नदीच्या किनाऱ्यावर गेला. तेथे एकहि नाव नव्हती. नाव चालविणारे कोळी पलीकडे जायला भीत होते. परंतु ह्या तरुण माणसाचा तर जाण्याचा निर्धार होता. त्या स्त्रीच्या प्रेमाने तो नुसता वेडा होऊन गेला होता, म्हणून

---

स्वामी विवेकानंदांनी सांगितलेली ही गोष्ट त्यांच्या पाश्चात्त्य शिष्या कु. एस्. ई. वॅल्डो यांच्या कागदपत्रांत सापडली.

'जायचेंच' असा त्याने निश्चय केला. लाकडाचा एक ओंडका तरंगत येत होता. त्याने तो पकडला आणि त्याच्या साहाय्याने तो नदी ओलांडून पलीकडे गेला. दुसऱ्या काठाला लागतांच त्याने तो ओंडका ओढून वर काठावर टाकला आणि तो त्या स्त्रीच्या घरीं गेला. सगळीं दारें बंद होतीं. त्याने दरवाजा ठोठावला. वाऱ्याची गर्जना चालूं होती आणि त्याचा शब्द कोणालाच ऐकूं गेला नाही. म्हणून तो भिंतींच्या भोवतालून फिरला आणि शेवटीं भिंतीवरून लोंबत असलेलें दोरासारखें कांहीतरी त्याला आढळलें. त्याला वाटलें की हा दोर आहे. त्याने तो घट्ट पकडला व तो स्वत:शीं म्हणाला, "वा! माझ्या प्रेयसीने मला चढून येण्यासाठी दोर ठेवला आहे." त्या दोराच्या साहाय्याने तो भिंतीवरून चढून गेला, पलीकडच्या बाजूस पोहोचला, परंतु त्याचा पाय भलतीकडेच पडला व तो खाली आपटला. त्या आवाजाने घरांतील माणसें जागीं झालीं. ती स्त्री बाहेर आली आणि तिला हा मनुष्य बेशुद्ध झालेला आढळला. तिने त्याला शुद्धीवर आणलें. त्याच्या अंगाला कसली तरी दुर्गंधि येत असलेली पाहून तिने त्याला विचारलें, "काय झालें आहे तुम्हांला? तुमच्या साऱ्या अंगाला हा घाणेरडा वास कसला? तुम्हीं घरांत प्रवेश कसा केला?" तो म्हणाला, "प्रिये! तूंच तो दोर नव्हता का ठेवला माझ्याठी तिथे?" स्मित करून ती म्हणाली, "कोण प्रिया? आमचें सारें लक्ष पैसा मिळ-वण्याकडे असतें. तुम्हांला मूर्खासारखें असें वाटलें काय की तुम्हांला आंत येतां यावें म्हणून मीं दोर खाली सोडून ठेवला होता? तुम्हीं नदी कशी पार केलीत?" "कां? मीं एका लाकडाच्या ओंडक्याला घट्ट पकडलें." "आपण जाऊन पाहूं या" असें ती स्त्री म्हणाली. तो दोर म्हणजे एक नाग होता; नाग हा अत्यंत विषारी सर्प असून

त्याचा एवढासाहि स्पर्श मृत्यूला कारणीभूत होतो. त्याचें डोकें एका बिळांत होतें आणि त्याची शेपटी त्या माणसाने जेव्हा दोर समजून धरली होती तेव्हा तो नाग त्या बिळांत शिरत होता. प्रेमामुळे पागल झाल्यामुळेच त्याने हें सारें केलें होतें. जेव्हा सापाचें डोकें बिळांत व शरीर बाहेर असतें तेव्हा तुम्हीं त्याला जर शेपटी-कडून पकडलें तर तो आपलें डोकें बाहेर येऊं देत नाही. म्हणून तो मनुष्य त्या सापाच्या साहाय्याने वर चढला, परंतु तसें करतांना साप जोराने ओढला गेला आणि त्यामुळे तो सर्प मरण पावला. "तुम्हांला ओंडका कुठे मिळाला ?" "तो नदीच्या प्रवाहांत वाहत चालला होता." तें एक कुजलेलें प्रेत होतें आणि तें प्रवाहांत वाहत चाललें होतें. त्या मनुष्याचा 'हा एक ओंडकाच आहे' असा समज झाला होता. त्याच्या अंगाला जी असह्य दुर्गंधि येत होती तिचें हेंच कारण होतें. त्याच्याकडे पाहून ती स्त्री म्हणाली, "माझा प्रेमावर कधीच विश्वास नव्हता; आम्ही प्रेमावर कधीच विश्वास ठेवीत नाहीं. परंतु हें जर प्रेम नसेल तर मग याला काय म्हणावें ? प्रेम म्हणजे काय असतें याची आम्हांला कल्पना नाही. परंतु मित्रा ! तूं आपलें हृदय माझ्यासारख्या स्त्रीला कशाला अर्पण करतोस ? तूं तें देवाला कां देत नाहीस ? त्यामुळे तूं पूर्णत्व पावशील." हें ऐकून त्या मनुष्याच्या मेंदूवर जणु वज्राघात झाला. क्षणभर त्याला 'अतीता'चें ओझरतें दर्शन घडलें. "ईश्वर आहे काय ?" हो, हो, मित्रा ! ईश्वर आहे"--ती स्त्री म्हणाली. मग तो मनुष्य चालूं लागला; तो एका अरण्यांत गेला आणि तेथे रडून प्रार्थना करूं लागला-- "प्रभो ! मला तूं हवा आहेस. माझ्या प्रेमाच्या महा-पुराला क्षुद्र अशा मानवांत पुरेसें स्थान नाही. मला असें प्रेम करायचें आहे की त्यायोगें माझी ही प्रेमाची दुथडी भरून वाहणारी

नदी प्रेमाच्या महासागराला जाऊन मिळेल. माझ्या प्रेमाची ही वेगाने वाहणारी प्रचंड नदी छोटया डबक्यांत प्रवेश करूं शकत नाही; तिला असीम महासागर हवा आहे. तो महासागर तूं आहेस ; तूं माझ्याकडे ये." अशा प्रकारें तो अनेक वर्षें तेथे राहिला. अनेक वर्षांनंतर त्याला असें वाटलें की आपल्याला यश आलें आहे. तो संन्यासी झाला व शहरांतून संचार करूं लागला. एके दिवशीं तो एका नदीच्या घाटावर बसला होता. त्या वेळीं त्या नगरांतील एका व्यापाऱ्याची लावण्यवती तरुण पत्नी आपल्या नोकरासमवेत तेथे आली आणि पुढे निघून गेली. त्या मनुष्याचा पूर्वीचा स्वभाव पुनः उसळून वर आला. त्या स्त्रीच्या सुंदर मुखाने त्याला पुनः आकृष्ट केलें योग्याने तिच्याकडे टक लावून पाहिलें, तो उठून उभा राहिला व त्या तरुण स्त्रीच्या मागे मागे तो तिच्या घरापर्यंत गेला. त्याच क्षणीं त्या स्त्रीचा पतिहि तेथे आला आणि त्या काषायवस्त्रधारी संन्याशाला पाहून त्याला म्हणाला, "यावें महाराज, आंत यावें. आपली कोणती सेवा मी करूं शकतों ?" योगी म्हणाला, "मी तुला एक भयंकर गोष्ट करायला सांगेन." "सांगावें महाराज ! मी गृहस्थ आहें आणि कोणी जें कांही मागेल त्याला तें देऊन टाकायला मी सिद्ध आहें." संन्यासी म्हणाला, "मला तुझी पत्नी पाहावयाची आहे." त्यावर त्या स्त्रीचा पति म्हणाला, "प्रभो, हे काय आहे ! असो. मी पवित्र आहें. माझी पत्नी पवित्र आहे, आणि प्रभु सर्वांचा संरक्षक आहे. आपलें स्वागत असो. आंत यावें, महाराज !" संन्यासी आंत गेला. त्या तरुण व्यापाऱ्याने आपल्या पत्नीचा त्या संन्याशाशीं परिचय करून दिला. त्या स्त्रीने विचारलें, "महाराजांची मी काय सेवा करूं शकतें ?" संन्याशाने तिच्याकडे बराच वेळ पाहिलें व नंतर तो म्हणाला, "माते ! मला तुझ्या

केसांतील दोन आकडे देशील काय ?" "हे घ्या." त्याने ते आकडे आपल्या दोन्ही डोळ्यांत खुपसले व तो म्हणाला, "नष्ट व्हा, बदमाषांनो !" नंतर तो स्वतःला उद्देशून म्हणाला, "याउपर तुला माणणाचें रूप पाहायला मिळणार नाही. तुला जर पाहायाचेंच असेल तर आत्म्याच्या डोळ्यांनी वृंदावनाच्या कुंजांतील त्या सावळ्या गुराख्याचें रूप पाहा. तेच आता तुझे डोळे होत." असें म्हणून तो पुन: अरण्यांत गेला. तेथे तो खूप रडला. त्याच्या ठिकाणचा प्रेमाचा प्रचंड प्रवाह सत्याकडे जाण्याची धडपड करीत होता. अन्तीं त्याला यश मिळालें. त्याने आपल्या हृदयाला, आपल्या प्रेमाच्या नदीप्रवाहाला योग्य ती दिशा दिली आणि तो प्रवाह वृंदावनींच्या गोपाळकृष्णास येऊन मिळाला. गोष्ट अशी सांगतात की त्याला प्रभूचें कृष्णरूपांत दर्शन झालें. तेवढ्याच वेळेपुरतें, त्याला आपले डोळे गेल्याचें दुःख झालें; आपल्याला अंतर्दर्शनावरच समाधान मानावें लागेल याचा त्याला विषाद वाटला. त्याने कांही सुंदर भक्तिगीतें लिहिलीं. सर्व संस्कृत ग्रंथांत ग्रंथकार आरंभीं आपल्या गुरूस वंदन करतात; म्हणून त्याने त्या पहिल्या सुंदर स्त्रीला आपला प्रथम गुरु या नात्याने वंदन केलें.

# ज्ञान आणि कर्म

(२३ नोव्हेंबर १८९५ रोजीं लंडन येथे दिलेल्या व्याख्यानाचीं टिपणें)

विचारशक्तीपासून सर्वांत अधिक सामर्थ्य प्राप्त होतें. वस्तु जितकी सूक्ष्म तितकें तिचें सामर्थ्य अधिक. मूक अशा विचारशक्तीचा परिणाम दूरवरच्या लोकांवर देखील होतो, कारण मनें अनेक असूनहि तीं सर्व एकच आहेत. विश्व हें कोळयाच्या जाळयासारखें आहे, निरनिराळीं मनें हीं कोळयासारखीं आहेत.

विश्व हें त्या विश्वपुरुषाचेंच दृश्य रूप आहे. आपल्या इंद्रियांद्वारा गोचर होणारें त्यांचें रूप म्हणजे हें विश्व. हीच माया आहे. म्हणून जग हा एक भ्रम आहे; म्हणजे सत्याचें अपूर्ण दर्शन आहे, सत्याचा अर्धवट आविष्कार आहे––सकाळीं सूर्य लाल गोलक दिसावा त्याप्रमाणे. अशा रीतीने सर्व वाईटपणा व दुष्टपणा म्हणजे केवळ दुर्बलता होय, चांगुलपणाचें तें अपूर्ण दर्शन होय.

सरळ रेषा अनंतपणें वाढविली म्हणजे तिचें वर्तुळ बनतें. चांगल्याचा शोध करतांकरतां शेवटीं आपण आत्म्याकडे परत येतों. मीच सर्व गोष्टींचें रहस्य आहें, मीच ईश्वर आहें. मी शरीर आहें, मी जीवात्मा आहें आणि मीच विश्वाचा प्रभु आहें.

मनुष्याने नीतिमान् व पवित्र कां असावें ? कारण त्यामुळे त्याची इच्छाशक्ति दृढ होते. आपलें खरें स्वरूप प्रकट करून इच्छाशक्तीला जें जें दृढ करतें तें तें नैतिक आहे व याच्या विरुद्ध करणारें जें कांही आहे तें अनैतिक आहे. देशागणिक तसेंच व्यक्तीगणिक नीतीचा मापदंड बदलतो. नियमांचें दास्य, शब्दांचें

दास्य इत्यादि दास्यावस्थेंतून मनुष्याने सुटका करून घेतली पाहिजे. सध्या आपल्याला इच्छास्वातंत्र्य नाही, पण जेव्हा आपण मुक्त होऊं तेव्हा तें आपल्याला प्राप्त होईल. या अशा तऱ्हेने हें जगत् सोडणें हाच खरा त्याग होय. क्रोध, दुःख हें सर्व इंद्रियांमुळे प्राप्त होतें. जोंपर्यंत त्याग अंगीं बाणत नाही तोंपर्यंत आत्मा आणि त्याचे विकार हे भिन्न असले तरी ते एकरूप होतात आणि मग मनुष्य हा तात्काळ पशु बनतो. त्याग अंगीं बाणवा.

'मला एक शरीर होतें, मी जन्माला आलों, मीं धडपड केली आणि मी मरण पावलों'--किती भयंकर हा भ्रम ! 'मी शरीरांत कोंडला गेलों होतों आणि मुक्तीसाठी तडफडत होतों !'--हा विचार किती भ्रामक आहे !

त्याग करावा याचा अर्थ आपण सर्वांनी बैरागी बनावें असा आहे काय ? मग कोण दुसऱ्याला मदत करील ? त्याग म्हणजे केवळ देहदंड नव्हे. सर्व भिकारी येशू ख्रिस्त आहेत काय ? दारिद्र्य आणि पावित्र्य हे समानार्थी शब्द नव्हेत. कित्येक वेळां आपल्याला उलट अनुभव येतो. त्याग हा मानसिक आहे. हा कसा साध्य होतो ? मी तहानेला असतांना एका वाळवंटांत मला एक सरोवर दिसलें. त्याच्या भोवतालचा प्रदेश निसर्गसुंदर होता. त्याच्या काठीं, भोवतालीं वृक्ष होते, आणि त्यांचीं उलटीं प्रतिबिंबें पाण्यांत पडलेलीं दिसत होतीं. पण तें सर्व मृगजळ असल्याचें सिद्ध झालें, तेव्हा मला हें कळून आलें की सुमारें एक महिना दररोज मी हें दृश्य पाहत होतों, पण आजच, मी तहानेला असल्यामुळे माझ्या लक्षांत आलें की तें मिथ्या होतें. पुढेहि महिनाभर मला तें दृश्य दिसलें. पण तें सत्य आहे असें मीं मानलें नाही. याचप्रमाणे जेव्हा आपण ईश्वराप्रत पोहोचूं तेव्हा विश्व,

शरीर इत्यादि कल्पना नाहीशा होतील. पुन: जरी त्या कल्पना परत आल्या तरी त्या सत्य नाहीत हें आपल्याला कळेल.

जगाचा इतिहास हा बुद्ध व येशू ख्रिस्त यांच्यासारख्या व्यक्तींचा इतिहास आहे. विकाररहित व आसक्तिरहित लोकच जगाचें पुष्कळ भलें करतात. येशू ख्रिस्त एखाद्या घाणेरड्या वस्तींत उभे आहेत अशी कल्पना करा. ते त्या दु:खाच्या पलीकडे पाहूं शकतात. ते म्हणतात, 'बांधव हो ! तुम्ही सर्व दैवी स्वरूपाचे आहांत.' त्यांचें कार्य शांतपणाने चाललेलें असतें. ते दु:खाचीं कारणेंच दूर करतात. आपण करीत आहोंत तें कार्य म्हणजे एक आभास आहे याचा जेव्हा तुम्हांला प्रत्यक्ष साक्षात्कार होईल तेव्हाच तुम्ही जगाच्या कल्याणासाठी कांही करूं शकाल. तुमच्या कार्यांत कर्तेपणाची जाणीव जितकी कमी असेल तितकें तुमचें कार्य अधिक चांगलें होईल, कारण तितकेंच तें जाणिवेपलीकडील भूमिकेवरून केलें जाईल. आपला शोध हा चांगलें किंवा वाईट यांचा शोध नाही; पण सुख किंवा चांगलें हें दु:ख किंवा वाईट यांच्यापेक्षा सत्याच्या अधिक जवळचें आहे. एका माणसाच्या बोटांत एक कांटा शिरला. त्याने दुसऱ्या कांट्याने तो काढला. पहिला कांटा हा वाइटाचा कांटा होता. दुसरा कांटा हा चांगल्याचा कांटा आहे. चांगल्यावाइटाच्या पलीकडे असणारी शांति हें आत्म्याचें स्वरूप आहे. विश्वाभास नाहीसा होत चालला की मनुष्य ईश्वराच्या जवळ जायला लागतो. एका क्षणीं तो परमात्माच होता. पुन्हा त्याच्याहून जेव्हा तो भिन्न होतो तेव्हा तो प्रेषित होतो. आता तो जगाला हलविणारा होतो. मूर्ख मनुष्य झोपी जातो. उठल्यावरहि तो मूर्खच्च राहतो. पण जेव्हा माणसाची जाणीव लोपून तो जाणिवेपलीकडील अवस्थेंत——समा-

धींत--जातो तेव्हा तो अनंत शक्ति, पावित्र्य व प्रेम बरोबर घेऊन परत येतो, तेव्हा तो देवमानव बनतो. समाधि अवस्थेचा हा लाभ आहे.

ज्ञानाची साधना युद्धभूमीवरहि होऊं शकते. अशाच परिस्थितींत गीता उपदेशिण्यांत आली. मनाच्या तीन अवस्था आहेत--क्रियाशील, क्रियारहित व शांत. क्रियारहित अवस्थेंत मंद स्पंदन, क्रियाशील अवस्थेंत द्रुत स्पंदन व शांत अवस्थेंत अत्यंत तीव्र स्पंदन होत असतें. आत्मा हा रथांत बसलेला रथी आहे हें जाणा. शरीर हा रथ आहे. बाह्य इंद्रियें हीं घोडे व मन हें लगाम असून बुद्धि ही सारथी आहे. अशारीतीने मनुष्य मायेचा समुद्र ओलांडतो. तो पलीकडे जातो. तो ईश्वराप्रत पोहोचतो. मनुष्य जेव्हा इंद्रियांच्या अधीन असतो तेव्हा तो या जगाचा असतो. जेव्हा तो इंद्रियांवर ताबा मिळवितो तेव्हा तो त्यागी झाला असें म्हणावें.

दुर्बलांची व निष्क्रियांची क्षमा ही खरी क्षमा नव्हे. तिच्यापेक्षा युद्ध चांगलें. देवांच्या सेनेवरहि विजय मिळविण्याचें सामर्थ्य असेल तर क्षमा करा. "शत्रूंना आपण क्षमा करूं" असें अर्जुनाने म्हटलेलें ऐकलें तेव्हा त्याचा सारथी श्रीकृष्ण त्याला म्हणाला, "तूं ज्ञानी माणसाची भाषा बोलतोस, पण तूं स्वतः ज्ञानी नाहीस तूं भ्याड आहेस." कमलपत्र पाण्यांत राहून त्यापासून अलिप्त राहतें, त्याप्रमाणे माणसाने या जगांत राहिलें पाहिजे. ही रणभूमि आहे. युद्धानेच आपला मार्ग मोकळा करून घ्या. या जगांतलें जीवन म्हणजे ईश्वरदर्शन करून घेण्याचा एक प्रयत्न आहे. तुमच्या जीवनांत त्यागाने दृढ झालेली इच्छाशक्ति प्रकट होऊं द्या.

मेंदूतील सर्व केंद्रांवर नियंत्रण ठेवण्यास आपण शिकलें पाहिजे. जीवनांतील आनंद ही पहिली पायरी आहे. देहदंडात्मक तप हें

अत्यंत वाईट आहे. प्रार्थनेपेक्षा हास्य हें अधिक चांगलें आहे. गाणीं गा. दु:खांतून बाहेर या. कृपा करून आपल्या दु:खानें इतरांना दु:खी करूं नका. ईश्वर सुखदु:ख विकतो असें समजूं नका. आपल्या भोवती फुलें, सुगंधी द्रव्यें, सुंदर चित्रें असूं द्या. साधुसंत निसर्गातील आनंद लुटण्यासाठी पर्वतशिखरावर जात असत.

दुसरी पायरी पावित्र्य ही आहे.

मनाचें संपूर्ण नियमन करणें व त्याला वळण लावणें ही तिसरी पायरी आहे. सत्य आणि असत्य यांचा विवेक करा. ईश्वरच केवळ सत्य आहे याचा प्रत्यय घ्या. मी ईश्वर नाहीं असा क्षणभर जरी विचार मनांत आणलांत तरी मोठें भय उत्पन्न होईल. 'मी ईश्वर आहें' असा विचार करतांक्षणीं महान् शांति व महान् आनंद तुम्हांला प्राप्त होतील. इंद्रियांचें नियमन करा. कोणी मला शाप जरी देईल तरी मला त्याच्यांत ईश्वर पाहतां आला पाहिजे. माझ्यांतील दुर्बलतेमुळे मी ईश्वरालाच शाप देणारा समजत आहें. गरीब माणसाचें जेव्हा तुम्ही हित करतां तेव्हा वस्तुत: तो तुम्हांला विशेष संधि देत असतो, तें तुमचें सद्‌भाग्य असतें. ईश्वराच्या कृपेमुळे ईश्वराला अशा रीतीने भजण्याची तुम्हांला संधि प्राप्त होत असते.

जगाचा इतिहास हा स्वत:वर श्रद्धा असलेल्या कांही थोड्या माणसांनी घडविलेला आहे. अशी श्रद्धाच आंतील देवत्वाला बाहेर प्रकट करते. मग तुम्ही सर्वकांही करूं शकतां. तुमच्यामधील अनंत शक्तीला प्रकट करण्याचा पुरेसा प्रयत्न तुमच्याकडून झाला नाही तरच तुम्हांला अपयश येतें. कोणतीहि व्यक्ति किंवा राष्ट्र जेव्हा श्रद्धाहीन बनते तेव्हा मृत्यु ओढवतो.

आपल्या आंत देवत्व आहे, तें संप्रदायांच्या कट्टर मतांनी किंवा

फसवेगिरी करून दडपून टाकतां येणार नाही. जिथे कुठे सभ्यता आहे तिथे मूठभर ग्रीकांचे शब्द ऐकायला येतात. कांही चुका तर केव्हाहि होणारच. दु:ख करूं नका. सखोल व सूक्ष्म दृष्टि असू द्या. 'जें केलें तें केलें, त्याहून अधिक चांगलें केलें असतें तर बरें झालें असतें' असा विचार करूं नका. मनुष्य हा जर देव नसता तर आतापर्यंत मानवजात आपल्या प्रार्थना व पश्चात्ताप यांमुळे वेडी बनली असती.

कोणी मागे राहणार नाही, कोणी नाश पावणार नाही. अंतीं सर्वच पूर्ण होतील. रात्रंदिवस म्हणत राहा, "बंधूंनो, वर या ! तुम्ही पावित्र्याचे अनंत सागर आहांत. ईश्वर बना. आपलें ईश्वरत्व प्रकट करा."

सभ्यता म्हणजे काय ? अंत:स्थ ईश्वरत्वाची जाणीव म्हणजेच सभ्यता. जेव्हा तुम्हांला वेळ मिळेल तेव्हा या विचारांचें वारंवार चिंतन करा आणि मुक्तीची इच्छा करा. इतकेंच काय तें. जें ईश्वर नाही तें निषिद्ध माना. जें ईश्वर असेल त्याचें सतत ध्यान करा. रात्रंदिवस मनाने त्याचें ध्यान करीत राहा. त्यामुळे अज्ञानाचा पडदा पातळ होत जाईल.

मी मनुष्य नाहीं, देव-देवता नाहीं. स्त्री-पुरुष हा भेद मला लागू नाही. मला मर्यादा नाही. मी ज्ञानस्वरूप आहें. मी ब्रह्म आहें. मला ना द्वेष ना क्रोध. मला ना सुख ना दु:ख. माझा कधी जन्म झाला नाही आणि माझा कधी मृत्युहि होणार नाही, कारण मी ज्ञानस्वरूप आहें, आनंदस्वरूप आहें, सोऽहं--मी आत्मा आहें.

देहबुद्धि सोडा. तुम्हांला शरीरोपाधि कधी नव्हतीच. तो केवळ भ्रम होता. सर्व रंजल्या-गांजलेल्यांना, सर्व गरिबांना, सर्व दलितांना त्यांच्या दिव्यत्वाची जाणीव करून द्या.

दर पांचशे वर्षांनी अशा विचारांची एक लाट जगावर येते असें दिसतें. निरनिराळ्या दिशांनी लहान लहान पुष्कळ लाटा निर्माण होतात; पण त्यांपैकी एक लाट इतर सर्वांना गिळून सर्व समाजाला व्यापून टाकते. ज्या लाटेच्या पाठीशीं महान् चारित्र्य असतें ती लाट हें काम करते.

कन्फ्यूशस, मोझेस व पायथागोरस; बुद्ध, ख्रिस्त, महंमद, लूथर, कॅलव्हिन आणि शीख; थिऑसाफी, अध्यात्मवाद इत्यादि --या सर्वांचा अर्थ एकच--मानवांतील देवत्वाची शिकवण.

मनुष्य दुबळा आहे असें कधी म्हणूं नका. ज्ञानयोग इतरांहून विशेष चांगला आहे असें नाही. प्रेम हेंच साध्य आहे, त्याला वेगळ्या विषयाची अपेक्षा नाही. प्रेम हें ईश्वर आहे. म्हणून भक्तिमार्गानेहि आत्मस्वरूप ईश्वराप्रत पोहोचतां येतें. मीच तो ईश्वर आहें. नगर, देश, विश्व किंवा प्राणिमात्र यांच्यावर प्रेम केल्याशिवाय मनुष्य कर्म कसें करूं शकेल ? तर्कबुद्धि विविधतेंतील एकतेकडे घेऊन जाते. नास्तिक व अज्ञेयवादी यांना 'सामाजिक हिता'साठी कर्म करूं द्या. अशा रीतीने ईश्वरप्राप्ति होईल.

पण एका गोष्टीची तुम्हीं काळजी घेतली पाहिजे; कोणाच्याहि श्रद्धेला धक्का लावूं नका; कारण, तुम्हीं हें जाणलें पाहिजे की धर्म हा केवळ मतांत नाही. ब्रह्म होणें, ब्रह्मसाक्षात्कार करून घेणें यांतच धर्म आहे. सर्व माणसें जन्मतःच मूर्तिपूजक आहेत. सर्वांत खालचा मनुष्य पशुसदृश आहे; सर्वांत उच्च मनुष्य हा पूर्णस्वरूप आहे. या दोहोंच्या मध्ये असणाऱ्या सर्वांना ध्वनि, वर्ण, मतें, विधि-अनुष्ठानें यांच्या साहाय्याने विचार करणें भाग आहे.

तुम्ही मूर्तिपूजक नाही असें केव्हा ठरेल ? 'मी' असें जेव्हा

तुम्ही म्हणतां तेव्हा तुमच्या मनासमोर शरीर येतें की नाही ? येत असेल तर तुम्ही अद्याप मूर्तिपूजक आहां. धर्म म्हणजे बौद्धिक बडबड नव्हे, तर धर्म म्हणजे आत्मसाक्षात्कार होय. तुम्ही जर ईश्वराचा केवळ विचारच करीत असाल तर तुम्ही मूर्ख आहांत. अज्ञ मनुष्य प्रार्थना व भक्ति यांच्या साहाय्याने तत्त्वज्ञाच्याहि पुढे जाऊं शकतो. ईश्वराला जाणण्यासाठी कोणत्याहि तत्त्वज्ञानाची जरूरी नाही. इतरांची श्रद्धा विचलित करणें हें आपलें कर्तव्य नव्हे. धर्म म्हणजे प्रत्यक्षानुभूति होय. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की सर्व बाबतींत प्रामाणिक राहा. बाह्य विषयांशीं तादात्म्य पावल्यामुळे दु:ख उत्पन्न होतें, कारण त्यामुळे वासना निर्माण होते. गरीब मनुष्य सोनें पाहतो आणि सोन्याच्या गरजेशीं तादात्म्य पावतो. साक्षी व्हा. प्रतिक्रियारहित होण्यास शिका.

---

# आधुनिक जगाकडून वेदान्ताच्या अपेक्षा

(रविवार, २५ फेब्रुवारी १९०० रोजीं ओकलंड येथे दिलेल्या व्याख्यानाचा 'ओकलंड इन्क्वायरर'मधे संपादकीय टीपांसहित प्रसिद्ध झालेला अहवाल)

पूर्वेकडील एक नामांकित विद्वान् स्वामी विवेकानंद हे 'युनिटेरियन चर्च' येथे होणाऱ्या सर्वधर्मपरिषदेंत वेदान्त तत्त्वज्ञान विशद करून सांगणार आहेत असें जाहीर झाल्यामुळे काल सायंकाळीं त्या ठिकाणीं लोकांची प्रचंड गर्दी जमली. मुख्य सभागृह व लगतच्या खोल्या श्रोत्यांनी भरून गेल्यामुळे दुसरें जोडून असलेलें एक सभागृह खुलें करण्यांत आलें. तेंहि पूर्ण भरलें व सुमारें पांचशे व्यक्ति कुठेच उभें राहायलाहि जागा न मिळाल्यामुळे परत गेल्या असा अंदाज आहे.

स्वामींनी चांगला प्रभाव पाडला. भाषण चालूं असतां वारंवार टाळ्या पडत होत्या आणि भाषण संपलें तेव्हा तर त्यांच्याभोवती चाहत्यांचा एक दरबारच भरला. 'आधुनिक जगाकडून वेदान्ताच्या अपेक्षा' या विषयावरील त्यांच्या व्याख्यानाचा कांही अंश पुढे देण्यांत येत आहे––

आधुनिक जगाने वेदान्ताचा विचार करावा अशी वेदान्ताची अपेक्षा आहे. अधिकांश मानवजातीवर वेदान्ताचा प्रभाव आहे. भारतांतील वेदान्ताच्या अनुयायांवर लाखो लोकांनी धाड घातली व आपल्या प्रचंड सामर्थ्याने त्यांना चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला, परंतु तरीहि वेदान्तधर्म जिवंत आहे.

जगांतील कोणत्यातरी देशांत असें तत्त्वज्ञान पाहायला सापडतें काय? इतर पंथ उदयाला आले ते वेदान्ताच्या छायेंत येण्यासाठीच. मोसमी वनस्पतीप्रमाणे हे सर्व पंथ आज जिवंत असून त्यांची वाढ होत आहे, तर उद्या ते नष्ट होत आहेत. 'जो जिवंत राहण्यास सर्वांत योग्य असेल तोच टिकेल' हें सत्य यावरून दिसून येत नाही काय?

वेदान्त हें असें तत्त्वज्ञान आहे की ज्याची वाढ अद्याप खुंटली नाही. हजारो वर्षांपासून त्याचा विकास होत आहे व अद्याप तो चालूंच आहे. असें असल्यामुळे या एका तासाच्या अल्प अवधींत त्याची थोडीशी कल्पनाच मी आपणांस देऊं शकेन.

मी प्रथम वेदान्ताच्या उदयाचा इतिहास सांगतों. वेदान्ताचा उदय झाला तेव्हा भारतांत पूर्वीच एका धर्माचा पूर्ण विकास झाला होता. पूर्ण होण्याची त्याची प्रक्रिया पुष्कळ वर्षें चालली होती. विस्तृत स्वरूपाचीं विधि-अनुष्ठानें आधीच तयार झालीं होतीं. जीवनाच्या भिन्न भिन्न अवस्थांसाठी नैतिक आचारपद्धति विकसित झाली होती. कोणत्याहि धर्मांत कालान्तराने उत्पन्न होतात तशा या धर्मांत उत्पन्न झालेल्या यांत्रिक क्रियांविरुद्ध व सोंगाढोंगाविरुद्ध बंड पुकारलें गेलें, आणि थोर पुरुष पुढे येऊन त्यांनी वेदांच्या द्वारें खऱ्या धर्माची घोषणा केली. वेदांमधे ग्रथित झालेल्या दिव्य अनुभवांवरच हिंदूंचा धर्म उभारलेला आहे. वेद हे अनादि व अनंत आहेत असें त्यांना सांगण्यांत आलें. कोणतेंहि पुस्तक अनादि व अनंत असूं शकतें हें म्हणणें श्रोत्यांना हास्यास्पद वाटेल. परंतु वेद म्हणजे कोणतेहि ग्रंथ नव्हेत. विभिन्न काळीं विभिन्न व्यक्तींनी शोधून काढलेल्या आध्यात्मिक सिद्धान्तांचें भांडार म्हणजेच वेद होत.

हे वेदान्ती आले त्यापूर्वी लोकांत 'ईश्वर जगाचा नियंता आहे व मनुष्य हा अमर आहे' इत्यादि कल्पना रूढ होत्या. पण याच्यापुढे ते लोक गेले नव्हते. आणखी कांही जाणतां येऊं शकत नाही अशी यांची समजूत होती. अशा अवस्थेंत वेदान्ताचे उद्गाते धाडसाने पुढे आले. अज्ञांसाठी असलेला धर्म विचारी मनुष्यांचें समाधान करूं शकत नाही हें त्यांना माहीत होतें. मनुष्य व ईश्वर यांच्यासंबंधी आणखी कांही जाणावयाचें आहे हें त्यांनी ओळखलें.

नैतिक अज्ञेयवादी केवळ बाह्य जड प्रकृतिच जाणतो. त्यावरूनच तो विश्वाविषयी सिद्धान्त बांधतो. एखाद्याचें नाक कापावें व त्याच्यावरून मनुष्याच्या संपूर्ण शरीराची कल्पना मला आली असें म्हणावें यासारखेंच हें आहे.

मनुष्याने आंत पाहिलें पाहिजे. आकाशांत पसरलेल्या तारका, फार काय हें विश्व देखील घागरींतील एका थेंबासारखें आहे. तुमचा हा अज्ञेयवादी जें सर्वांहून महान् आहे तें तर पाहतच नाही आणि या विश्वाकडे पाहूनच तो भयभीत होतो.

आध्यात्मिक विश्व हें सर्वांहून विशाल आहे. विश्वाचा चालक, नियंता हा आपला पिता, आपली माता आहे. ज्याला आपण जग म्हणतों तो कसला अधर्मी खेळ आहे! येथे सर्वत्र दुःख आहे. मूल जन्माला येतें तें ओठावर रडें घेऊनच. त्याच्या तोंडांतून प्रथम रडणेंच बाहेर पडतें. हें मूल माणूस बनतें तेव्हा या दुःखाची त्याला इतकी सवय होते की हृदयांतील शल्य तो ओठावरील स्मिताआड लपवितो.

या संसारांतून सुटकेचा मार्ग कुठे आहे? जे बाहेर पाहतात त्यांना तो दिसणार नाही. सत्य शोधण्यासाठी त्यांनी आपली दृष्टि अंतर्मुख केली पाहिजे. धर्माचा वास अंतरांत आहे.

एक मनुष्य उपदेशितो की तुम्ही आपलें डोकें धडावेगळें करा, तुम्हांला मुक्ति मिळेल. पण त्याला कोणीतरी अनुयायी मिळेल काय? तुमचे येशू ख्रिस्त म्हणतात, "सर्वकांही गरिबांना द्या आणि माझें अनुसरण करा." तुमच्यापैकी कितीजणांनी हें केलें आहे? येशू ख्रिस्त हे तुमचे फार मोठे धर्माचार्य होते तरी तुम्ही त्यांच्या या आदेशाप्रमाणे वागलां नाही. तुमच्यापैकी प्रत्येकजण आपापल्या जीवनांत व्यवहारी आहे, आणि हें तुम्हांला अव्यवहार्य वाटतें.

पण वेदान्त तुम्हांला अव्यवहार्य असें कांहीहि सांगत नाही. प्रत्येक शास्त्राचा अभ्यास करण्याची निश्चित अशी सामग्री असते. या अभ्यासासाठी विशिष्ट परिस्थितीची व बऱ्याचशा शिक्षण-वळणाची आवश्यकता असते. परंतु धर्मविषयी मात्र कोणीहि सोम्यागोम्या सर्वकांही सांगूं शकतो! तुम्हांला धर्माचें अनुसरण करण्याची इच्छा असेल तर धर्मज्ञांचें अनुसरण करा. पण तुम्ही बहुधा एखाद्या सोम्यागोम्याशींच याबाबत बोलतां, कारण त्याला त्याविषयी बोलतां येतें.

इतर कोणत्याहि शास्त्राप्रमाणेच धर्माच्याहि बाबतींत तुम्हीं वागलें पाहिजे. प्रत्यक्ष घटनांचा अभ्यास करा आणि त्या आधारा-वर सुंदरशी इमारत उभी करा.

खरा धर्म प्राप्त करून घेण्यासाठी साधनांची आवश्यकता आहे. तुमचा कशावर विश्वास आहे हा प्रश्न नाही, नुसता विश्वास ठेवून भागणार नाही, कारण तुम्ही कशावरहि विश्वास ठेवूं शकता!

आपल्याला हें माहीत आहे की, विज्ञानानुसार, एखाद्या पदा-र्थाची गति वाढविली की वस्तुमान कमी होतें व वस्तुमान वाढलें

की गति कमी होते. म्हणजे जडद्रव्य व शक्ति या दोन गोष्टी झाल्या. जडद्रव्य शक्तींत लीन होतें व शक्ति जडद्रव्यांत लय पावते; हें कसें घडतें हें आपल्याला कळत नाही. म्हणून जें जड-द्रव्यहि नाही व शक्तिहि नाही असें कांहीतरी असलें पाहिजे; एरवी जडद्रव्य व शक्ति हीं एकमेकांत लीन होणार नाहीत. या वस्तूलाच आम्ही ‘मन’––‘वैश्विक मन’ म्हणतों.

माझें शरीर व तुमचें शरीर भिन्न आहे असें तुम्ही म्हणतां. मी या मानवजातरूपी सागरांतील एक लहानसा भोवरा आहें. भोवरा तर खराच, पण त्या विशाल सागराचा मी एक अंश आहें.

वाहत्या पाण्याजवळ तुम्ही उभे राहतां. त्यांतील प्रत्येक जल-कण बदलत असतो, पण तरीहि तुम्ही त्याला एक नदी म्हणतां. पाणी बदलत असतें हें खरें, पण नदीचे काठ तेच राहतात. मन बदलत नाही. पण शरीर? त्याचा विकास किती जलद होतो! मी शिशु होतों, मग बालक, मग कुमार व आता मनुष्य झालों आहें. लवकरच मी म्हातारा मनुष्य होईन––वयस्क व वाकलेला! शरीर बदलत असतें. तुम्ही म्हणाल, मनहि बदलत नाही काय? मी जेव्हा लहान होतों तेव्हाहि मी विचार करीत असे. आता मी प्रौढ झालों आहें, कारण माझें मन म्हणजे संस्का-रांचा समुद्र बनलें आहे.

प्रकृतीच्या पाठीमागे वैश्विक मन आहे. आत्मा हा एकमेवा-द्वितीय आहे. तो जडद्रव्य नाही. मनुष्य म्हणजे आत्मा आहे. मृत्यूनंतर आत्मा कुठे जातो? पृथ्वी खाली कां पडत नाही या प्रश्नाचें एका मुलाने जसें उत्तर दिलें तसेंच वरील प्रश्नाचें उत्तर दिलें पाहिजे. हे दोन्ही प्रश्न सारखे आहेत, म्हणून त्यांचीं उत्तरेंहि सारखीं आहेत. आत्मा जाईल कोठे?

अमरत्वाविषयी बडबड करणाऱ्या तुम्हांला मी सांगूं इच्छितों की तुम्ही जेव्हा घरीं जाल तेव्हा आपण मेलों आहोंत अशी कल्पना करण्याचा प्रयत्न करा. बाजूला उभे राहून आपल्या मृत-देहाला स्पर्श करा. तुम्ही हें करूं शकणार नाही, कारण तुम्ही स्वत:मधून बाहेर येऊं शकणार नाही. तुमचा प्रश्न अमरत्वाचा नाही. मृत्यूनंतर जॅक हा जेनीला भेटूं शकेल की नाही हा तुमचा प्रश्न आहे.

धर्मांतील एकमेव मोठें रहस्य म्हणजे 'आपण आत्मा आहोंत' हें तुम्हीं जाणलें पाहिजे. 'मी एक क्षुद्र कीटक आहें, मी कोणीच नव्हे' असें म्हणून रडूं नका! एक कवि म्हणतो त्याप्रमाणे, "मी सत्-चित्-आनंद-स्वरूप आहें" असें म्हणा. 'मी वाईट गोष्टींपैकी एक आहे' असें म्हटल्याने कोणीहि जगांत कांहीहि चांगलें करूं शकणार नाही. तुम्ही जसजसें पूर्ण होत जाल तसतशी तुम्हांला अपूर्णता कमी कमी दिसेल.

# जन्ममृत्यूचे नियम

(७ मार्च १९०० रोजीं ओकलंड येथे दिलेल्या व्याख्यानाचा 'ओकलंड ट्रिब्युन'मधे संपादकीय टीपांसहित प्रसिद्ध झालेला अहवाल )

'जन्ममृत्यूचे नियम' या विषयावर स्वामी विवेकानंद यांचें काल सायंकाळीं व्याख्यान झालें. स्वामी म्हणाले, "जन्ममृत्यूच्या फेऱ्यांतून सुटका कशी करून घ्यावी हा हिंदूंच्या शोधाचा विषय आहे. स्वर्गांत कसें जातां येईल हा त्यांच्या शोधाचा विषय नसून स्वर्गांत जाणें कसें थांबवितां येईल याचाच ते शोध घेत असतात."

स्वामी पुढे म्हणाले, "या विश्वांत कोणतीहि गोष्ट स्वतंत्र व वेगळी अशी नाही. प्रत्येक गोष्ट ही कार्यकारणाच्या अनंत श्रृंखलेंतील एक दुवा आहे. मानवापेक्षा वरच्या कोटींतील जीव असतील तर त्यांनाहि नियमांचें बंधन आहे. जीवापासूनच जीवाची उत्पत्ति संभवते, विचारापासूनच विचाराची व जडद्रव्यापासूनच जडद्रव्याची उत्पत्ति संभवते. जडद्रव्यापासून विश्वाची उत्पत्ति शक्य नाही. विश्व हें अनादि आहे. प्रकृतीपासून मानव जर नवीनच उत्पन्न होऊन या जगांत आले असते तर ते संस्काररहित राहिले असते. पण आपण तसे या जगांत येत नाहीं. यावरून हें दिसतें की आपण नवीन उत्पन्न होत नाहीं. मानवांची उत्पत्ति जर शून्यांतून झाली असली तर शून्यांत विलीन होण्याला त्यांना कोणता प्रत्यवाय आहे? आपण भविष्यकाळीं सर्वदा जर राहणार असूं तर भूतकाळांतहि आपण सर्वकाळ राहिलेले असूंच.

"आत्मा म्हणजे शरीर नव्हे किंवा मन नव्हे असें हिंदु लोक

मानतात. जें स्थिर राहतें व 'मी, मी आहें' असें म्हणूं शकतें
काय आहे ? तें शरीर नव्हे, कारण शरीर सतत बदलत असतें. तें मनहि नव्हे, कारण मन तर शरीराहूनहि लवकर बदलतें; कांही क्षण देखील तेच विचार मनांत स्थिर राहत नाहीत. जें बदलत नाही असें कांहीतरी असलें पाहिजे. नदीचे तीर बदलत नाहीत आणि त्यांच्या अचलपणामुळेच सतत गतिमग्न असलेल्या प्रवाहाची आपल्याला जाणीव होते. या तीरांप्रमाणेच माणसांत अचल असें कांहीतरी असलें पाहिजे. शरीराच्या व मनाच्याहि मागे अशी एखादी वस्तु असली पाहिजे की जिच्यामुळे मानवाच्या आंत एकत्व निर्माण होतें. ही वस्तु म्हणजेच आत्मा होय. आत्मा हा स्वामी असून मन हें त्याचें सूक्ष्म साधन आहे. मनाच्या द्वारें आत्माच शरीरावर कार्य करतो. आम्ही भारतीय असें म्हणतों की अमक्याने शरीराचा त्याग केला; तुम्ही म्हणतां की त्याने आत्म्याचा त्याग केला. हिंदूंच्या कल्पनेनुसार मनुष्य म्हणजे आत्मा असून तो शरीर धारण करतो, तर पाश्चात्त्यांच्या कल्पनेप्रमाणे मनुष्य म्हणजे शरीर असून त्याला आत्मा असतो.

"जें जें मिश्र स्वरूपाचें असतें तें तें मृत्युमुखांत पडतें. आत्मा हा एकजिनसी व अमिश्र स्वरूपाचा आहे. तो इतर कशानेहि बनलेला नाही. म्हणून त्याला मरण नाही. आत्मा हा स्वभावतःच अमर आहे. शरीर, मन आणि जीवात्मा हीं सर्वच नियमांच्या चक्रावर फिरतात--त्यांतून कुणाची सुटका नाही. ज्याप्रमाणे सूर्याला व ताऱ्यांना नियमांचें उल्लंघन करणें अशक्य आहे त्याचप्रमाणे तें आपल्यालाहि अशक्य आहे. हें सर्व विश्व नियमाधीन आहे. कर्माचा सिद्धान्त असा आहे की प्रत्येक कर्माचें फळ लवकर किंवा उशीरा मिळतेंच. पांच हजार वर्षांनंतर इजिप्तमधील एका 'ममी'च्या

(मसाला भरून सुरक्षित ठेवलेल्या प्रेताच्या) हातांतून घेतलेलें बीं पेरल्यावर अंकुरलें; मानवाचें कर्म फल निर्माण केल्याशिवाय कधीहि राहत नाही याचें, तें बीं म्हणजे प्रतीक होय. कर्म हें कर्माला जन्म दिल्याशिवाय नष्ट होत नाही. आपल्या कर्माचीं अनुरूप अशीं फळें जर ह्याच लोकांत प्राप्त होतात तर तीं भोगण्यासाठी ह्याच लोकांत पुनः येणें हें आपल्याला क्रमप्राप्तच आहे. हाच पुनर्जन्माचा सिद्धान्त आहे. आपण नियमांचे दास आहोंत. आपण कर्मांचे, तृष्णेचे, वासनांचे, इतर हजारो गोष्टींचे दास आहोंत. जन्ममृत्यूंतून सुटका झाली तरच दास्यांतून सुटून आपण मुक्त होऊं. एकमेव ईश्वरच मुक्त आहे. ईश्वर आणि मुक्ति हीं एकच होत."

---

# सत्य आणि आभास

( ८ मार्च १९०० रोजीं ओकलंड येथे दिलेल्या व्याख्यानाचा ‘ओकलंड ट्रिब्युन’मधे संपादकीय टीपांसहित प्रसिद्ध झालेला अहवाल )

हिंदु तत्त्वज्ञ स्वामी विवेकानंद यांनी काल सायंकाळीं ‘वेन्दते हॉल’मधे आणखी एक व्याख्यान दिलें. व्याख्यानाचा विषय होता, ‘सत्य व अभास.’ ते म्हणाले:—

“जें शाश्वत आहे तें प्राप्त करून घेण्यासाठी, जें कधी बदलत नाही तें शोधण्यासाठी मनुष्याची सतत धडपड चाललेली असते. त्याचें कधीच समाधान होत नाही. संपत्ति, आकांक्षापूर्ति किंवा क्षुधाशांति——सर्वकांही क्षणिक आहे, परिवर्तनशील आहे. या गोष्टी प्राप्त झाल्याने मनुष्याला समाधान प्राप्त होत नाही. धर्म हें असें शास्त्र आहे की जें आपल्याला अपरिवर्तनीय तत्त्वाच्या प्राप्तीची तृष्णा कशी शमवावी हें शिकवितें. भिन्न भिन्न परिस्थितींत उत्पन्न झालेले व भिन्न भिन्न प्रादेशिक रंग चढलेले धर्म एकच गोष्ट शिकवितात आणि ती ही की मनुष्याचा आत्मा हाच फक्त सत्य आहे.

“वेदान्तदर्शन सांगतें की दोन विश्वें आहेत——बाह्य किंवा इंद्रियगम्य विश्व आणि अंतर्विश्व किंवा विचारांचें विश्व.

“वेदान्ताने तीन मूलभूत कल्पना पुढे मांडल्या आहेत——काल, अवकाश व कार्यकारणभाव. यांच्यापासूनच माया बनलेली आहे. माया ही मनुष्याच्या विचारांची आधारभूमि आहे, विचारांचें कार्य नव्हे. पुढे कालान्तराने जर्मन तत्त्वज्ञ कांट हाहि याच

निष्कर्षाप्रत पोहोचला.

"माझी सत्ता, जगताची सत्ता व ईश्वराची सत्ता एकच होत. आविष्काराच्या प्रकारांतच भेद आहे; हा भेद मायेमुळे उत्पन्न होतो. किनाऱ्याच्या रूपरेषा समुद्राला उपसागर, सामुद्रधुनी किंवा खाडी यांचें रूप प्राप्त करून देतात, पण रूप देणारी ही शक्ति किंवा माया जर दूर सारली तर निरनिराळे आकार नाहीसे होतात, भेद मावळतात आणि सर्वकांही पुन्हा समुद्रच होऊन जातें."

यानंतर स्वामींनी वेदान्तांत क्रमविकासाच्या सिद्धान्ताचें मूळ कसें आढळतें तें सांगितलें.

स्वामी पुढे म्हणाले, "सर्व आधुनिक धर्म या कल्पनेपासून प्रारंभ करतात की 'मनुष्य पूर्वी एकदा शुद्ध होता, त्याचा अधःपात झाला आणि तो पुन्हा शुद्ध होईल.' ही कल्पना त्यांनी कुठून घेतली हें मला कळत नाही. ज्ञानाचें अधिष्ठान आत्मा आहे; बाह्य परिस्थिति ही आत्म्याचें ज्ञान प्रकट करण्यासाठी केवळ उद्दीपक कारण आहे. ज्ञान ही आत्म्याची शक्ति आहे. शतकानुशतकें तो निरनिराळे देह घडवीत आहे. अनेक प्रकारचे जन्म म्हणजे आत्म्याच्या जीवनकथेंतील केवळ प्रकरणें होत. आपण सतत आपलीं शरीरें घडवीत असतों. संपूर्ण विश्व हें सतत प्रवाही आहे, त्याचा विकास व संकोच चालू आहे, तें सतत बदलत आहे. वेदान्तानुसार आत्मा मूलतः कधीच बदलत नाही, पण मायेच्या उपाधीमुळे तो बदलल्यासारखा भासतो. प्रकृति म्हणजे मनाने सीमित केलेला ईश्वरच होय. प्रकृतीच्या विकासामुळे आत्मा बदलल्यासारखा भासतो. सर्व प्रकारच्या जीवांमधे आत्मा हा मूलतः सारखाच असतो. त्याचा आविष्कार देहोपाधीमुळे भिन्न

होतो. आत्म्याचें हें एकत्व--सर्व मानवांना समान असें हें तत्त्व नीतिशास्त्राचा आधार आहे. या दृष्टीने सर्व मानव एकच आहेत आणि कोणाहि बांधवाला दुखविणें म्हणजे स्वत:लाच दुखविण्या-सारखें आहे.

"प्रेम म्हणजे या अनंत एकत्वाची केवळ एक अभिव्यक्ति होय. कोणत्या द्वैती तत्त्वज्ञानाने या प्रेमाचें तुम्ही स्पष्टीकरण करूं शकाल ? एका युरोपियन तत्त्वज्ञाचें म्हणणें आहे की चुंबन हा नरमांसभक्षणाच्या जुन्या सवयीचा अवशेष आहे. 'काय उत्तम तुझा स्वाद आहे' असें सुचविण्याचाच तो एक प्रकार आहे. मला हें पटत नाही.

"आपण सर्व कशाच्या शोधांत आहोंत ?--मुक्तीच्या. जीव-नाची सारी धडपड, सारा प्रयत्न या मुक्तीसाठी आहे. सर्व मानववंश, स्वर्गादि सर्व लोक, सर्व विश्वब्रह्मांड याच दिशेने जात आहे.

"आपण जर बद्ध असूं तर कोणीं आपल्याला बांधलें ? अनंताला त्याच्या स्वत:शिवाय इतर कोणतीहि शक्ति बांधूं शकत नाही."

भाषणानंतर प्रश्न विचारण्याची संधि देण्यांत आली आणि वक्त्यांनी अर्धा तासपर्यंत प्रश्नांचीं उत्तरें दिलीं.

# मुक्तीचा मार्ग

(सोमवार, १२ मार्च १९०० रोजीं ओकलंड येथे दिलेल्या व्याख्यानाचा 'ओकलंड इन्क्वायरर'मधे संपादकीय टीपांसहित प्रसिद्ध झालेला अहवाल)

हिंदु धर्माचार्य स्वामी विवेकानंद यांचीं 'मुक्तीचा मार्ग' याविषयीचीं मतें ऐकण्यासाठी काल सायंकाळीं 'फर्स्ट युनिटेरियन चर्च'चा 'वेन्दते हॉल' श्रोत्यांनी भरून गेला होता. स्वामींनी जीं तीन व्याख्यानें दिलीं त्यांतलें हें शेवटचें होतें. त्यांच्या भाषणांतील कांही भाग असा :

कोणी म्हणतो ईश्वर स्वर्गांत आहे, कोणी म्हणतो ईश्वर सृष्टींत आहे आणि तो सर्वत्र आहे, पण मूलभूत दृष्टीने पाहिल्यास आपल्याला कळून येतें की सर्वांचें लक्ष्य एकच आहे. आपण निरनिराळ्या पद्धतीनुसार प्रयत्न करतों, पण आपलें ध्येय निरनिराळें नाही.

वैराग्य व स्वार्थत्याग हे प्रत्येक मोठ्या धर्माचे मूलमंत्र आहेत. आपणां सर्वांना सत्य हवें आहे, आणि आपल्याला हवें असो वा नसो तें प्रकट होणारच. हें आपण जाणून आहोंत. एकप्रकारें आपण सर्व त्याच अंतिम तत्त्वाच्या प्राप्तीसाठी धडपडत आहोंत. त्याच्याप्रत पोहोचण्याच्या मार्गांत कोण आडवें येतें ? आपणच. तुमचे पूर्वज त्याला 'सैतान' म्हणत असत, पण वस्तुतः तो आपलाच भासमान 'मी' असतो.

आपण दास्यांत राहतों, आणि त्यांतून आपण बाहेर पडलों तर आपल्याला जिवंतच राहतां येणार नाही. एक माणूस नव्वद

वर्षे अंधारकोठडींत राहिल्यानंतर जेव्हा त्याला सूर्यप्रकाशांत आणण्यांत आलें तेव्हा 'मला परत त्या कोठडींत घेऊन चला' असें तो म्हणाला. त्या माणसासारखीच आपली अवस्था आहे. तुम्ही हें जुनें जीवन सोडून नवीन व अधिक स्वातंत्र्यपूर्ण जीवन स्वीकारण्यास तयार होणार नाही.

प्रत्येक गोष्टीच्या अंतरांत शिरून तिचें वर्म ध्यानांत घेणें हें कठीण आहे. सामान्य माणसाच्या किती भ्रामक समजुती असतात! भिन्न भिन्न धार्मिक समजुतींमुळे तो कितीहि क्षुद्र बनलेला असला तरी तो समजतो की आपल्याला अनंत आत्मा आहे ! एका देशांत एका पुरुषाला अनेक बायका तर दुसऱ्या देशांत एका स्त्रीला अनेक पति ! आणि हें सर्व धर्माच्या नांवाखाली ! तद्वतच कांहींचे दोन देव असतात, कांहींचा एक देव असतो, तर कांहींचा मुळी देवच नसतो.

पण मुक्ति ही कर्माने व भक्तीने प्राप्त होते. तुम्ही एखादी गोष्ट पूर्णपणें शिकून घेतां, कालान्तराने ती तुम्हांला आठवत नाही. पण तरीहि ती तुमच्या मनांत खोल मुरलेली असते व ती तुमचाच एक भाग बनलेली असते. त्याचप्रमाणे तुम्ही जें कांही बरें किंवा वाईट कर्म करतां त्यामुळे तुमच्या भावी जीवनाला विशिष्ट वळण प्राप्त होतें. तुम्ही जर चांगलें कर्म कर्तव्य म्हणून कराल तर तुम्ही आपल्या कल्पनेंतील स्वर्गाला जाल व स्वर्गाचें स्वप्न अनुभवाल.

जगाचा इतिहास हा त्यांतील थोर विभूतींचा व देवमानवांचा नाही, तर तो समुद्रांतील लहान बेटांसारखा आहे. हीं बेटें समुद्रांत वाहून आलेले कण आपल्या भोवती गोळा करून मोठेमोठे भूखंड बनतात. तद्वतच प्रत्येक घरांत घडणाऱ्या लहान लहान त्यागांनी

दा. क्र. ९२३८९

जगाचा इतिहास घडला आहे. मनुष्य स्वतःच्या विचारानुसार वागूं इच्छीत नाही म्हणून तो धर्माचा स्वीकार करतो. 'एखाद्या वाईट ठिकाणांतून बाहेर पडण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे धर्म' असें तो मानतो.

मनुष्य आपल्या ईश्वरावर जें उत्कट प्रेम करतो त्यानेच त्याला मुक्ति प्राप्त होते. तुमची पत्नी तुम्हांला म्हणते, "मी तुमच्याशिवाय जगूं शकत नाहीं." कांही माणसें संपत्ति नाहीशी झाली म्हणजे वेडीं होतात व त्यांना इस्पितळांत पाठवावें लागतें. ईश्वराविषयी तुम्हांला एवढें प्रेम वाटतें काय? जेव्हा तुम्ही धन-संपत्ति, आप्तेष्ट, माता-पिता, भाऊ-बहिणी इत्यादि सर्व ऐहिक गोष्टींचा त्याग कराल आणि ईश्वराची प्रार्थना कराल की, 'हे ईश्वरा, मला तुझें थोडेंतरी प्रेम दे" तेव्हा तुम्हांला मुक्ति प्राप्त होईल.

---

निवडा
९२३८९
७१३।७१

# भारतांतील लोक

(सोमवार, १९ मार्च १९०० रोजीं ओकलंड येथे दिलेल्या व्याख्यानाचा 'ओकलंड इन्क्वायरर'मधे संपादकीय टीपांसहित प्रसिद्ध झालेला अहवाल)

स्वामी विवेकानंदांनी सोमवारीं रात्रीं 'भारतीय लोक' या नव्या विषयावर जें भाषण दिलें तें वेधक होतें. आपल्या देशांतील लोकांविषयी त्यांनी जी माहिती सांगितली तिच्यामुळेच केवळ नव्हे, तर त्या लोकांच्या मनोवृत्तीसंबंधी व त्यांच्या समजुतींसंबंधी वक्त्यांनी अभावितपणें जो विशेष परिचय घडविला त्यामुळेहि तें वेधक वाटलें. स्वामी सुशिक्षित आणि बुद्धिमान आहेत, पण ते पाश्चात्त्य सभ्यतेचे चाहते नाहीत असें दिसतें. बालविधवा स्त्रियांचा छळ व इतर प्रकारचा रानटीपणा यांविषयी जे आरोप भारतीय लोकांवर करण्यांत येतात ते ऐकून स्वामी बरेच दुखावले गेले आहेत. आणि थोड्याबहुत प्रमाणांत जशास तसें या न्यायानें उत्तर देण्याकडे त्यांचा कल आहे असें उघड दिसत होतें.

भाषणाला प्रारंभ करतांनाच त्यांनी श्रोत्यांना भारतांतील लोकांच्या सर्वसामान्य वैशिष्ट्यांची कल्पना दिली. ते म्हणाले की आशियांतील इतर देशांतल्याप्रमाणेच भारतांतहि वंश किंवा भाषा हें ऐक्याचें सूत्र नसून, धर्म हें ऐक्याचें सूत्र आहे. युरोपांत वंशावरून राष्ट्र बनतें, पण आशियांत भिन्न वंशांच्या व भिन्न भाषा बोलणाऱ्या लोकांचा धर्म एक असेल तर त्यांचें राष्ट्र बनतें. उत्तर भारतांतील लोक चार मोठ्या वर्गांत विभागले गेले आहेत, तर दक्षिणेंतील भाषा उत्तरेंतील भाषांहून इतक्या भिन्न आहेत की

त्यांच्यांत कसलेंच साम्य नाही. उत्तर भारतांतील लोक आर्यवंशाचे आहेत. पिरिनिज प्रदेशांतील बास्क लोक व फिनलंडमधील लोक सोडून इतर युरोपीय लोक याच आर्यवंशाचे समजले जातात. दक्षिण भारतांतील रहिवासी हे प्राचीन इजिप्तचे लोक व सेमेटिक लोक ज्या वंशाचे होते त्या वंशाचे आहेत. भारतांत एकमेकांच्या भाषा शिकणें किती कठीण आहे हें विशद करण्यासाठी उदाहरण म्हणून त्यांनी सांगितलें की दक्षिण भारतांत जाण्याचा त्यांना जेव्हा प्रसंग आला होता तेव्हा संस्कृत भाषा बोलूं शकणारे कांही थोडे निवडक लोक सोडले तर तेथील इतर लोकांशीं ते नेहमी इंग्रजींतून बोलत असत.

व्याख्यानाचा बराच भाग जातिव्यवस्थेविषयीच्या चर्चेने व्यापला होता. जातिव्यवस्थेसंबंधी स्वामी म्हणाले की या व्यवस्थेला वाईट बाजूहि आहे, पण तिचे फायदे हे तिच्या तोटयांपेक्षा पुष्कळच जास्त आहेत. थोडक्यांत म्हणजे, बापाचा धंदाच मुलाने करण्याच्या प्रथेंतून ही जातिव्यवस्था विकसित झाली. कालान्तराने संपूर्ण समाज हा अनेक वर्गांत विभागला गेला. प्रत्येक वर्गाचीं बंधनें व मर्यादा कडक असत. पण यामुळे जरी समाज विभागला गेला तरी एका अर्थाने लोकांमधे ऐक्यहि निर्माण झालें, कारण एका जातीचे लोक त्या जातींतील व्यक्तीला गरजेच्या वेळीं मदत करण्याला बांधले गेले. आणि कोणतीहि व्यक्ति तिच्या जातींत राहूनच प्रगति करूं शकत असल्यामुळे हिंदूंत, सामाजिक किंवा वैयक्तिक वर्चस्वासाठी इतर देशांतील लोकांत ज्या झगडयांमुळे कडवटपणा उत्पन्न होतो तसे झगडे नाहीत.

जातिव्यवस्थेंतील अत्यंत वाईट भाग हा आहे की त्यामुळे स्पर्धावृत्ति मारली जाते; आणि स्पर्धेला आळा बसल्यामुळेच

खरोखरी भारताचा राजकीयदृष्ट्या ऱ्हास झाला आणि परकीय लोकांनी त्यांना जिकलें.

विशेष चर्चिल्या गेलेल्या विवाहविषयासंबंधी ते म्हणाले की हिंदुलोक हे समाजवादी आहेत. एकमेकावर आसक्त झालेल्या तरुण-तरुणींनी समाजाच्या सुस्थितीचा व हिताचा विचार न करतां जर आपापलीं लग्नें जुळविलीं तर त्या लग्नांपासून कांही लाभ होईल असें हिंदूंना वाटत नाही. समाजाचें हित हें दोन व्यक्तींच्या हितापेक्षा अधिक महत्त्वाचें आहे. "माझें तिच्यावर प्रेम आहे व तिचें माझ्यावर प्रेम आहे हें आम्ही दोघांनी लग्न करण्याला पुरेसें कारण नाही" असें स्वामी म्हणाले.

बालविधवांची स्थिति दाखविली जाते तितकी वाईट नाही असें सांगून ते म्हणाले की भारतांत सामान्यत: विधवांचें स्थान पुष्कळच महत्त्वाचें आहे, कारण देशांतील संपत्तीचा बराचसा भाग विधवांच्या ताब्यांत आहे. वस्तुत: विधवांची स्थिति इतकी हेवा वाटण्यासारखी आहे की स्त्री किंवा पुरुष कोणीहि विधवा होण्याविषयी प्रार्थना करील.

लग्न हें जीवनाचें एकच खरें उद्दिष्ट असतें तर बालविधवा, किंवा लग्नाआधीच मरण पावलेल्या मुलांशीं ज्यांचा वाङ्निश्चय झाला होता अशा मुली यांची कींव करणें योग्य झालें असतें. पण हिंदूंच्या विचारसरणीप्रमाणे लग्न हें विशेषाधिकार नसून कर्तव्य आहे आणि म्हणून बालविधवांना विवाहाचा हक्क नाकारणें ही कांही विशेष कष्टदायक गोष्ट नाही.

# भारतांतील कलेसंबंधी कांही विचार

सॅन् फ्रॅन्सिस्को येथील 'वेंद्ते हॉल'मधील श्रोतृवृंदाला स्वामी विवेकानंदांची ओळख करून देण्यांत आली आणि ते 'भारतांतील शास्त्रें व कला' या विषयावर बोलतील असें सांगण्यांत आलें. स्वामींनी आपल्या श्रोत्यांचें लक्ष समग्र व्याख्यानभर आपल्याकडे वेधून घेतलें होतें हें त्यांच्या व्याख्यानानंतर जे अनेक प्रश्न त्यांना विचारण्यांत आले त्यावरून स्पष्ट होतें.

भाषणाच्या ओघांत स्वामी म्हणाले :

राष्ट्रांच्या इतिहासांत आरंभाला राज्यकारभार हा सतत धर्मगुरु वा पुरोहित यांच्या हातांत राहत आला आहे, असें दिसून येतें. सर्व विद्यांची निर्मितिदेखील या धर्मगुरूंनीच केली आहे. नंतर, धर्मगुरूंच्या मागून शासन हें दुसऱ्यांच्या हातीं जातें व क्षत्रियसत्ता अथवा राजसत्ता प्रभावी होते आणि सैन्याची हुकुमत विजयी होते. हें नेहमी असेंच घडत आलें आहे. आणि अंतीं लोक ऐषआरामांच्या आहारीं जाऊन एवढे अवनत होतात की शेवटीं ते अधिक बलशाली व अधिक रानटी अशा मानववंशांकडून जिंकले जातात.

जगांतील साऱ्या मानववंशांमधे अगदी प्राचीन काळापासून भारत हा "ज्ञानाची भूमि" या नांवाने संबोधला जात आला आहे. हजारो वर्षें लोटलीं, परंतु भारत हा इतर राष्ट्रें जिंकण्याकरिता कधीच बाहेर पडला नाही. भारतवासी हे लढाऊ वृत्तीचे कधीच नव्हते. तुम्हां पाश्चिमात्यांप्रमाणे ते मांस खात नाहीत,

कारण मांसाहाराने लढाऊ वृत्ति निर्माण होते; प्राण्यांचें रक्त तुम्हांस अस्वस्थ करतें व तुम्हांला कांहीतरी करण्याची इच्छा होते.

एलिझाबेथ राणीच्या काळचा भारत व इंग्लंड यांची तुलना करा. तुमच्या लोकांचा तो काळ केवढा अंधकारमय होता, आणि आम्ही तेव्हाहि किती तरी उन्नत होतों, सुधारलेले होतों. अँग्लो-सॅक्सन लोकांच्या ठिकाणीं नेहमीच कलेच्या बाबतींत वैगुण्य आढळत आलें आहे. त्यांच्याजवळ चांगलें काव्य आहे--उदाहरणार्थ शेक्स्पिअरची निर्यमक पद्यरचना कितीतरी आश्चर्यकारक आहे ! निव्वळ शब्दांचे यमक जुळविण्यांत विशेष असें कांही नाही. ती कांही जगांतील सर्वांत जास्त सुसंस्कृतपणाची निदर्शक गोष्ट नव्हे.

भारतांत शेकडो वर्षांपूर्वी संगीताचा विकास सातहि समग्र स्वरांपर्यंत झालेला होता--अगदी अर्ध्या व पाव स्वरांपर्यंत झालेला होता. भारत संगीत-क्षेत्रांत अग्रणी होता, त्याचप्रमाणे नाटक व शिल्पकला यांच्या क्षेत्रांतहि सर्वांच्या पुढे होता. सध्या जें करण्यांत येत आहे तें निव्वळ अनुकरणाच्या स्वरूपाचें आहे.

सांप्रत भारतांत सर्वकांही एका प्रश्नावर केंद्रित झालेलें दिसतें, आणि तो प्रश्न हा की मनुष्याचे किती कमींत कमी गोष्टींत भागूं शकतें.

# मानवाचें खरें स्वरूप

(२० मार्च १९०० रोजीं सॅन् फ्रान्सिस्को येथे दिलेल्या व्याख्यानाचीं टिपणें)

आजचा विषय 'मानव' हा आहे. मानव हा प्रकृतीहून कसा वेगळा आहे हें मी सांगण्याचा प्रयत्न करीन. पुष्कळ दिवसपर्यंत 'प्रकृति' हा शब्द केवळ बाह्य घटनांचा वाचक म्हणूनच वापरला जात असे. बाह्य जगांतील घटनांमधे पद्धतशीरपणा दिसतो आणि त्यांची अनेकदा पुनरावृत्ति होते. जें पूर्वी एकदा घडलें तें पुन्हा घडतें--कोणतीहि घटना केवळ एकदाच घडत नाही. यावरून असा निष्कर्ष काढण्यांत आला की प्रकृतींत सारखेपणा आहे. प्रकृतीच्या कल्पनेशीं सारखेपणाची कल्पना संलग्न आहे. तिच्याशिवाय प्राकृतिक घटनांचें आकलन होऊं शकत नाही. हा सारखेपणाच ज्याला आपण नियम म्हणतों त्याच्या मुळाशीं आहे.

हळूहळू 'प्रकृति' हा शब्द आणि सारखेपणाची कल्पना आंतरिक घटनांनाहि म्हणजेच जीवन व मन यांसंबंधीच्या घटनांनाहि लावण्यांत येऊं लागली. जिथे कांही भेद दिसतात तें सारें प्रकृतीच्या अंतर्गत असतें. वनस्पतींचे, पशूंचे व मानवांचे गुण प्रकृतीच्या अंतर्गत आहेत. मानवी जीवनांतील कार्यें निश्चित पद्धतीनुसार होत असतात. तसेंच मनाचींहि कार्यें विशिष्ट पद्धतीनुसार होतात. विचार हे नुसतेच उत्पन्न होत नाहीत, तर त्यांच्या उद्भवांत, स्थितींत आणि विनाशांत एक विशिष्ट पद्धति असते. निराळ्या शब्दांत सांगायचें म्हणजे, ज्याप्रमाणे बाह्य जग नियमाधीन आहे त्याचप्रमाणे आंतर जग म्हणजेच मनुष्याचें

जीवन व मन हीं देखील नियमाधीन आहेत.

मनुष्याच्या अस्तित्वाच्या व मनाच्या संबंधांत नियमाधीनतेची कल्पना केल्याबरोबर ही गोष्ट उघड होते की स्वतंत्र अस्तित्व किंवा स्वतंत्र इच्छा या गोष्टी शक्य नाहीत. पशूंचा स्वभाव कसा पूर्णत: नियमाधीन आहे हें आपण जाणतों. पशु स्वतंत्र इच्छा-शक्तीचा उपयोग करतांना दिसत नाहीत. हीच गोष्ट मनुष्याच्या बाबतींतहि खरी आहे. मनुष्याचा स्वभाव देखील नियमाधीन आहे. मानवी मनाच्या कार्यांचें नियमन करणारा जो नियम आहे त्याला 'कर्माचा नियम' असें म्हणतात.

शून्यांतून कशाचीहि उत्पत्ति होतांना कुणीं पाहिली नाही. मनांत जर कांही उद्‌भवत असेल तर तेंहि कशांतून तरी निर्माण झालें असलें पाहिजे. 'स्वतंत्र इच्छा' याचा आपला अर्थ 'जी कोणत्याहि कारणापासून उत्पन्न झाली नाही अशी इच्छा' असा असतो. पण हें खरें असूं शकत नाही. इच्छेला कारण असतें आणि म्हणूनच ती स्वतंत्र असूं शकत नाही. ती नियमाधीन आहे. मी तुमच्याशीं बोलण्याची इच्छा करतों. तुम्ही माझें भाषण ऐकण्या-साठी येतां. यांत नियम आहे. माझीं सर्व कार्यें, माझे सर्व विचार, सर्व अनुभव, माझें सर्व वर्तन, माझी प्रत्येक हालचाल--या सर्वांना कारण आहे आणि म्हणून हीं सारीं स्वतंत्र नाहीत. आमच्या जीवनाची व मनाची ही नियमाधीनता हाच कर्माचा नियम आहे.

असा सिद्धान्त जुन्या काळीं पाश्चात्त्य समाजांत मांडला गेला असता तर त्यामुळे प्रचंड खळबळ माजली असती. पाश्चात्त्य मनुष्य आपलें मन नियमाधीन आहे असा विचार करूं इच्छीत नाही. भारतांत अत्यंत प्राचीन अशा तत्त्वज्ञानाने जेव्हा हा

सिद्धान्त मांडला तेव्हा तो ताबडतोब मान्य झाला. मनाचें स्वातंत्र्य अशी कांही गोष्ट असूं शकत नाही. या शिकवणीमुळे भारतीय लोकांत कांहीच खळबळ कां बरें निर्माण झाली नाही ? भारताने तो शांतपणाने स्वीकारला. भारतीय विचाराचें हें वैशिष्टच आहे. जगांतील इतर सर्व विचारपद्धतींहून भारतीय विचारपद्धति ह्या बाबतींत निराळी आहे.

बाह्य आणि आंतर प्रकृति या दोन भिन्न वस्तु नसून खरोखरी त्या एकच आहेत. सर्व प्रकारच्या घटनांची समष्टि म्हणजे प्रकृति होय. जें कांही आहे व ज्याला गति आहे तें सर्व प्रकृति होय. आपण जडद्रव्य व मन यांत फार मोठा भेद करतों. मन हें जड-द्रव्याहून अगदीच वेगळें आहे असें आपण मानतों. वस्तुतः मन आणि जडद्रव्य हीं दोन्हीं म्हणजे एकच प्रकृति असून तिचा एक अर्धा भाग दुसऱ्या अर्ध्या भागावर सतत कार्य करीत असतो. भिन्न भिन्न संवेदनांच्या रूपाने जडद्रव्याचा मनावर प्रभाव पडत असतो. या संवेदना म्हणजे दुसरें कांही नसून शक्ति आहे. बाह्य शक्ति आंतर शक्तीला जागृत करते, बाह्य शक्तीला प्रत्युत्तर देण्याच्या किंवा तिच्यापासून दूर सरण्याच्या इच्छेपासूनच आंतरिक शक्ति विचाराचें रूप धारण करते.

जडद्रव्य व मन ह्या दोन्ही खरोखरी शक्तिच आहेत, आणि त्यांचें खोलवर विश्लेषण केल्यास मूलतः त्या एकच आहेत असें तुमच्या निदर्शनास येईल. बाह्य शक्ति आंतर शक्तीला जागृत करूं शकते या गोष्टीमुळेच हें सिद्ध होतें की कुठेतरी त्या दोन्ही शक्ति एकमेकींत मिसळत असल्या पाहिजेत. त्या अखंड असाव्यात आणि म्हणून मूलतः ही एकच शक्ति असावी हें उघड आहे. जेव्हा आपण वस्तूंच्या मुळाशीं पोहोचतों तेव्हा त्या अमिश्र

स्वरूपाच्या व व्यापक होतात. एकच शक्ति जडद्रव्याच्या रूपानें व मनाच्या रूपाने व्यक्त होत असल्यामुळे जडद्रव्य व मन हीं भिन्न आहेत असें मानण्याचें कारणच उरत नाही. मनाचें रूपान्तर जडद्रव्यांत व जडद्रव्याचें रूपान्तर मनांत होतें. विचारशक्ति ही मज्जातंतूंची शक्ति व स्नायूंची शक्ति बनते, तसेंच स्नायूंची व मज्जातंतूंची शक्ति ही विचारशक्ति बनते. प्रकृतिच ही सारी शक्ति आहे, मग ती जडद्रव्याच्या रूपाने व्यक्त झालेली असो किंवा मनाच्या रूपाने व्यक्त झालेली असो.

अत्यंत सूक्ष्म असें मन व अत्यंत स्थूल असें जडद्रव्य यांच्यांतील भेद हा केवळ प्रमाणाचा आहे. यामुळे या संपूर्ण विश्वाला मन किंवा जडद्रव्य यांपैकी कांहीहि म्हटलें तरी चालण्यासारखें आहे. मनाला तुम्ही सूक्ष्म जडद्रव्य म्हणू शकतां किंवा शरीराला स्थूल मन म्हणूं शकतां. कशाला कोणतें नांव तुम्ही देतां याला कांही विशेष महत्त्व नाही. जडवाद व अध्यात्मवाद यांच्या संघर्षांतून उत्पन्न होणारे सगळे झगडे चुकीच्या विचारसरणीमुळे उत्पन्न होतात. वस्तुतः त्या दोन्हींत भेद नाही. मी आणि खालच्या योनींतील डुक्कर यांच्यांत केवळ प्रमाणाचा फरक आहे. डुकरांत आत्म्याची अभिव्यक्ति कमी आहे, माझ्यांत ती अधिक आहे. कित्येक वेळां डुक्कर चांगलें ठरतें, मी वाईट ठरतों.

मन किंवा जडद्रव्य यांत प्रथम काय याची चर्चा करणेंहि व्यर्थ आहे. मन आधी असून त्यांतून जडद्रव्य निर्माण झालें की जडद्रव्य आधी असून त्यांतून मन निर्माण झालें ? पुष्कळसे तात्त्विक युक्तिवाद या निरर्थक प्रश्नांतून उत्पन्न होतात. कोंबडी आधी की अंडें आधी हें विचारण्यासारखेंच तें आहे. दोन्ही आरंभीं आहेत व दोन्ही शेवटीं आहेत--मन आणि जडद्रव्य, जडद्रव्य

आणि मन. मीं जर असें म्हटलें की जडद्रव्य आधी होतें आणि तेंच सूक्ष्म होतां होतां मन झालें, तर मला हें मान्य करावें लागेल की जडद्रव्याच्या पूर्वी मन असलें पाहिजे. एरवी जडद्रव्य आलें कुठून? मनाच्या आधी जडद्रव्य असतें व जडद्रव्याच्या आधी मन असतें. हा तोच कोंबडी व अंडें यांच्यासारखा प्रकार आहे.

संपूर्ण प्रकृति ही कार्यकारणभावाच्या नियमाने बद्ध आहे, आणि अवकाश व काल यांनी ती मर्यादित आहे. अवकाशाच्या बाहेरचें कांहीहि आपण पाहूं शकत नाहीं. तरीहि आपण अवकाश म्हणजे काय हें जाणत नाहीं. कालाच्या बाहेरचें कांहीहि आपण आकळूं शकत नाहीं, पण तरीहि काल म्हणजे काय हें आपण जाणत नाहीं. कार्यकारणाच्या परिभाषेशिवाय आपण कांही समजूं शकत नाहीं, पण तरीहि कार्यकारणभाव म्हणजे काय हें आपण जाणत नाहीं. काल, अवकाश आणि कार्यकारणभाव या तीन गोष्टी प्रत्येक घटनेला ओतप्रोतभावें व्यापून असतात, पण त्या स्वतः मात्र घटना नव्हेत. त्या जणुकांही मुशीप्रमाणे किंवा साच्याप्रमाणे आहेत आणि त्यांच्यांत घातल्याशिवाय कोणत्याहि वस्तूचें आकलन होऊं शकत नाही. सत्ता आणि देश-काल-कार्यकारणभाव मिळून जडद्रव्य बनतें; तसेंच सत्ता आणि देश-काल-कार्यकारणभाव मिळून मन बनतें.

ही गोष्ट निराळ्या रीतीने व्यक्त करतां येते. प्रत्येक वस्तु ही सत्ता आणि नामरूप मिळून बनलेली आहे. नाम व रूप हीं येतात व जातात, पण सत्ता नेहमी तीच राहते. सत्ता आणि नामरूप मिळून हा घडा बनला आहे. जेव्हा तो फुटतो तेव्हा तुम्ही त्याला घडा म्हणत नाही. त्या घड्याचें रूप मग तुम्हांला दिसत नाही. त्याचें नाम व रूप हीं नाहीशीं होतात, पण त्याची

सत्ता कायम राहते, नाम व रूप यांनीच मूळ सत्तेंत अनेक भेद उत्पन्न केले आहेत. हे भेद सत्य नव्हेत, कारण ते नाहीसे होतात. जिला आपण प्रकृति म्हणतों ती अपरिवर्तनीय व अविनाशी अशी सत्ता नाही. प्रकृति म्हणजे देश-काल-कार्यकारणभाव होय. प्रकृति म्हणजे नामरूप होय. प्रकृति ही माया आहे. ज्या नामरूपामुळे प्रत्येक वस्तु घडली आहे तें नामरूप म्हणजेच माया होय. माया ही सत्य नाही. ती जर सत्य असती तर आपण तिला बदलूं किंवा नष्ट करूं शकलों नसतों. सत्ता ही इंद्रियातीत आहे. माया ही दृश्यमान आहे. 'खरा मी' हा अविनाशी आहे आणि 'भासमान मी' हा सतत परिवर्तनशील आहे व विनाशी आहे.

तात्पर्य हें की प्रत्येक वस्तूचे दोन पैलू आहेत. एक पैलू इंद्रियातीत स्वरूपाचा असून तो अपरिवर्तनीय आणि अविनाशी आहे. दुसरा पैलू हा दृश्यमान असून तो परिवर्तनशील व विनाशी आहे. मनुष्याचें खरें स्वरूप म्हणजे ही सत्ता किंवा आत्मा आहे. हा आत्मा कधी बदलत नाही, कधी नष्ट होत नाही पण तो विशिष्ट रूपाने व विशिष्ट नांवाने नटलेला दिसतो. हें नाम व हें रूप अविकारी किंवा अविनाशी नाहीत. तीं सतत बदलतात आणि नष्ट होतात. तरीहि माणसें मूढपणाने या विकारी रूपांत--शरीर व मन या रूपांत अमर होण्याची इच्छा करतात. त्यांना अमर शरीर हवें असतें. असलें अमरत्व मला नको आहे.

माझा आणि प्रकृतीचा संबंध कोणत्या प्रकारचा आहे ? प्रकृति ज्याअर्थी नामरूपात्मक आहे किंवा देश-काल-कार्यकारणभाव या स्वरूपाची आहे त्याअर्थी मी तिचा अंश नाहीं, कारण मी स्वतंत्र आहें, अमर आहें, अपरिवर्तनीय आहें आणि अनंत आहें. मला स्वतंत्र इच्छा आहे की नाही हा प्रश्नच उत्पन्न होत नाही, कारण

मी सर्व इच्छेच्या पलीकडे आहें. जिथे कुठे इच्छा आहे तिथे ती स्वतंत्र नाही. स्वतंत्र इच्छा म्हणून कांही नाहीच. जें इच्छेच्या रूपाने व्यक्त होतें तें स्वतंत्र आहे. तें जेव्हा नामरूपांत बद्ध होतें तेव्हा तें इच्छा बनतें. तें आत्मतत्त्व किंवा ती सत्ता जणुकांही नामरूपाच्या साच्यांत स्वतःला ढाळून घेते आणि त्याच क्षणीं ती बद्ध होते; वस्तुतः पूर्वी ती स्वतंत्र होती. आणि तरीहि तिचा मूळ स्वभाव कायम असतो. म्हणूनच हा आत्मा म्हणतो, "मी स्वतंत्र आहें; हीं सर्व बंधनें असूनहि मी स्वतंत्र आहें." आणि त्याला याचा कधीच विसर पडत नाही.

पण जेव्हा आत्मा इच्छाशक्तीचें रूप घेतो तेव्हा ती इच्छाशक्ति खऱ्या अर्थाने स्वतंत्र नसते. प्रकृति सूत्रें हालविते आणि तिच्याच इच्छेनुसार तिला नाचावें लागतें. तुम्ही आणि मी सर्वकाळ असेंच नाचत आलों आहोंत. आपलें पाहणें, करणें, अनुभवणें, जाणणें, आपले सर्व विचार व आपल्या सर्व क्रिया म्हणजे प्रकृतीच्या आज्ञे-नुसार नाचणेंच होय. या सर्व बाबतींत पूर्वी आपल्याला स्वातंत्र्य नव्हतें आणि आताहि नाही. खालच्या पातळीपासून तों सर्वांत वरच्या पातळीपर्यंतचे सर्व विचार व कृति नियमाधीन आहेत आणि यांपैकी कशाचाहि आत्म्याशीं संबंध नाही.

माझें खरें स्वरूप सर्व नियमांच्या पलीकडे आहे. या बंधनाशीं व प्रकृतीशीं जुळतें घेऊन जर तुम्ही राहाल तर तुम्ही नियमाधीन राहाल आणि त्यांतच तुम्हांला सुख वाटेल. पण जसजसे तुम्ही प्रकृतीच्या आज्ञा मानून तिच्या ताब्यांत राहाल तसतसे तुम्ही अधिकच बद्ध व्हाल. अज्ञानाशीं तुम्ही जितकें जुळतें घ्याल तितकेंच विश्वांतील प्रत्येक गोष्टीच्या आज्ञेंत तुम्हांला राहावें लागेल. प्रकृतीशीं असलें हें जुळतें घेणें, ही नियमाधीनता मनुष्याच्या खऱ्या

स्वरूपाशीं व अंतिम ध्येयाशीं सुसंगत आहे काय? एखाद्या धातूने कोणत्याहि नियमाविरुद्ध कधी झगडा केला आहे काय? कोणत्या झाडाने एखादा नियम चुकविला आहे? हें टेबल प्रकृतीशीं, नियमाशीं जुळतें घेतें, पण तें सदैव टेबलच राहतें. तें त्याहून अधिक चांगलें असें कांही होत नाही. मनुष्य प्रकृतीशीं झगडतो. तो पुष्कळ चुका करतो. त्यांचीं फळें तो भोगतो. पण सरतेशेवटीं तो प्रकृतीवर विजय मिळवितो आणि आपल्या मुक्त स्वरूपाचा त्याला अनुभव येतो. जेव्हा तो मुक्त होतो तेव्हा प्रकृति त्याची दासी बनते.

आत्म्याची स्वतःच्या बंधनाविषयीची जागृति व त्याचा वर उठण्याचा आणि स्वतःचा प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न याचेंच नांव जीवन आहे. या संघर्षांत यश येणें हाच क्रमविकास आहे. जेव्हा सर्व दास्य झुगारून दिलें जातें आणि अंतिम विजय प्राप्त होतो तेव्हा त्यालाच निर्वाण वा मुक्ति म्हणतात. विश्वांतील प्रत्येक वस्तु मुक्तीसाठी धडपडत आहे. जेव्हा मी प्रकृतीने, नाम-रूपाने, देश-काल-कार्यकारणभावाने बद्ध असतों तेव्हा माझें सत्य-स्वरूप काय आहे हें मी जाणत नाहीं. परंतु या बंधनांतहि माझें खरें स्वरूप पूर्णपणें लुप्त होत नाही. मी बंधनें तोडण्याचा प्रयत्न करतों. एका मागोमाग एक तीं तुटतात आणि मला माझ्या स्वाभाविक महिम्याची जाणीव होते. त्यानंतर पूर्ण मुक्ति प्राप्त होते; मला माझ्या स्वरूपाचें स्पष्ट व पूर्ण ज्ञान होतें. मी अनंत आत्मा आहें, प्रकृतीचा स्वामी आहें, तिचा दास नाहीं याचा मला साक्षात्कार होतो. सर्व भेदांच्या आणि मिश्र वस्तूंच्या पलीकडे, देश-काल-कार्यकारणभावाच्या पलीकडे जें आहे तेंच माझें खरें स्वरूप आहे.

# अद्वैत

(इ. स. १९०० च्या जून महिन्यांत न्यू यॉर्क येथील 'वेदान्त सोसायटीं'त दिलेल्या व्याख्यानाचीं टिपणें)

भारतांतील सर्व तत्त्वज्ञानसंप्रदाय हे अद्वैत किंवा द्वैत याच मध्यवर्ती विचारापासून प्रसृत झाले आहेत.

ते सर्व वेदान्ताच्या अंतर्गत आहेत व वेदान्ताच्या आधारेंच त्यांचा अर्थ लावण्यांत येतो. एकत्वाचा उपदेश हें त्यांचें अंतिम सार आहे. आपण हें जें सर्व विविध रूपांत पाहतों तें ईश्वर आहे. आपण जडद्रव्य पाहतों, जग पाहतों, विविध संवेदनांचा अनुभव घेतों, पण तरीहि एकच सत्ता आहे.

त्याच 'एका'च्या अभिव्यक्तीच्या प्रमाणांतील भेद म्हणजे हीं भिन्न नामरूपें होत. आजचा क्षुद्र जंतु उद्याचा ईश्वर आहे. आपल्याला प्रिय असणारे हे सर्व भेद त्याच एका अनंत वस्तूचे अंश आहेत आणि त्यांच्यांत अभिव्यक्तीच्या प्रमाणाचाच भेद आहे. त्या एकमेव अनंत वस्तूची प्राप्ति म्हणजे मोक्ष होय.

पद्धतीच्या बाबतींत जरी आपण कितीहि चुकत असलों तरी खरें पाहतां आपली सर्व धडपड मुक्तीसाठीच आहे. आपण दुःख किंवा सुख ह्यांच्या शोधांत नसून मुक्तीच्या शोधांत आहोंत. हें एक ध्येय हेंच मनुष्याच्या न शमणाऱ्या तृष्णेचें रहस्य आहे. हिंदु आणि बौद्ध यांचें म्हणणें असें आहे की मनुष्याची तृष्णा ही कधी न शमणारी व अधिकाधिक हाव बाळगणारी अशी असते. तुम्ही अमेरिकेंतील लोक नेहमी अधिक सुखाच्या, अधिक भोगाच्या

शोधांत असतां. तुमची तृप्ति होत नाही हें खरें, पण मुळांत तुम्ही जें शोधतां ती मुक्तिच आहे.

मनुष्याच्या तृष्णेची ही विशालता म्हणजे त्याच्या स्वतःच्या अनंतत्वाचीच खरोखर खूण आहे. तो अनंत आहे, म्हणूनच त्याची तृष्णा जेव्हा अपार वाढते व ती जेव्हा अमर्यादपणें तृप्त होते तेव्हाच त्याचें समाधान होऊं शकतें.

तर मग मनुष्याचें समाधान कशाने होऊं शकेल ? संपत्तीने नव्हे. उपभोगाने नव्हे. सौंदर्याने नव्हे. एका अनंतानेच त्याचें समाधान होऊं शकतें. आणि तें अनंत म्हणजे तो स्वतःच आहे. जेव्हा त्याला याचा साक्षात्कार होतो तेव्हाच तो मुक्त होतो.

"इंद्रियें जिच्यांतील स्वरछिद्रें आहेत, अशी ही बासरी,
आपल्या सर्व संवेदना, ऐंद्रिय ज्ञान व गीत यांनी
एकाच गोष्टीचें गायन करते. तिची इच्छा आहे
परत त्या अरण्यांत जाण्याची--ज्याच्यापासून ती
वेगळी तोडली गेली होती त्याच्याकडे परत जाण्याची."

"तूं स्वतःच स्वतःचा उद्धार करून घे.
तूं स्वतःला बुडूं देऊं नकोस !
कारण तूंच तुझा महान् मित्र आहेस
आणि तूंच तुझा महान् शत्रु आहेस !"

अनंताला साहाय्य कोण करणार ? अंधारांतून मदतीचा जो हात पुढे येतो तोहि तुमचा स्वतःचाच असला पाहिजे.

भय व वासना हींच या सर्वांचें कारण आहेत, आणि त्यांना कोण उत्पन्न करतो ? आपण स्वतःच. आपलीं जीवनें म्हणजे एका स्वप्नांतून दुसऱ्या स्वप्नांत जाणें आहे. स्वप्नें पाहणारा मनुष्य अनंत आहे, आणि तो सान्त स्वप्नें पाहतो !

आनंदाची गोष्ट ही आहे की जें कांही बाह्य आहे तें चिरंतन असूं शकत नाही. या सापेक्ष जगांत कांहीहि शाश्वत नाही असें ऐकून ज्यांचीं हृदयें कंपित होतात त्यांना त्याचा अर्थच नीट कळत नाही.

मी अनंत नील आकाश आहें. माझ्यावरून हे नाना रंगांचे ढग जातात, कांही क्षण ते राहतात व मग नष्ट होतात. मी तेंच अनंत नील आकाश आहें. मी साक्षी आहें, मी सर्वांचा तोच शाश्वत साक्षी आहें. मी पाहतों म्हणूनच प्रकृतीचें अस्तित्व आहे. मी पाहत नाहीं तेव्हा ती अस्तित्वांत नसते. हें अनंत अद्वैत जर क्षणभरहि भंग पावलें तर आपल्यापैकी कोणीहि पाहूं किंवा बोलूं शकणार नाही.

# धर्मांचें सार

(अमेरिकेंत दिलेल्या एका व्याख्यानाचा अहवाल)

फ्रान्समधे पुष्कळ काळपर्यंत 'मनुष्याचे हक्क' हा समाजाचा मूलमंत्र होता; अमेरिकेंत अद्याप सर्वत्र 'स्त्रियांचे हक्क' याविषयी बोलणें ऐकूं येतें. भारतांत आम्हीं नेहमी देवांच्या हक्कांचाच विचार केला आहे.

वेदान्तांत सर्व पंथांचा समावेश होतो. आम्हां भारतीयांची एक वैशिष्टयपूर्ण कल्पना आहे. मला जर एक मूल असलें तर त्याला मी कोणताहि धर्म शिकविणार नाहीं. मी त्याला फक्त मन एकाग्र करावयास शिकवीन व प्रार्थनेची फक्त एकच ओळ सांगेन. तुमच्या अर्थानें प्रार्थना नव्हे, तर पुढील प्रकारची प्रार्थना मी त्याला शिकवीन--"जो या विश्वाचा निर्माता आहे त्याचें मी ध्यान करतों, तो माझ्या बुद्धीला प्रकाशित करो." नंतर वयांत आल्यावर, तो निरनिराळीं तत्त्वज्ञानें व निरनिराळे उपदेश ऐकील. कुठपर्यंत ?--त्याला जें सत्य वाटतें तें सापडेपर्यंत. तो मग तें सत्य सांगणारा जो गुरु असेल त्याचा शिष्य होतो. तो वाटेल तर ख्रिस्ताला भजेल, वाटेल तर बुद्धाला वा महंमदाला भजेल. या सर्वांचे हक्क आम्ही मान्य करतों. आणि प्रत्येक मानवाचा स्वत:च्या 'इष्टा'ची उपासना करण्याचा हक्कहि आम्ही मान्य करतों. यामुळे असें घडणें सहज शक्य आहे की, माझा मुलगा बौद्ध असेल, माझी पत्नी ख्रिस्ती असेल आणि मी मुसलमान असेन आणि तरीहि आमच्यांत कोणताहि संघर्ष

निर्माण होणार नाही.

सर्व मार्ग ईश्वराकडेच जातात याची सुदैवाने आम्हांला जाणीव आहे. तसेंच, आम्हांला याचीहि जाणीव आहे की जगाची सुधारणा सर्वांनी आमच्याच दृष्टिकोनांतून ईश्वराकडे पाहण्यावर अवलंबून नाही. आमचा मूलभूत सिद्धान्त हा आहे की तुमचें मत हें माझें मत होऊं शकत नाही किंवा माझें मत हें तुमचें होऊं शकत नाही. माझा स्वतःपुरताच एक पंथ आहे. भारतांत आम्हीं धर्माचें एक तत्त्वज्ञान निर्माण केलें आहे हें खरें आणि धर्माच्या सर्व तत्त्वज्ञानांमध्ये केवळ तेंच बुद्धिनिष्ठ तत्त्वज्ञान आहे असें आम्ही मानतों हेंहि खरें. पण त्या तत्त्वज्ञानाच्या बुद्धिनिष्ठपणा-वरील आमच्या श्रद्धेचा आधार हा आहे की तें तत्त्वज्ञान सर्व ईश्वरोपासकांचा स्वतःत समावेश करून घेतें, सर्व उपासनामार्गां-विषयी तें पूर्णपणें उदार अशी दृष्टि बाळगतें आणि 'ईश्वरच विश्वाच्या रूपाने विकास पावला आहे' या विचाराकडे झुकणाऱ्या सर्व कल्पनांचा स्वीकार करण्याची त्याची नेहमी तयारी असते. आमच्या तत्त्वज्ञानाचें अपूर्णत्व आम्ही मान्य करतों, कारण सत्य हें सर्व तत्त्वज्ञानांच्या पलीकडे असलें पाहिजे. आणि हें मान्य करणें हेंच सतत विकासाचें लक्षण असून त्यामुळेच सतत विका-साची शक्यता निर्माण होते. मनुष्याला स्वतःच्या स्वरूपाची प्रतीति आणून देण्याचीं साधनें म्हणून पंथ, अनुष्ठानें व धर्मग्रंथ ह्यांचा उपयोग आहे. परंतु तशी प्रतीति आल्यानंतर तो ह्या सर्वांचा त्याग करतो. 'मी वेदांचा त्याग करतों' ही वेदान्त तत्त्व-ज्ञानांतील शेवटची पायरी आहे. धार्मिक विधि, मंत्र व धर्मग्रंथ यांच्या साहाय्याने तो मुक्तीप्रत पोहोचतो. नंतर तीं त्याच्या पक्षीं नाहीशीं होतात. 'सोऽहं, सोऽहं' असे शब्द त्याच्या मुखांतून बाहेर

पडतात आणि ईश्वराला 'तूं' म्हणून संबोधणें देखील ईश्वराची निंदा ठरते, कारण तो ईश्वराशीं एकरूप झालेला असतो.

व्यक्तिशः मी वेदांतील जो भाग तर्कसंगत आहे तोच स्वीकारतों. वेदांतील कांही भाग परस्परविरोधी दिसतात. वेद हे पाश्चात्त्य अर्थाने उत्स्फूर्त वा अंतःप्रेरित मानले जात नाहीत; ते सर्वज्ञ अशा ईश्वराविषयीच्या आम्हांला असलेल्या अखिल ज्ञानाचा साठा होत. पण ज्या ग्रंथांना वेद म्हणण्यांत येतें त्या ग्रंथांतच हें ज्ञान आहे असें म्हणणें हा केवळ वितंडवाद होय. आम्ही हें जाणतों की ज्ञानाचा वांटा सर्व पंथांच्या ग्रंथांना कमीअधिक प्रमाणांत मिळालेला आहे. मनु म्हणतात, "वेदांचा जो भाग तर्काशीं जुळतो तोच वेद होय." आमच्या पुष्कळ तत्त्वज्ञांनी हेंच मत स्वीकारलें आहे. जगांतील सर्व धर्मग्रंथांत वेदच असे आहेत की जे 'वेदांचें अध्ययन गौण आहे' असें प्रतिपादितात.

खरी विद्या तीच की "जिच्यामुळे अविकारी अशा ब्रह्माचा आपल्याला साक्षात्कार होतो." आणि हा साक्षात्कार वाचनाने, विश्वास ठेवल्याने किंवा तर्काने प्राप्त होत नसून तो अतींद्रिय ज्ञानाने व समाधीने प्राप्त होतो. जेव्हा मनुष्य या पूर्णावस्थेला पोहोचतो तेव्हा तो सगुण ईश्वराशीं समान होऊन जातो--"मी व माझा पिता एकच आहोंत." तो स्वतः निर्गुण ब्रह्माशीं एकरूप आहे हें तो जाणतो आणि सगुण ईश्वराप्रमाणेच स्वतःला व्यक्त करतो. सगुण ईश्वर म्हणजे मायेच्या--अज्ञानाच्या--धुक्यांतून पाहिलेलें निर्गुण ब्रह्मच होय.

जेव्हा पंचेंद्रियांच्या साहाय्याने आपण ब्रह्माला आकळण्याचा प्रयत्न करतों तेव्हा आपण त्याला सगुण ईश्वराच्या रूपांतच पाहूं शकतों. यांत कल्पना ही आहे की आत्मा हा 'विषय' होऊं शकत

नाही. ज्ञाता स्वतःलाच कसें जाणूं शकेल? पण असें म्हणतां येईल की तो स्वतःची छाया पाडूं शकतो; आणि त्या छायेचा सर्वोच्च प्रकार किंवा आत्म्याला 'विषय' बनविण्याचा सर्वोच्च प्रयत्न म्हणजे सगुण ईश्वर होय. आत्मा हा चिरंतन विषयी आहे व आपण त्याला विषय बनविण्याचा अनादि कालापासून प्रयत्न करीत आहोंत; या प्रयत्नांतूनच हा विश्वाचा पसारा--ज्याला आपण जडद्रव्य म्हणतों तें निर्माण झालें आहे. पण हे सर्व दुबळे प्रयत्न आहेत आणि आत्म्याला 'विषय' बनविण्याचा आपल्याला शक्य असा सर्वोच्च प्रकार म्हणजे सगुण ईश्वर होय.

"प्रामाणिक ईश्वर ही मानवाची सर्वांत उदात्त अशी निर्मिति आहे" असें तुमच्या एका पाश्चात्त्य तत्त्वचिंतकाने म्हटलें आहे. जसा मनुष्य तसा त्याचा ईश्वर. या मानवी अभिव्यक्तीद्वारांच कोणीहि ईश्वराला पाहूं शकतो. तुम्ही वाटेल तें म्हणा, वाटेल तें करा, पण तुम्ही ईश्वराला मनुष्याच्या रूपांतच कल्पूं शकतां; आणि जसे तुम्ही असाल तसाच तो राहील. एका अज्ञ माणसाला शिवाची मूर्ति तयार करण्यास सांगितलें होतें; पुष्कळ दिवसांच्या परिश्रमानंतर त्याने काय तयार केलें?--तर माकडाची मूर्ति! त्याचप्रमाणे, आपण जेव्हा ईश्वराची त्याच्या निर्गुण, पूर्ण स्वरूपांत कल्पना करण्याचा प्रयत्न करतों तेव्हा आपल्याला अपयशच येतें, कारण आपण आपल्या सध्याच्या उपाधीने बद्ध असतांना त्याला मानवरूपांतच पाहण्यास समर्थ आहोंत. म्हशींना ईश्वराची उपासना करण्याची इच्छा झाली तर, स्वतःच्या प्रकृतिधर्मानुसार, त्या त्याला एखाद्या प्रचंड म्हशीच्या रूपांतच पाहतील. एखाद्या माशाला ईश्वराच्या उपासनेची इच्छा झाली तर ईश्वर हा एक मोठा मासा आहे अशीच तो अनिवार्यपणें कल्पना करील. आणि

मनुष्यहि ईश्वराला अवश्यमेव मनुष्यच कल्पील. मनुष्य, म्हैस व मासा म्हणजे वेगवेगळीं पात्रें आहेत असें समजा; आता हीं सर्व पात्रें ईश्वररूपी सागराकडे स्वत:ला भरून घेण्यासाठी जर गेलीं तर त्यांत त्यांच्या त्यांच्या आकाराप्रमाणे व कुवतीप्रमाणेच पाणी भरलें जाईल. मनुष्यांत पाणी माणसाचा आकार घेईल, म्हशींत म्हशीचा आणि माशांत माशाचा; पण यांपैकी प्रत्येक पात्रांत ईश्वररूपी सागराचेंच पाणी आहे.

दोन प्रकारचीं माणसें ईश्वराची उपासना मनुष्याच्या रूपांत करीत नाहीत--एक म्हणजे ज्याला कोणताच धर्म नाही असा नरपशु, आणि दुसरा म्हणजे ज्याने आपल्या मानवी प्रकृतीच्या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत असा परमहंस. परमहंसाच्या पक्षीं सर्व सृष्टि आत्मरूप झालेली असते; तोच ईश्वराला ईश्वराच्या यथार्थ स्वरूपांत भजूं शकतो. नरपशु आपल्या अज्ञानामुळे ईश्वराची उपासना करीत नाही; आणि जीवन्मुक्त ईश्वरोपासना करीत नाहीत, कारण त्यांना स्वत:त ईश्वराची प्रतीति आलेली असते. 'सोऽहं, सोऽहं'--मीच ईश्वर आहें--असें ते म्हणतात; मग ते स्वत:चीच उपासना कशी करणार?

मी तुम्हांला एक लहानशी गोष्ट सांगतों. एका सिंहिणीने मरतांना मागे सोडलेला तिचा एक छावा मेंढरांत वाढत होता. मेंढ्या त्याला खाऊं घालीत व त्याला आसरा देत. तो छावा क्रमश: मोठा होत गेला आणि मेंढ्यांबरोबर तोहि 'बें बें' करूं लागला. एके दिवशीं दुसरा एक सिंह तेथे आला. मेंढ्यांत वाढलेल्या सिंहाला 'बें बें' करतांना पाहून तो त्याला आश्चर्याने म्हणाला, "तूं येथे काय करतोस?" त्याने म्हटलें, "बेंऽऽ. मी एक लहान मेंढरू आहें, मी एक लहान मेंढरू आहें. मी भ्यालों आहें." यावर

सिहाने गर्जना केली--"मूर्ख कुठला ! चल माझ्याबरोबर;
ण आहेस हें मी तुला दाखवितों." आणि त्याने त्याला एका
छ झऱ्याच्या काठीं नेलें व त्यांत पडलेलें प्रतिबिंब त्याला
खविलें. तो म्हणाला, "तूं सिंह आहेस; माझ्याकडे पाहा, त्या
मेंढयांकडे पाहा आणि स्वत:कडे पाहा." मग मेंढयांत वाढलेल्या त्या सिंहाने आपलें प्रतिबिंब पाहिलें व तो म्हणाला, "बें ऽऽ. मी या मेंढयांसारखा दिसत नाही हें खरें आहे. मी सिंह आहें." असें म्हणून त्याने एवढी प्रचंड गर्जना केली की तिच्यामुळे डोंगर हादरले.

आपलेंहि असेंच आहे. आपण सवयरूपी मेंढीचें चर्म पांघरलेले सिंह आहोंत. आपल्या भोवतालच्या जगाने आपल्यावर मोहिनी घालून आपल्याला दुबळें केलें आहे. हें आत्मसंमोहन कसें दूर करावें हें वेदान्त आपल्याला शिकवितो. आपल्याला जें ध्येय गांठावयाचें आहे तें आहे मुक्ति. 'मुक्ति म्हणजे प्रकृतीच्या नियमांचें पालन' या विचाराशीं मी सहमत नाहीं. याचा अर्थ काय हें मला कळत नाही. मानवी प्रगतीचा इतिहास सांगतो की ही प्रगति प्रकृतीचे नियम न मानल्यानेच झालेली आहे. खालच्या दर्जाच्या नियमांवरील विजय हा वरच्या दर्जाच्या नियमांच्या साहाय्यानेच प्राप्त झाला असें म्हणतां येईल. पण याहि अवस्थेंत विजिगीषु मन मुक्तीचाच शोध घेत होतें; त्याला जेव्हा कळलें की हा संघर्षहि नियमान्तर्गत आहे, तेव्हा त्या नियमांनाहि जिंकण्याची त्याला इच्छा झाली. म्हणून मुक्ति हेंच नेहमी ध्येय असतें. वृक्ष हे कधीच नियमांचा भंग करीत नाहीत. गाईला चोरी करतांना मीं कधी पाहिलें नाही. कालव कधी खोटें बोलत नाही. तरीपण हे प्राणी मानवापेक्षा श्रेष्ठ नव्हेत.

समाजांत, राजकारणांत किंवा धर्मांत नियमांची ताबेदा म्हैस व अखेर आपल्याला केवळ जडवत् बनवील. हें जीवन म्हीं सर्व स्वातंत्र्याचा जोरदार आविष्कारच होय. नियमांचा अति गेलीं म्हणजे मृत्यु होय. कोणत्याहि समाजांत हिंदुसमाजाच्याइतर्णी नियम नाहीत. आणि त्याचा परिणाम म्हणजे हिंदूंचा समाज-दृष्ट्या नाश. पण हिंदु लोकांत एक वैशिष्टयपूर्ण विचार होता. त्यांनी धर्मांत कोणतींहि विशिष्ट आणि ठोकळेबाज मतें प्रतिपादिलीं नाहीत, म्हणून त्यांच्या धर्माचा जास्तींत जास्त विकास झाला. धर्माच्या बाबतींत आम्ही व्यवहारी आहोंत, पण तुम्ही त्यांत अव्यवहारी आहांत.

अमेरिकेंत कांही थोडे लोक एकत्र येतात आणि 'आपण भागीदारीने एक कंपनी काढूं' असें म्हणतात. पांच मिनिटांत ती कंपनी तयार होते. भारतांत वीस माणसें तितकेच आठवडे एखाद्या भागीदारीच्या कंपनीबद्दल चर्चा करतील, पण ती अस्तित्वांत येणार नाही. परंतु चाळीस वर्षेपर्यंत दोन्ही हात हवेंत उंच धरल्याने ज्ञान प्राप्त होतें असा जर एखाद्याचा विश्वास असेल तर तो तसें करील. एकूण आम्ही आमच्या पद्धतीनें व्यवहारी आहोंत, तुम्ही तुमच्या पद्धतीने व्यवहारी आहांत.

पण आत्मानुभूतीचा सर्वश्रेष्ठ मार्ग म्हणजे प्रेमाचा मार्ग होय. जेव्हा आपण ईश्वरावर प्रेम करतों तेव्हा सर्व विश्व आपल्याला प्रिय होतें, कारण तें सर्व त्याचेंच आहे. "सर्वकांही त्याचें आहे, तो माझा प्रियकर आहे; मी त्याच्यावर प्रेम करतों" असें भक्त म्हणतो. अशा रीतीने प्रत्येक वस्तु भक्ताला पवित्र वाटते, कारण सर्व वस्तु ईश्वराच्या आहेत. अशा स्थितींत कोणाला दुखविणें कसें शक्य आहे ? दुसऱ्यावर प्रेम न करणें कसें शक्य आहे ?

ाच्या प्रेमाबरोबर, कालान्तराने, त्याचा परिणाम म्हणून ाविषयी प्रेम वाटायला लागतें. जसजसें आपण ईश्वराच्या ; जातों तसतसें आपल्याला हें दिसतें की सर्व वस्तु ईश्वराच्याच ाणीं राहतात आणि मग आपलें हृदय अखंड प्रेमाचा झरा :. या प्रेमाच्या प्रकाशांत मनुष्याचें परिवर्तन होतें आणि टीं प्रेम, प्रेमिक आणि प्रेमास्पद हीं तिन्हीं वस्तुतः एकच ्त. या सुंदर व स्फूर्तिदायक सत्याचा त्याला साक्षात्कार होतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८४१६८ वि: निबंध
क्रमांक १०६६ नों. दि. ०१३१८७
REFBK-0014381

स्वामी विवेकानंद शतवार्षिक जयंती स्मारक ग्रंथ

# स्वामी विवेकानंद ग्रंथावली

## एकूण १० खंड

**डबल डेमी १/१६ आकार : मोठा टाईप**

**सचित्र : आकर्षक जॅकेट**

**एकूण पृष्ठसंख्या सुमारें ६०००**

स्वामी विवेकानंदांच्या तहत आजपर्यंत प्रकाशित झालेल्या, आणि त्याचबरोबर अगदी नव्याने उपलब्ध झालेल्या व अद्याप अप्रकाशित अशा सर्व व्याख्यानांचा, प्रवचनांचा, ग्रंथाचा, लेखांचा, पत्रांचा, संवाद-संभाषणांचा, मुलाखतींचा, प्रश्नोत्तरांचा, कवितांचा व इतर सर्व प्रकारच्या साहित्याचा मूळ इंग्रजींतून आणि बंगालींतून केलेला अनुवाद प्रस्तुत ''ग्रंथावली'' च्या एकूण दहा खंडांमधे समाविष्ट करण्यांत आला आहे. स्वामी विवेकानंदांच्या समस्त इंग्रजी व बंगाली साहित्याचा हा प्रथमच प्रसिद्ध झालेला अधिकृत मराठी अनुवाद होय.

**कापडी बांधणी : प्रत्येकी ९ रु.; संपूर्ण संच ९० रु.**

**बोर्ड बांधणी : प्रत्येकी ७ रु.; संपूर्ण संच ७० रु.**

**रेल्वेचा किंवा पोस्टाचा खर्च निराळा.**

**श्रीरामकृष्ण आश्रम**

**धंतोली, नागपूर-१**